
CMYK

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, ३० जुलै २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक २४२ | पाने १२ | किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प




राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे चतुर्थ सरसंघचालक रज्जूभय्या यांचा तिथीप्रमाणे आज स्मृतिदिन

हिंदू धर्म हा सनातन धर्म आहे. ज्यामध्ये दगडांपासून वनस्पती, जीव-जंतू, पशु-पूजा करणाऱ्यांचे अधिकार आणि सर्वोच्च आध्यात्मिक तत्त्वज्ञानापर्यंतच्या सर्व प्रकारच्या उपासना पद्धतींना सनातन स्थान आणि मान्यता आहे.

**- स्व. प्रो. राजेंद्रसिंह उपाख्य रज्जूभय्या**
रा. स्व. संघाचे चतुर्थ सरसंघचालक

# ‘लोकपरीक्षा’ विधेयक पारित

## विरोधकांचा प्रचंड गोंधळ; राज्यसभेत पारित झाल्यावर कायद्याचे रूप



पावसाळी अधिवेशन

**नवी दिल्ली, २९ जुलै**

विरोधकांच्या प्रचंड गदारोळात लोकपरीक्षा (अनुचित प्रकाराला आळा घालणे) दुरुस्ती विधेयक २०२६ बुधवारी लोकसभेत पारित करण्यात आले. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी गृहमंत्री अमित शाह यांच्यावर केलेल्या आरोपावरून सभागृहात प्रचंड गदारोळ झाला.

या विधेयकावर दहा तास चाललेल्या चर्चेला विज्ञान आणि तंत्रज्ञान तसेच पंतप्रधान कार्यालयातील राज्यमंत्री डॉ. जितेंद्रसिंह यांनी उत्तर दिल्यानंतर आवाजी मतदानाने हे विधेयक पारित करण्यात आले. आता हे विधेयक राज्यसभेत पाठवले जाणार आहे. राज्यसभेत हे विधेयक पारित झाल्यावर त्याला कायद्याचे रूप येईल.

चर्चेला उत्तर देताना डॉ. जितेंद्रसिंह यांनी राहुल गांधी यांनी केलेले आरोप खोडून काढताना त्यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. विरोधी पक्षनेत्याला संसदीय कामकाजाच्या नियमांची प्राथमिकही माहिती नसावी, याचे मला आश्चर्य वाटते, असे स्पष्ट करत डॉ. जितेंद्रसिंह म्हणाले की, गोळीबाराचा आदेश गृहमंत्री नाही तर दंडाधिकारी देत असतात, हे विरोधी पक्षनेत्याला माहीत असले पाहिजे.

दिल्लीतील आंदोलकांवर गोळीबार केला नाही, तर अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या होत्या. राहुल गांधींचे आरोप खोडसाळ आहेत. कोणी स्वतःलाच इडियट म्हणत असेल तर माझा नाईलाज आहे, असे ते म्हणाले.

गृहमंत्री ३० गाड्यांचा ताफा घेऊन चालतात, असा दुसरा आरोप राहुल गांधींनी केला, पण गृहमंत्र्यांच्या ताफ्यात एवढ्या गाड्या कधीच नसतात. गृहमंत्री कधीही विदेश दौऱ्यावर गेले नाहीत. कोणत्याही तथ्याशिवाय बेजबाबदार विधाने करणे आणि नंतर त्यातून पळ काढणे हे जबाबदार विरोधी पक्षनेत्याचे लक्षण नसते. सभागृहातील विरोधी पक्षांचे आचरण पूर्णपणे बेजबाबदारपणाचे आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या दृष्टीने पंतप्रधान मोदी यांनी आणलेल्या महत्त्वपूर्ण विषयांवर रचनात्मक सूचना करण्याऐवजी विरोधी सदस्य राजकारण करत आहेत, असे ते म्हणाले. (तभा वृत्तसेवा)

### विद्यार्थी, तरुणांना मूर्ख (इडियट) म्हणणे दुर्भाग्यपूर्ण

विरोधी पक्षनेते सभागृहात जी भाषा वापरत आहेत, ती असंसदीयच नाही तर अनुचितही आहे. तिचा उल्लेख करणेही मला योग्य वाटत नाही, असे ते म्हणाले. जे विद्यार्थी आणि तरुण देशाचे भविष्य आहे, त्यांना मूर्ख (इडियट) म्हणणे दुर्भाग्यपूर्ण आहे, असा आरोप करत डॉ. जितेंद्रसिंह यांनी पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोर धरणे आंदोलन करणाऱ्या राहुल गांधी आणि काँग्रेस पक्षावर जोरदार हल्ला चढवला.



विधेयकावरील चर्चेला उत्तर देताना राज्यमंत्री डॉ. जितेंद्रसिंह

### विरोधी पक्षनेत्याला मूलभूत नियमांचीही माहिती नाही

विरोधी पक्षनेत्याला सार्वजनिक जीवन आणि प्रशासकीय प्रणालींच्या मूलभूत नियमांचीही माहिती नाही, असे त्यांच्या भाषणावरून दिसून आले, याकडे लक्ष वेधत डॉ. जितेंद्रसिंह म्हणाले की, गृहमंत्र्यांनी गोळ्या चालवण्याचा आदेश दिला, असे ते म्हणाले, पण आपल्या आरोपाचे प्रमाणीकरण त्यांना करता आले नाही. कुठेही गोळीबाराचा आदेश हा दंडाधिकारी देत असतो. कुठेही गोळीबार झाला नाही, त्यामुळे कोणी असा आदेश देण्याचा प्रश्नच उदभवत नाही.

## ज्वेलर्स दुकानातून ८४ लाख रुपये व सव्वा किलो सोन्याचा अपहार

### चौघां कामगारांवर गुन्हा दाखल

### मालकाच्या विश्वासाचा घेतला गैरफायदा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै -**

मालकांनी दाखवलेल्या विश्वासाचा गैरफायदा घेऊन चौघा कामगारांनी मिळून ९ वर्षाच्या कालावधीत ८४ लाख ५२ हजार २०० रुपये आणि १२३० ग्रॅम २४ कॅरेट सोन्याचा अपहार केला. ही घटना पूर्व मंगळवार पेठ, येथील जी.पी. गोल्ड ललिता ज्वेलर्स या दुकानात घडली. याप्रकरणी चौघांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे..





मावस भाऊ - रामु व्यंकटेश शेठ (वय ३२, सध्या रा. अफझलपूर, जि. कलबुर्गी), लक्ष्मण व्यंकटेश शेठ (वय ३२, रा. पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर) तसेच कामगार प्रकाश शिवाजी पवार (वय ३४, रा. बेलाटी, ता. उत्तर सोलापूर) आणि विवेक श्रीकांत भंडारकवठेकर (वय २९, रा. हत्तुरे वस्ती, सोलापूर) अशी आरोपींची नावे आहेत. याबाबत व्यापारी गणेश पावसकर (वय ४१, रा. पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर) यांनी आज बुधवारी फिर्याद दिली आहे. गणेश पावसकर यांनी मार्च २०१४ मध्ये दुकानाचे कामकाज, होलसेल सोने खरेदी-विक्री व मनीलँडिंगचा व्यवसाय सांभाळण्यासाठी रामु आणि लक्ष्मण यांना कामावर ठेवले होते. त्यांच्यावर विश्वास ठेवून दुकानातील १३ किलो सोन्याचे भांडवल व व्यवहार सुपूर्द केले होता.नंतर पुढे विवेक भंडारकवठेकर व प्रकाश पवार यांना सेल्समन म्हणून कामावर ठेवले होते.

मार्च २०१४ ते नोव्हेंबर २०२३ या कालावधीत चारही आरोपींनी संगनमत करून दुकानातील नफ्यामध्ये अफरातफर केली. सोने तारण ठेवून मिळणारा नफा व मनीलँडिंगचा नफा स्वतः घेतला. दुकानातील सोन्यावर सराफ व्यापारी गजानन रायकर यांच्याकडे मालकाच्या परस्पर ४००-४०० ग्रॅम च्या दोन भिश्या लावून ८०० ग्रॅम सोने उचलले. ग्राहकांचे ऑनलाईन पैसे विवेक (८ लाख) व प्रकाश (१४ लाख) यांच्या खात्यावर मागवून घेतले. तसेच लोकमंगल को-ऑप बँकेतून २० लाख ७० हजार ५०० रुपये, बँक ऑफ बडोदामधून १० लाख १३ हजार रुपये आणि एलआयसी पॉलिसी/इन्श्युरन्ससाठी ४ लाख ६८ हजार ७०० रुपये दुकानाच्या रोख रकमेतून परस्पर काढून घेतले. एकूण ८४,५२,२०० रुपयांची रक्कम आणि १२३० ग्रॅम २४ कॅरेट सोन्याची फसवणूक करून आरोपींनी अफझलपूर व मंगळवार पेठ येथे स्वतः ची सोन्याची दुकाने सुरू केली. यादरम्यान फिर्यादीने आरोपींकडे हिशोब मागितला असता आरोपींनी शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक सूरज मुलानी हे करीत आहेत.

## महत्त्वाचे

### शेअर बाजार वधारला

**मुंबई** : भारतीय शेअर बाजाराने बुधवारी मजबूत पुनरागमन केले. रिअल्टी क्षेत्र वगळता इतर सर्व क्षेत्रांमधील जोरदार खरेदीमुळे सेन्सेक्स आणि निफ्टी ५० मध्ये एक टक्क्यांची वाढ नोंदवली गेली. जून तिमाहीचे सकारात्मक निकाल आणि आज रात्री जाहीर होणाऱ्या अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हच्या धोरणात्मक निर्णयाबद्दलची उत्सुकता यामुळे गुंतवणूकदारांचे मनोधैर्य उंचावले.

# विनापरवानगी गैरहजेरीनंतर थेट निलंबन

## महिनाभरात शिस्तभंगाची कारवाई करण्याचा आदेश

**मुंबई, २९ जुलै**

सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीशिवाय कार्यालयातून किंवा मुख्यालयातून गैरहजर राहणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर आता कडक कारवाई करण्यात येणार आहे. सामान्य प्रशासन विभागाने यासंदर्भातील शासन आदेश जारी केला असून, अशा बेजबाबदार कर्मचाऱ्यांवर थेट निलंबन आणि शिस्तभंगाची कारवाई करण्याचे सक्त आदेश देण्यात आला आहे.

नव्या निर्देशानुसार, कोणत्याही शासकीय अधिकारी अथवा कर्मचाऱ्याने लेखी पूर्वपरवानगीशिवाय रजेवर जाऊ नये किंवा कर्तव्यावर असताना तसेच रजेच्या काळात मुख्यालय सोडू नये. विनापरवानगी गैरहजर राहिल्यास ती बाब ‘अनधिकृत गैरहजेरी’ मानली जाईल आणि अशा कालावधीसाठी कोणतेही वेतन दिले जाणार नाही. संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी वारंवार विनाअनुमती गैरहजर राहिल्यास त्यांच्यावर थेट निलंबनाची कारवाई प्रस्तावित करण्यात यावी. तसेच, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अशा कर्मचाऱ्यांची माहिती संकलित करून नियुक्ती अधिकाऱ्यांना दिल्यानंतर, अवघ्या एक महिन्याच्या आत शिस्तभंगाची कारवाई सुरू करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

**बेशिस्त खपवून घेतली जाणार नाही**

कार्यालयीन शिस्तीचे काटेकोर पालन व्हावे आणि अशा गैरवर्तणुकीला आळा बसावा, यासाठी शासनाने आता कठोर पावले उचलली आहेत. बेशिस्त खपवून घेतली जाणार नाही, असे यात म्हटले. (तभा वृत्तसेवा)








CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# शहर, जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये गुरुपौर्णिमा साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै-**

ज्ञान आणि सुसंस्कारांची शिदोरी देणाऱ्या गुरुंबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सोलापूर शहरातील विविध शाळा, महाविद्यालय, संस्था, संघटनांमध्ये गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. जिल्ह्यातील विविध प्राथमिक व माध्यमिक शाळा, महाविद्यालये, धार्मिक संस्था आणि सामाजिक संघटनांच्या वतीने गुरुपूजन व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांना व गुरूंना वंदन करून त्यांचे आशीर्वाद घेतले, ज्यामुळे संपूर्ण जिल्हा गुरुवंदनेच्या सुरांनी न्हाऊन निघाला होता.





## उमाबाई श्राविका विद्यालय

उमाबाई श्राविका विद्यालयात गुरुपौर्णिमेचा सण साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात विद्येची आराध्य देवता सरस्वतीच्या फोटोचे प्रतिमा पूजन करून करण्यात आले. उपमुख्याध्यापिका माधवी खोत यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी प्रशालेच्या मुख्याध्यापिका अश्विनी पंडित, उपमुख्याध्यापिका माधवी खोत, मार्गदर्शिका दीप्ती शहा, पर्यवेक्षक बाळासाहेब पोळ यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांना उपयोगी साहित्य व गुलाब पुष्प देऊन सन्मान करण्यात आला. प्रशालेच्या सहशिक्षिका महाडिक यांनी गुरुपौर्णिमेचे महत्त्व सांगितले. इयत्ता आठवीच्या वर्गशिक्षिका सोनाली उंडे व विद्यार्थी यांनी नाटिका सादर केली. याप्रसंगी बेस्ट टीचर अवॉर्ड मिळालेल्या शिक्षकांचाही सन्मान करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनुप कस्तुरे, राजश्री आगरखेड, मीनाक्षी बेळे, क्रीडा शिक्षक सुहास छंचुरे, अभिनंदन उपाध्ये यांनी परिश्रम घेतले.

## मेहता प्राथमिक शाळा



कै. वि. मो. मेहता प्राथमिक शाळेत प्रमुख अतिथी पांडुरंग चौधरी, विद्या जाधव, मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांच्या उपस्थितीत गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली.

प्रथमतः मान्यवरांच्या हस्ते महर्षी व्यास ऋषी व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी श्रुती कुलकर्णी यांनी मंत्रमुग्ध करणारे गुरूगौरव गीत गायले. मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांनी प्रास्ताविक केले. गुरुपौर्णिमेनिमित्त विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांचे पाद्यपूजन केले. इयत्ता ३ री व ४थी मधील सांगोलकर शिवेंद्र, बसरगी ईश्वरी या विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून गुरुविषयी कृतज्ञता व्यक्त केली. सुजाता यादव यांनी मनोगत व्यक्त केले.

शाळा समितीचे अध्यक्ष अनिल बरवे, नियामक मंडळ सदस्य सुरेश मंकणी यांनी सर्व शिक्षकवृंदांना गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या. प्रमुख अतिथींचा परिचय स्वाती मोहरे यांनी करून दिले. सूत्रसंचालन शितल जालीमींचे यांनी केले. तर आभार मयुरी दुरगकर यांनी मानले.



## लक्ष्मी आनंद विद्या मंदिर, टेंभुर्णी

लक्ष्मी आनंद विद्या मंदिर व ज्युनिअर कॉलेज टेंभुर्णी येथे सालाबाद प्रमाणे या वर्षी देखील गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. तसेच सामूहिक गुरु प्रतिज्ञा घेण्यात आली. यावेळी प्रणिता कदम, प्राचार्य विकास करळे यांनी मनोगत व्यक्त केले. संस्थेचे अध्यक्ष योगेश बोबडे, सचिवा सुरजा बोबडे, एस देवकर, प्राचार्य विकास करळे, पीआरओ सागर खुळे उपस्थित होते. सूत्रसंचालन स्वरांजली काळे प्रास्ताविक प्रिया गायकवाड तर आभार गायकवाड हिने आभार मानले.

## हरिभाई देवकरण महाविद्यालय



शाला समिती अध्यक्ष सुरेशबाबु मंकणी यांच्या नेतृत्वाखाली व प्राचार्या स्मिता कांगुणे यांच्या मार्गदर्शनाखाली हरिभाई देवकरण महाविद्यालयात गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य शांतप्पा कुंभार होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार मिलिंद कुलकर्णी उपस्थित होते. पर्यवेक्षक बी. डी. बनसोडे यांनी प्रास्ताविक यांनी केले. यावेळी प्रमुख पाहुणे मिलिंद कुलकर्णी यांचा परिचय प्रा. धन्यकुमार बिराजदार यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. एस. व्ही. पट्टणशेट्टी यांनी केले तर प्रा. वैभव दुध्याल यांनी आभार मानले.



## आंतरराष्ट्रीय प्रार्थनायोग मंडळ

आंतरराष्ट्रीय प्रार्थनायोग मंडळ यांच्या वतीने महातपस्वी श्री कुमारस्वामीजी योगविहार येथे गुरुपौर्णिमा महोत्सव संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित सद्भक्तांच्या सामूहिक प्रार्थनेने झाली. प्रास्ताविक मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र मायनाळ यांनी केले. तसेच आजच्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ज्येष्ठ पत्रकार व निरूपणकार अरविंद जोशी यांचा परिचय करून देत, गुरूप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा पवित्र दिवस असल्याचे सांगितले. यानंतर मंडळाचे उपाध्यक्ष नीलकंठप्पा कोणापुरे यांच्या हस्ते प्रमुख पाहुणे श्री अरविंद जोशी यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. आपल्या निरूपणात अरविंद जोशी यांनी महर्षी व्यास यांच्या जयंतीलाच गुरुपौर्णिमा म्हणून साजरी केली जाते, असे सांगितले. महर्षी व्यासांनी वेदांचे संकलन करून त्यांची ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद अशा चार विभागांत मांडणी केली. तसेच महाभारत आणि श्रीमद्भागवत, महापुराण यांसारख्या महान काव्यांचे निर्मिती करून भारतीय संस्कृतीला अमूल्य असा ज्ञानवारसा दिला, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमासाठी चनबसप्पा अलमेल, सुभाष कुलकर्णी, संतोष मंठाळकर, शिवानंद हिरेमठ, सुभद्रा संकद, संध्याराजनी दानवे, गंगाबाई कुद्री उपस्थित होते. आभार नागनाथ चौगुले यांनी मानले.



## शहा कोठारी प्रशाला

नवलबाई फुलचंद शहा कोठारी हायस्कूल मध्ये गुरुपौर्णिमा कार्यक्रम साजरा करण्यात आला. कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून प्रशालाचे मुख्याध्यापक रमेश यादवाड प्रमुख पाहुणे म्हणून पी.पी. शेटे उपस्थित होते. इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांकडून प्रमुख मान्यवर व सर्व शिक्षकांचे पुष्पवृष्टी करून स्वागत केले. जान्हवी पवार, सृष्टी कोळी, अशिनी कुंभार, प्रेरणा विटकर, जोया इनामदार, गौरी हडपाद, वैष्णवी मनसावले या विद्यार्थिनींनी स्वागतगीत गायन केले. मान्यवरांच्या हस्ते सरस्वती मातेचे पूजन करण्यात आले. गुरु पौर्णिमेचे महत्त्व ब्रह्मेश कोल्याक, सैफ नदाफ, गायत्री कुंभार, विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून सांगितले. सूत्रसंचालन व आभार कोळी, मेलकडे, हडपद, कुंभार, इनामदार, विटकर, बागवान यांनी केले.

## अध्यापिका विद्यालय, बार्शी

अध्यापिका विद्यालय बार्शी येथे गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. सर्वप्रथम सरस्वतीच्या पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर उंबरे, बुराडे, क्षीरसागर, मगर व चव्हाण यांनी स्वागत गीत सादर केले. प्रस्ताविक पल्लवी गिराम यांनी केले. गुरुपौर्णिमेनिमित्ताने प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थिनी प्रतिक्षा जाधव, सानिका मगर, मेहेक बागलकोटे, सीमा सोनवणे, अनुजा बोराडे, मनीषा उंबरे, साक्षी थोरात, आकांक्षा कातुरे, मधुरा बेले, आहेरकर पूजा, तेजल जाधवर, संजीवनी गोसावी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यानंतर प्रमुख पाहुणे प्रा. सोमनाथ देंडे, प्रा. सुभाष माळी, प्रा. प्रमोद मांडे, प्रा. रातिकांत हामणे यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार प्रगती सुदामे यांनी मानले. सूत्रसंचालन अनुसया कदम व प्राची सुदामे यांनी केले.

## आर्या कृषी महाविद्यालय, मानेगाव

आर्या कृषी महाविद्यालय, मानेगाव येथे गुरु पौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन उबाळे होते. यावेळी प्रा. खंडेराव वाघे यांनी प्राचीन भारतीय गुरु-शिष्य परंपरेतील आदर्श, त्याग, शिस्त आणि समर्पण यांची वैशिष्ट्ये विविध ऐतिहासिक व प्रेरणादायी उदाहरणांच्या माध्यमातून उलगडून सांगितली. सूत्रसंचालन अमृता गाडेकर यांनी केले, तर किरण पालकर यांनी आभार मानले.





## लायन्स क्लब, विणकर बाग योगा ग्रुप

लायन्स क्लब इंटरनॅशनल अंतर्गत लायन्स क्लब सोलापूर सिटी व विणकर बाग योगा ग्रुप आयोजित गुरुपौर्णिमा साजरा करण्यात आला. लायन्स क्लब सोलापूर सिटीचे अध्यक्ष व विणकर बागेचे अध्यक्ष लायन मोहन भूमकर यांनी सर्वांचे स्वागत करुन गुरुपौर्णिमेचे शुभेच्छा दिल्या. योगा टीचर जयश्री वाडीकर, दीपा पवार यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास शंकर कणकी, मोहन ताटी, गोपाळ सोमा, कलावती धावरकोंडा, क्षीरसागर उपस्थित होते. आभार सचिव यांनी केले.

## नामसाधना मंडळ, सांगोला



नामसाधना मंडळ, सांगोला यांच्या वतीने गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात आला. पहाटे श्री गोंदवलेकर महाराजांना अभिषेक व काकड आरती संपन्न झाली. स.६.३० ते ८ च्या दरम्यान नामसाधना मंडळाची उपासना व गुरुजनांचा सत्कार कार्यक्रम दत्त मंदिरात पार पडला.

यावेळी हभप सुभाष लऊळकर यांनी ईश्वराच्या खऱ्या रूपाचं दर्शन ज्यांनी घडवलं त्या सद्गुरूंबद्दल मनोमन कृतज्ञता व्यक्त करण्याचा गुरुपौर्णिमा हा दिवस असतो असे सांगत नामाला वेगळे महत्त्व असल्यामुळे नामसाधनेत जास्तीत जास्त भक्तांनी सहभाग वाढवावा असे आवाहन केले. याप्रसंगी शिक्षक चारुदत्त जगताप, भागवत भाटेकर, सरला खाडे-शिर्के, सुनिल लिगाडे, औदुंबर चंदनशिवे, नूतन डांगरे, राजेश्वरी कोरे, सुनिल डिगोळे, स्नेहा महिमकर, मनोज उकळे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंजि.संतोष भोसले, सूत्रसंचालन विष्णू राऊत यांनी केले. संध्याकाळी हभप. वासुदेवबुवा जोशी यांचे नारदीय कीर्तनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## वामनराव शिंदे साहेब आदर्श विद्यालय, सांगोला

सांगोल्यातील वामनराव शिंदे साहेब आदर्श विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस संस्थापक वामनराव शिंदे व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण संस्थाध्यक्षा कौशल्यादेवी शिंदे, माणदेशी साहित्यिक म.ज.घोंगडे, मुख्याध्यापक विठ्ठलपंत शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. मनोगतात म.ज.घोंगडे यांनी मनोगत व्यक्त यावेळी ऋतुजा उबाळे, सोफिया पठाण, ईश्वर चव्हाण, रोहन निंबाळकर, नेहा ठोकळे, जितू निंबाळकर या विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. प्रास्ताविक अर्चना गोडसे, सूत्रसंचालन ताई भालके यांनी केले. आभार विठ्ठलपंत शिंदे यांनी मानले.



## शंकरराव निंबाळकर विद्यालय, बार्शी

शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयात गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रतिमापूजन प्राचार्य डॉ. दीपक गुंड व सर्व स्टाफ यांच्या हस्ते आले. या कार्यक्रमप्रसंगी प्रथम व द्वितीय वर्षांमध्ये शिकत असलेल्या छात्राध्यापकांनी आपली मनोगत व्यक्त केली. त्यात गायकवाड सह्याद्री, घाडगे वर्षा, आरती चव्हाण, सलगर त्रिशला, बरबडे साक्षी, विभुते नंदिनी, अथर्व स्वामी तसेच आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. दीपक गुंड यांनी गुरुपौर्णिमा विषयी विद्यार्थ्यांना गुरुजींचे महत्व सांगितले. आभार जगताप राजश्री यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन कोरेकर ऋतुजा व गायकवाड राजश्री यांनी केले.

## सांगोला विद्यामंदिर, सांगोला

सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु. कॉलेज येथे गुरूपौर्णिमेचे औचित्य साधून शिक्षक गुरुजनांचा सत्कार संपन्न झाला. कार्यक्रमाच्या सुरूवातीला आद्यगुरु महर्षी व्यास व संस्थेचे संस्थापक कै.बापूसाहेब झपके यांच्या तैलचित्रास संस्थाध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



यावेळी सकाळ सत्र उन्मेश आटपाडीकर, दुपार सत्र वसंत गुळिमरे यांनी गुरुमहात्म्य विषद केले. याप्रसंगी प्राचार्य चारुदत्त जगताप, उपमुख्याध्यापक प्रदीप धुकटे, उपप्राचार्य शिवशंकर तटाळे, पर्यवेक्षक उत्तम सरगर, काकासो नरूटे, नरेंद्र होनराव, प्रा. धनाजी चव्हाण उपस्थित होते. प्रा. प्रबुद्धचंद्र झपके यांनी गुरु-शिष्याच्या नात्याला उजाळा देत संस्थेचे सचिव मल्लिकार्जुन घोंगडे यांचा सर्वप्रथम सन्मान केला.

प्रास्ताविक चारुदत्त जगताप, प्रदीप धुकटे, सूत्रसंचालन प्रा.माधुरी पैलवान, चैतन्य कांबळे यांनी केले. आभार शिवशंकर तटाळे, काकासो नरूटे यांनी मानले.

---

## महत्वाचे...

## परिस्थितीजन्य पुरावा आधारीत खटल्यात पुराव्याची कडी परिपूर्ण असणे महत्वाचे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै-**

**सोलापूर न्यायालयाचा महत्वपूर्ण निकाल**

परिस्थितीजन्य पुरावा आधारीत खटला शाबितीसाठी परिस्थितीजन्य पुराव्याची कडी परिपुर्ण असणे महत्वाचे असते असे मत व्यक्त करुन तब्बल अडीच वर्षापासुन कारागृहात असलेले उत्तर प्रदेशचे रहिवासी असलेले संजयसिंह रतनसिंह व त्यांची पत्नी नितु संजयसिंह यांची सोलापूर न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली.

कोण्हेरी (ता. मोहोळ) येथील हॉटेलमध्ये संजयसिंह रतनसिंह व त्यांची पत्नी कामास होते. त्याच हॉटेलमध्ये कामास आलेल्या उत्तर प्रदेशमधीलच संतोषसिंग याच्याबरोबर भांडण झाल्याने पती पत्नींनी दि. २०/०३/२०२४ रोजी संतोषसिंग याचा नॉयलॉन दोरीने गळा आवळुन खुन केला असे सरकार पक्षाचे म्हणणे होते. आरोपी विरुध्द सादर करण्यात आलेल्या परिस्थितीजन्य पुराव्याची कडी परिपुर्ण नाही व अशा खटल्यातील घटना शाबितीबद्दलच्या सर्वोच्च न्यायालयाने शरद सारडा वि. महाराष्ट्र सरकार या खटल्यातील निकाल पत्रात नमुद केलेल्या पंचशिल तत्वाच्या निकषात बसत नाही असा युक्तिवाद बचाव पक्षातर्फे करण्यात आला होता. या खटल्यात आरोपीतर्फे अॅड. धनंजय माने, अॅड. जयदीप माने, अॅड. प्रणित जाधव, यांनी काम पाहिले.



## ज्योती साळूंखे यांच्या वतीने वटवृक्ष मंदीरातील सेवेकऱ्यांना ब्लँकेटचे वाटप

**अक्कलकोट, दि. २९ जुलै-**

मुंबई येथील स्वामी भक्त कै. दिपक साळूंखे यांच्या स्मरणार्थ येथील श्री. वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान मध्ये ज्योती साळुंखे वटवृक्ष मंदीरातील सेवेकऱ्यांना ब्लँकेटचे वाटप करून हा सेवाभावी उपक्रम श्री स्वामी समर्थांच्या चरणी अर्पण केला. श्री स्वामी समर्थांचे आशिर्वाद म्हणून मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी ज्योती साळुंखे व सहकारी मनीषा हुले, अश्विनी कंटीकर, श्रध्दा साळूंखे, दर्शना राणे, मालती गायकवाड, आकांक्षा राणे, सरिता कुलकर्णी यांचा सत्कार केला. यावेळी मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, विपूल जाधव, मनोज जाधव, शिवाजी गुजर, प्रसाद सोनार, नरेंद्र शिर्के, चंद्रकांत कवटगी, सागर गोंडाळ, काशिनाथ इंडे, गणेश इंगळे, रविराव महिंद्रकर, अविनाश क्षीरसागर, रमेश होमकर, श्रीकांत मलवे, गिरीश पवार उपस्थित होते.



## 'आपुलकी'तर्फे ३९० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व सायकलींचे वाटप

**सांगोला, दि. २९ जुलै-**

सामाजिक बांधिलकी जपत आपुलकी प्रतिष्ठान, सांगोला व विविध देणगीदारांच्या सहकार्याने शहर व तालुक्यातील गरजू विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य व सायकल वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमातून ३९० विद्यार्थ्यांना सुमारे ३१ हजार रुपये किमतीचे विविध शालेय साहित्य वितरित करण्यात आले. तसेच शिक्षणासाठी दूरवरून पायी प्रवास करणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींची गैरसोय दूर करण्यासाठी विविध भागातून जमा झालेल्या १८ जुन्या सायकलींची दुरुस्ती करून तसेच ११ नवीन सायकली गरजू विद्यार्थ्यांना भेट देण्यात आल्या. अशा प्रकारे शैक्षणिक साहित्य, जुन्या सायकलींची दुरुस्ती आणि नवीन सायकलींचे वाटप यावर सुमारे ९० हजार रुपये खर्च करण्यात आला. हा उपक्रम सांगोला शहरासह जि.प.प्रा.शाळा बंडगरवाडी (शिरभावी), जि.प.प्रा.शाळा बागलवाडी, जि.प.प्रा.शाळा सांगोलकर वस्ती (तरंगेवाडी), जि.प.प्रा.शाळा शेळके वस्ती (शिवणे), निजामपूर हायस्कूल आणि जि.प.प्रा.शाळा खांडेकर वस्ती (नवी, महूद) येथील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात आला. तसेच डोंगरगाव येथील गरजू विद्यार्थ्यांनाही शैक्षणिक साहित्य घरपोच देण्यात आले.



## मोडनिंब येथे बालदिंडी उत्साहात

**मोडनिंब, दि. २९ जुलै-**

मोडनिंब (ता.माढा) येथे आषाढी एकादशीनिमित्त जिल्हा परिषद शाळा, श्री दत्त बहुउद्देशीय विकास मंडळ अरण संचलित, संजीवन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय एस. एस. प्राथमिक विद्यामंदिर व वसुंधरा इंग्लिश मीडियम स्कूल मोडनिंब येथे दिंडी सोहळा उत्साहात झाला. या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.कार्यक्रमाची सुरुवात श्री विठ्ठल रुक्मिणी यांच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन व संतांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. संजीवन विद्यालयात श्री विठ्ठल-रुक्मिणीची महाआरती श्री. व सौ. पाटणे व श्री. व सौ. पुरवत परिवाराच्या हस्ते झाली. दिंडीत विद्यार्थ्यांनी वारकरी परंपरेचे आकर्षक वेषभुषेचे दर्शन घडविले. दिंडीत विद्यार्थ्यांच्या हातात पर्यावरण संरक्षण, वृक्षलागवड, जलसंवर्धन, स्वच्छता, सामाजिक ऐक्य, व्यसनमुक्ती आणि संतविचरांचे फलक होते.



बार्शीतील बंद असलेल्या बार्शी टेक्स्टाईल मिलमधील कामगारांच्या प्रलंबित वेतन व इतर देयकाबाबत राष्ट्रीय गिरणी कामगार संघाचे प्रमुख तथा विधानपरिषद उपसभापती सचिन अहिर यांना भेटून सविस्तर चर्चा केली. हा प्रश्न निकाली काढण्याचे आश्वासन अहिर यांनी दिले आहे. - **दिलीप सोपल**, आमदार, उबाठा



माझ्या लक्षात आलंय की, काही तथाकथित स्त्रीवादी आणि न्यूज अँकर्स मला शिस्तीचे धडे देण्याचा प्रयत्न करत आहेत. सार्वजनिक ठिकाणी इतरांच्या भावना, श्रद्धा किंवा समजुती दुखावणे म्हणजे स्वातंत्र्य नव्हे. - **कंगना रनौत**, खासदार, भाजपा

# अमेरिका-सौदीचे इराकमधील दहशतवाद्यांवर भीषण हल्ले

**जॉर्डनने रोखली इराणची क्षेपणास्त्रे**



दियाला प्रांतातील मुकदादिया येथे झालेल्या हल्ल्याच्या ठिकाणी शोधमोहीम राबवताना इराकी सुरक्षा आणि आपत्कालीन पथके

**कैरो, २९ जुलै**

मध्यपूर्वेतील अमेरिकन सैन्यावर डागण्यात आलेला इराणचा क्षेपणास्त्र मारा परतवून लावल्याचे अमेरिकन लष्कराने जाहीर केल्यानंतर काही तासांतच, बुधवारी पहाटे इराणकडून डागण्यात आलेली पाच क्षेपणास्त्रे जॉर्डनच्या हवाई संरक्षण यंत्रणेने हवेतच नष्ट केली, अशी माहिती जॉर्डनच्या लष्कराने दिली. या घटनांमुळे संघर्षातील काही काळाचा विराम खंडित झाला आहे. दुसरीकडे अमेरिका आणि जॉर्डनने इराकमधील दहशतवाद्यांवर हल्ले केले.

क्षेपणास्त्रांचा मारा रोखून ती नष्ट करण्यात आली, असे जॉर्डनच्या लष्कराने सांगितले. इराणचे निमलष्करी रिव्होल्युशनरी गार्ड्या 'एरोस्पेस फोर्स'ने जॉर्डनमधील 'मुवाफ्फर साल्टी' या वायुतळावर आणि अमेरिकी लष्कराच्या सेंट्रल कमांडच्या मुख्यालयावर बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागली, इराणच्या सरकारी आयआरएनए वृत्तसंस्थेने रिव्होल्युशनरी गार्ड्या निवेदनाचा हवाला देत जारी केलेल्या निवेदनात म्हटले.

अमेरिकी सैन्य सतर्क आणि उच्च सज्जतेच्या स्थितीत आहे, अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने सांगितले. तसेच तेहरानचा पाठिंबा असलेल्या बंडखोर गटांनी अलिकडच्या काळात हल्ले करण्यासाठी वापरलेल्या इराकातील ठिकाणांवर प्रहार करण्यासाठी त्यांनी सौदी अरेबियाच्या सैन्यासोबतही काम केल्याची माहिती सेंट्रल कमांडने दिली. अमेरिकन सैन्यावर किंवा सौदी अरबच्या ऊर्जा पायाभूत सुविधांवर आणखी हल्ले झाल्यास अतिरिक्त कारवाई केली जाऊ शकते, असा इशारा इराकमधील हल्ल्यांची घोषणा करताना अमेरिकेने दिला. अमेरिका आणि सौदी अरबच्या हल्ल्यानंतर इराकी पंतप्रधान अली अल-झैदी यांनी या हल्ल्यानंतर चर्चा करण्यासाठी बुधवारी देशाच्या राष्ट्रीय सुरक्षा परिषदेची आपत्कालीन बैठक बोलावली.

अमेरिका आणि इराण यांच्यात शांततेचा एक काळ अनुभवला गेला; पर्शियन आखातातील होर्मुझच्या सामुद्रधुनी या मोक्याच्या जलमार्गावरून आणि अरुंद सागरी मार्गावरून तणाव वाढण्याच्या काही आठवड्यांनंतर, या शांततेच्या काळात दोन्ही बाजूंनी सुमारे तीन दिवस कोणत्याही हल्ल्याची घोषणा केली नाही. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर विविध आघाड्यांवरून दबाव वाढलेला असतानाच, महिन्याच्या अखेरीस हा संघर्ष पुन्हा तीव्र झाला. गेल्या काही आठवड्यांत या संघर्षादरम्यान अमेरिकेचे चार सैनिक मृत्युमुखी पडले, तर दुसरीकडे या संघर्षाचा वाढता खर्च भागवण्यासाठी पेंटागॉनने अमेरिकन काँग्रेसकडे निधीची मागणी केली. (वृत्तसंस्था)

### दहशतवाद्यांची रसद-शस्त्रसाठ्यांवर हल्ला

गेल्या ७२ तासांत आयआरजीसी-निर्देशित ३० पेक्षा जास्त हवाई ड्रोन हल्ल्यांना जोरदार प्रत्युत्तर म्हणून अमेरिका आणि सौदीच्या लढाऊ विमानांनी पूर्व इराकमधील अनेक दहशतवादी रसद आणि शस्त्रसाठा ठिकाणांवर हल्ला केला, असे अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने म्हटले आहे.

### होर्मुझमध्ये टँकरवर हल्ला

होर्मुझच्या सामुद्रधुनीत तेल वाहून नेणाऱ्या तीन टँकर्स रोखण्याचा प्रयत्न करण्यात आला. वारंवार इशारा दिल्यानंतरही दुर्लक्ष केले तसेच असुरक्षित मार्गावर बेकायदेशीररीत्या प्रवास सुरूच ठेवल्याने त्यांच्यावर हल्ला करण्यात आला, असा दावा रिव्होल्युशनरी गार्डच्या नौदलाने बुधवारी केला. बुधवारी होर्मुझमध्ये टँकर्सवर झालेल्या कोणत्याही हल्ल्याबाबत त्वरित स्वतंत्र दुजोरा मिळाला नाही.

## 'फाशी झाली तरी बेहत्तर; मायदेशी परतणारच'

**नवी दिल्ली, २९ जुलै**

अटक, तुरुंगवास किंवा फाशी झाली तरी, मी डिसेंबरपर्यंत मायदेशी परतणार आहे. आता कोणत्याही परिस्थितीत मागे हटणार नाही, अशी घोषणा बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांनी बुधवारी केली.



समाज माध्यमावरील पोस्टमध्ये त्यांनी म्हटले की, मायदेशी परतल्यानंतर जे काही होईल त्याला सामोरे जाण्याची माझी तयारी आहे. बांगलादेशात जाताच माझी हत्या होऊ शकते. मला अटक होऊ शकते आणि मला तुरुंगात पाठवले जाऊ शकते. तरीही, मला परत यायचे आहे कारण माझे लोक मला बोलवत आहेत. मला फासावर चढवले जाईल, याची मला पर्वा नाही. न्यायालयीन लढा लढण्याची माझी तयारी आहे. माझ्या पक्षाच्या नेत्यांवर आणि कार्यकर्त्यांवर अत्यंत दडपशाही केली जात आहे. जर मृत्यू येणार असेल, तर तो माझ्या स्वतःच्या भूमीत यावा, जिथे माझ्या आई-वडिलांना दफन केले आहे आणि जिथे त्यांचे रक्त सांडले होते. (वृत्तसंस्था)

# भारताने आम्हाला मदत करावी

## व्याप्त काश्मिरातील नागरिकांचे आवाहन



पाकिस्तानी सरकारविरोधात आंदोलन करताना व्याप्त काश्मिरातील नागरिक

**मुझफ्फराबाद, २९ जुलै**

पाकिस्तानी लष्कर आणि रेंजर्स व्याप्त काश्मीरमधील आंदोलने दडपण्यासाठी क्रूर बळाचा वापर करत आहेत. पाकिस्तानी सुरक्षा दल निःशस्त्र आंदोलकांवर गोळीबार करत असून, २४ तासांत बेछूट गोळीबारात ३० नागरिकांचा मृत्यू झाला. भारतीय लष्कराने हस्तक्षेप करून आम्हाला मदत करावी, असे आवाहन आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या जॉइंट आवामी ॲक्शन कमिटीने (जेएएसी) केले आहे.

आंदोलन दडपण्यासाठी पाकिस्तानी लष्कराकडून हत्येचे सत्र सुरू आहे, मृतकांची आकडेवारी लपवण्यासाठी मारलेल्या लोकांचे मृतदेह अज्ञातस्थळी नेले जात आहे. मानवतेला काळीमा फासण्याचा प्रकार पाकिस्तानी सरकार आणि लष्कराकडून सुरू असल्याचा आरोप जेएएसीने जारी निवेदनातून केला. भारतीय लष्कराने आम्हाला मदत करण्यासाठी पुढे यावे आम्ही भारतासोबत मिळून पाकिस्तानविरोधात संघर्ष पुकारण्यासाठी सज्ज आहे. आमच्या काश्मिरात रक्तपात सुरू आहे. जागतिक संघटना अत्याचार रोखण्यासाठी कुचकामी ठरल्या असून, आम्हाला आता भारताच्या मदतीची आशा असल्याचे जेएएसीने म्हटले आहे.

पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी व्याप्त काश्मिरातील आंदोलक पाकिस्तानचे शत्रू असल्याचा आरोप केला. (वृत्तसंस्था)

### आंदोलकांचे मृतदेह पळविले

गेल्या दोन दिवसांत पाकिस्तानी सुरक्षा दलांच्या गोळीबारात ३० जण ठार झाले आहेत. मृतकांची संख्या लपवण्यासाठी पाकिस्तानी लष्कराने अनेक मृतदेह अज्ञातस्थळी नेले. रावलाकोट येथून मुजफ्फराबादकडे जाणाऱ्या आंदोलकांच्या मोर्चावर बेछूट गोळीबार केला. आतापर्यंत दीडशे आंदोलक जखमी झाले असून, त्यांच्यावर उपचारासाठी रुग्णालयात औषधी नाही. पाकिस्तानी लष्कराने संपूर्ण भागात १० अतिरिक्त तुकड्या तैनात केल्या. सशस्त्र पोलिस दल आणि निमलष्करी दलालाही पाचारण करण्यात आले. त्यांनी संपूर्ण व्याप्त काश्मिरात कलम १४४ लागू करून इंटरनेट सेवा बंद केल्याचा आरोप जेएएसीने केला आहे.

# करार करावा अन्यथा विध्वंसासाठी तयार राहावे

## ट्रम्प यांची इराणला धमकी, पूल-वीज प्रकल्पांवर हल्ल्याचा इशारा

**वॉशिंग्टन, २९ जुलै**

इराणने करारासाठी वाटाघाटी सुरू कराव्या अन्यथा त्यांना मोठ्या विध्वंसाला सामोरे जावे लागेल. त्यांच्या महत्त्वाच्या पायाभूत सुविधा आमच्या लक्ष्यावर आहे. येणाऱ्या काळात इराणमधील महत्त्वाचे पूल-वीज प्रकल्पावर मोठे हल्ले केले जातील, असा इशारा राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे.

एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत ट्रम्प म्हणाले, इराणने वाटाघाटीसाठी पुढाकार घेतला नाही, तर अमेरिका आता अखेरचा मोठा हल्ला करेल. त्यांना पुनर्बांधणीसाठी अनेक वर्षे लागतील. अमेरिकेचे सैन्य माझ्या आदेशाची वाट पाहत आहे. मी निर्णय घेतल्यास संपूर्ण इराण उद्ध्वस्त होऊ शकतो.

अमेरिकन लष्कराच्या लक्ष्यावर त्यांची ऊर्जा प्रकल्प, पायाभूत सुविधा आहे. वीज प्रकल्प उभारणे हे सर्वात कठीण काम आहे आणि पूल बांधणे हे सर्वात जास्त वेळ घेणारे काम आहे.

या सुविधांवर हल्ला केल्यास इराणच्या अर्थव्यवस्थेवर आणि लष्करी क्षमतेवर दूरगामी परिणाम होऊ शकतात, कारण त्यांची पुनर्बांधणी करण्यासाठी अनेक वर्षे लागतील. आम्ही जल शुद्धीकरण प्रकल्पांना लक्ष्य न करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे सामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागू शकते. अमेरिका आधीच इराणच्या अणु संबंधित हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवून आहे आणि त्यांना कोणत्याही अतिरिक्त माहितीची आवश्यकता नाही. (वृत्तसंस्था)

### चित्रपट वार्ता

#### सलमान खानची पूरग्रस्तांना मदत



**मुंबई :** आसाममध्ये आलेल्या भीषण पुरामुळे मोठे संकट निर्माण झाले असून, राज्यातील अनेक भाग जलमय झाले आहेत. या आपत्तीच्या काळात पुरात अडकलेल्या नागरिकांच्या मदतीसाठी विविध स्तरांतून मदतीचा ओघ सुरू आहे. बॉलिवूड अभिनेता सलमान खानही पूरग्रस्तांच्या मदतीसाठी पुढे आला आहे. पूरग्रस्तांना मदत पोहोचवण्यासाठी सलमानने आसाममधील आपल्या एका फॅन क्लबसोबत हातमिळवणी केली आहे. ही मदत त्याच्या 'बीइंग ह्यूमन'या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून केली जात आहे.या मदत मोहिमेची सुरुवात पूरग्रस्तांना बिस्किटे, गूळ, मुरमुरे आणि ब्रेड यांसारख्या तातडीने खाता येणाऱ्या खाद्यपदार्थांच्या वाटपाने करण्यात आली आहे. २५ जुलै रोजी आसामी गायक पापन यांनी विशाल ददलानी, दिव्या कुमार आणि निलोत्पल बोरा यांच्यासोबत इन्स्टाग्रामवर 'लाइव्ह चॅरिटी कॉन्सर्ट'चे आयोजन केले होते. या माध्यमातून त्यांनी सुरू असलेल्या मदतकार्यासाठी नागरिकांना योगदान देण्याचे आवाहन केले.

#### बापूजींच्या भूमिकेसाठी २८३ वेळा मुंडण



**मुंबई :** सब टीव्हीवरील लोकप्रिय मालिका 'तारक मेहता का उल्टा चष्मा'ने तब्बल १८ वर्षांचा यशस्वी प्रवास पूर्ण केला आहे. २८ जुलै २०१८ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला आलेल्या या मालिकेने गेल्या अनेक वर्षांत प्रेक्षकांच्या मनात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. मालिकेची लोकप्रियता आजही कायम असून, १८ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने निर्माते असित कुमार मोदी यांनी कलाकारांसोबत सेटवर मोठा जल्लोष केला. या खास सेलिब्रेशनच्या वेळी मालिकेतील कलाकारांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी जेठालालच्या वडिलांची भूमिका साकारणारे अभिनेते अमित भट्टही उपस्थित होते. बापूजींच्या भूमिकेसाठी अमित भट्ट यांनी एक-दोन नव्हे, तर तब्बल २८३ वेळा मुंडण केल्याचा खुलासा त्यांनी केला होता. त्यानंतर एका एपिसोडमध्ये त्यांनी गांधी टोपी घातली आणि तेव्हापासून त्यांचा हा खास लूक मालिकेचा अविभाज्य भाग बनला. मीडिया रिपोर्टनुसार, अमित भट्ट यांना एका भागासाठी ८० हजार रुपये मानधन मिळते.

#### 'कमळी'मध्ये शशांक केतकरची दमदार एन्ट्री



**मुंबई :** झी मराठीवरील लोकप्रिय मालिका 'कमळी' नेहमीच समाजातील वास्तववादी विषयांना कथानकाच्या माध्यमातून स्पर्श करत आली आहे. आता मालिकेत विद्यार्थी आणि पालकांच्या आयुष्याशी थेट संबंधित असलेल्या शिक्षण व्यवस्थेतील वाढता व्यावसायिक दृष्टिकोन या महत्त्वाच्या विषयावर भाष्य करण्यात येणार आहे. या नव्या कथानकाला अधिक प्रभावी वळण देण्यासाठी मालिकेत एका दमदार पात्राची एन्ट्री होणार असून, अभिनेता शशांक केतकर 'रितेश सरपोतदार' ही भूमिका साकारताना दिसणार आहे. 'कमळी'च्या कथेत प्रवेश करणारे रितेश सरपोतदार हे पात्र शिक्षण क्षेत्रातील महत्त्वाकांक्षा, स्पर्धा आणि व्यवसायीकरणाचे प्रतिनिधित्व करणारे आहे. या भूमिकेबद्दल बोलताना शशांक केतकरने झी मराठीवर पुन्हा परतताना आनंद व्यक्त केला. 'कमळी'सारख्या लोकप्रिय मालिकेचा भाग होण्याची संधी मिळाल्याबद्दल त्यांनी झी मराठी, निर्माते आणि प्रेक्षकांचे आभार मानले.

## रेल्वे विकासाला मिळणार 'बुलेट' गती

**मुंबई, २९ जुलै**

मुंबई उपनगरीय रेल्वे प्रवाशांना अधिक दर्जेदार आणि सुलभ सेवा देण्यासाठी पायाभूत सुविधांचा वेग वाढवला जाणार आहे. यासाठी 'मुंबई रेल्वे विकास महामंडळ मर्यादित' (एमआरव्हीसी) या कंपनीचे अधिकृत समभाग भांडवल २५ कोटींवरून थेट ५०० कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाने आज मंजुरी दिली.

एमआरव्हीसीची स्थापना १९९९ मध्ये झाली असून, यात रेल्वे मंत्रालय आणि महाराष्ट्र शासन यांची ५१:४९ अशी भागीदारी आहे. (वृत्तसंस्था)




देशभरात २९ जुलै हा व्याघ्र दिन म्हणून साजरा करण्यात आला. जंगलाचे वैभव असलेला वाघ वाचला पाहिजे, असा संदेश देताना बंगलुरू येथील एका शाळेतील मुले

# दिवंगत मनमोहनसिंग यांच्याविरुद्धचा खटला रद्द

## कोळसा खाण प्रकरण; 'क्लोजर रिपोर्ट' स्वीकारला

**नवी दिल्ली, २९ जुलै**

कोळसा खाण वाटप प्रकरणातील माजी पंतप्रधान दिवंगत मनमोहन सिंग यांच्याविरुद्धचा फौजदारी खटला सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी बंद केला आणि त्यांच्याविरुद्ध जारी करण्यात आलेला समन्सही रद्द केला.

२७ डिसेंबर २०२४ रोजी निधन झालेले सिंग आता या गाजलेल्या फौजदारी खटल्यातून अधिकृतपणे निर्दोष मुक्त झाले आहेत. सरन्यायाधीश सूर्य कांत प्रमुख आणि न्या. जॉयमाल्य बागची व न्या. व्ही. मोहना यांचा समावेश असलेल्या न्यायासनाने माजी पंतप्रधान आणि इतरांना 'क्लीन चिट' देणारा सीबीआयचा 'क्लोजर रिपोर्ट' स्वीकारला. सीबीआयचा 'क्लोजर रिपोर्ट्स' फेटाळून लावून त्यांची दखल घेण्याचे कोणतेही कारण सत्र न्यायालयाच्या न्यायाधीशांकडे नव्हते, असे न्यायालयाने म्हटले.

अपीलकर्त्यांच्या दुर्दैवी निधनामुळे हे अपील निष्फळ ठरवून निकाली काढता आले असते. परंतु, विशेष न्यायाधीशांनी प्रकरणाची दखल घेणे आणि अपीलकर्त्यांना समन्स बजावणे या बाबींचा विचार करण्याच्या उद्देशाने, आम्ही सीबीआयने सादर केलेले दोन्ही 'क्लोजर रिपोर्ट्स' तपासले आहेत. तपास यंत्रणेचे अहवाल स्वीकारण्याबाबत या न्यायालयाने वेळोवेळी निश्चित केलेल्या संबंधित निकषांचा विचार करता, सीबीआयचा 'क्लोजर रिपोर्ट्स' फेटाळून लावण्याचे आणि त्याची दखल घेण्याचे कोणतेही कारण संबंधित न्यायाधीशांसमोर नव्हते, आणि आम्ही त्यांना खात्री पटली आहे. आम्ही हे अपील मंजूर करीत आहोत आणि संबंधित निकाल रद्द करत आहोत, असे न्यायासनाने म्हटले.

२००५ मध्ये ओडिशामधील 'तालाबिरा-२' कोळसा खाण क्षेत्राच्या (ब्लॉक) वाटपाशी संबंधित कोळसा घोटाळ्याच्या प्रकरणात, एका विशेष न्यायालयाने सिंग, उद्योगपती कुमार मंगलम बिर्ला, कोळसा विभागाचे माजी सचिव पी. सी. पारख आणि अन्य तिघांना आरोपी म्हणून समन्स बजावले. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप केला आणि त्या निर्देशाला स्थगिती दिली. (वृत्तसंस्था)

# जे क्लेटन अमेरिकेचे नवे गुप्तचर संचालक

**वॉशिंग्टन, २९ जुलै**

जे क्लेटन यांना अमेरिकेच्या नवीन गुप्तचर संचालकपदी नियुक्त केल्याच्या वृत्ताला अमेरिकी सिनेटने दुजोरा दिला असून, राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या नामांकनास विलंब करण्याचा प्रयत्न केला होता.

न्यू यॉर्कच्या 'सदर्न डिस्ट्रिक्ट'चे अमेरिकन ॲटर्नी आणि 'सिक्युरिटीज अँड एक्सचेंज कमिशन'चे माजी अध्यक्ष असलेल्या क्लेटन यांच्या नियुक्तीवर ५१ विरुद्ध ४७ अशा मतांनी शिक्कामोर्तब करण्यात आले. पक्षीय धोरणांनुसारच त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. रिपब्लिकन्सना सुरुवातीला जूनमध्ये क्लेटन यांच्या नियुक्तीला मंजुरी मिळण्याची आशा होती; परंतु माजी संचालक तुळसी गॅबार्ड यांनी राजीनामा दिल्यानंतर, त्या पदासाठी तात्पुरते निवडलेले बिल पल्ट यांना काही आठवडे काम पाहण्याची संधी मिळावी, यासाठी ट्रम्प यांनी क्लेटन यांच्या सुनावणीस विलंब केला. दोन्ही पक्षांच्या सिनेटर्सनी पल्ट यांच्याबाबत चिंता व्यक्त केली. पल्ट हे गृहनिर्माण क्षेत्रातील माजी नियामक असून, त्यांना गुप्तचर क्षेत्राचा कोणताही अनुभव नव्हता. या महिन्याच्या सुरुवातीला ट्रम्प यांनी व्हाईट हाऊसमधून केलेल्या भाषणात २०२० च्या निवडणुकीतील खोट्या दाव्यांचा पुनरुच्चार केला. (वृत्तसंस्था)



# रशियाकडून तेल खरेदी भोवणार

## अमेरिका आकारणार शंभर टक्के शुल्क, सिनेटमध्ये विधेयक मंजूर

**वॉशिंग्टन, २९ जुलै**

रशियाकडून कच्चे तेल, नैसर्गिक वायू (एलपीजी-एलएनजी) खरेदी करणाऱ्या देशांवर शंभर टक्के शुल्क आकारणे आणि रशियावर अमर्याद निर्बंध लादण्याचे अधिकार राष्ट्राध्यक्षांना देणारे विधेयक अमेरिकेच्या सिनेटमध्ये बुधवारी पारित झाले. यामुळे रशियन तेलाची आयात करणाऱ्या भारत, चीनसह इतर चार देशांवर शुल्क आकारण्याचा मार्ग मोकळा झाला. विधेयकाच्या समर्थनार्थ झालेल्या मतदानात ८६ मते बाजूने आणि १२ मते विरोधात पडली.

रशियावरील निर्बंधांशी संबंधित हे विधेयक दिवंगत सिनेटर लिंडसे ग्रॅहम यांनी तयार केले होते. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की अमेरिकेच्या दौऱ्यावर असतानाच हे विधेयक सिनेटमध्ये पारित झाले. या विधेयकाचा उद्देश रशियन तेल खरेदीवर निर्बंध लादणे आणि भारत, चीन, स्लोव्हाकिया, हंगेरी आणि अझरबैजानसह रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या देशांवर शुल्क लावण्यास मान्यता देणे हा आहे.

या विधेयकाला दोन्ही पक्षांच्या सिनेट सदस्यांकडून पाठिंबा मिळाला आहे, परंतु त्याचे अद्याप कायद्यात रूपांतर झालेले नाही. त्याला सिनेटमध्ये पुढील टप्पे पार करावे लागतील. सिनेटने पूर्ण मंजुरी दिल्यानंतर, ते विचारासाठी कनिष्ठ सभागृह, म्हणजेच प्रतिनिधीगृहासमोर (हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हस) सादर केले जाईल. या कायद्यातील सर्वात महत्त्वपूर्ण तरतुदींपैकी एक म्हणजे रशियाकडून ऊर्जा खरेदी करणाऱ्या देशांवर शुल्क लादणे आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष भारत आणि चीनसह, रशियाकडून तेल आणि वायू खरेदी करणाऱ्या देशांकडून आयात वस्तूंवर १०० टक्क्यांपर्यंत शुल्क लावू शकतील. (वृत्तसंस्था)

### आर्थिक कोंडीचा प्रयत्न

रशियाकडून कच्चे तेल खरेदी करणारा देश असलेल्या भारताला, या दबावामुळे आपल्या ऊर्जेच्या गरजा आणि अमेरिकेसोबतचे व्यापारी संबंध यांच्यात संतुलन साधण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. युक्रेनविरुद्ध संघर्ष रोखण्यासाठी रशियावर आर्थिक दबाव वाढवणे हा या विधेयकाचा उद्देश आहे. चीननंतर भारत हा रशियाच्या कच्च्या तेलाचा दुसरा सर्वात मोठा खरेदीदार असल्याने आगामी काळात भारतासमोर नवे आव्हान उभे राहू शकते.

## सुनील आनंद यांचे लंडनमध्ये निधन

**मुंबई, २९ जुलै**

हिंदी चित्रपटसृष्टीतील दिग्गज दिवंगत अभिनेते देव आनंद यांचे पुत्र सुनील आनंद (७०) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. विशेष म्हणजे, लंडनमधील ज्या रुग्णालयात देव आनंद यांनी अखेरचा श्वास घेतला होता, त्याच रुग्णालयात सुनील आनंद यांचीही प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाची माहिती आनंद कुटुंबीयांनी अधिकृत पत्रकाद्वारे दिली. अंत्यसंस्काराबाबत अद्याप कुटुंबीयांकडून कोणतीही माहिती जाहीर करण्यात आलेली नाही.

सुनील आनंद यांनी १९८४ मध्ये देव आनंद दिग्दर्शित 'आनंद और आनंद' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# धोका अद्याप संपलेला नाही...

माओवादी चळवळीच्या बाबतीत काही बातम्या समोर आल्या आहेत. त्यातील काही दिलासा देणाऱ्या, तर इतर काळजी वाढवणाऱ्या आहेत. झारखंडमध्ये १६ माओवाद्यांनी शरणागती पत्करली असल्याची एक बातमी. दुसरी बातमी- माओवादी चळवळीतील शेवटचा सक्रिय नेता मिसिर बेसरा याला झारखंडच्या गिरिडिह येथे मंगळवारी सायंकाळी अटक करण्यात आली. अन्नपाण्यावाचून जंगलात कोंडी होत असल्याने त्याच्या अंगरक्षकांसह एकूण २४ जणांनी त्याची साथ सोडण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे तो काहीसा एकाकी पडला होता. त्यातली तिसरी बातमी माओवादाचा धोका कायम असल्याचे सांगणारी आहे. एकीकडे नक्षलवादाचा निःपात दृष्टिपथात असल्याच्या गृहीतकावर वाटचाल सुरू झालेली असताना, महाराष्ट्र, छत्तीसगड आणि तेलंगणाच्या सीमेवर माओवाद्यांची पुन्हा जमवाजमव होत असल्याचे संकेत देणारे वृत्त काळजी वाढविणारे आहे. यासंदर्भात पुढे येत असलेली माहिती खरी असल्यास केंद्र आणि राज्यांनी आजवर राबवलेल्या कठोर मोहिमांच्या यशापुढे प्रश्नचिन्ह उभे राहणार आहे. शिवाय, आतापर्यंत शरणागती पत्करलेल्या माओवादी नेत्यांबाबत काही प्रश्नही उपस्थित होणारे आहेत. विकासाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होण्यासाठी आणि रक्तपात सोडून संविधान हाती घेत सामान्य आयुष्य जगण्याच्या प्रामाणिक उद्देशाने या नेत्यांनी शरणागती पत्करली काय, याची फेरपडताळणी करण्याचा हा प्रसंग आहे. जिवाच्या भीतीने शरणागती पत्करायची, संधी मिळताच शहरी भागांमध्ये माओवादी विचार पेरायचे आणि रक्तपात घडवायचा अशा प्रकारची मोडस ऑपरेंडी असल्यास देशात मोठा अनर्थ घडू शकतो, याचा विचार वेळीच करणे गरजेचे आहे. कारण, एका मोठ्या माओवादी नेत्याने शरणागती पत्करण्यापूर्वी कॅडरला पाठवलेल्या पत्रात 'अस्थायी शस्त्रसंधी' असा उल्लेख केला होता. या एका शब्दातच भविष्यातील भूमिका स्पष्ट झाली आहे. धोका संपलेला नाही, असे म्हणायचे ते या पृष्ठभूमीवर.

सध्याची परिस्थिती पाहता माओवादी चळवळीतील बहुतांश मोठे नेते शरणागती पत्करून सुरक्षित आयुष्य जगत आहेत. खालच्या पातळीवरील त्यांचे कॅडर 'बेपत्ता' आहे आणि त्यांच्या एकूण शस्त्रसाठ्यापैकी फार कमी शस्त्रे सुरक्षा दलांच्या हाती लागली आहेत. शिवाय, अलिकडच्या काही आंदोलनांमध्ये माओवादी तत्त्वे दिसून येणे हा काळजीचा विषय आहे. माओवाद हा भारताच्या अंतर्गत सुरक्षेतील मोठा धोका आहे. लोकशाही उलथवून टाकण्याच्या उद्देशाने मागील काही दशकांपासून माओवाद्यांकडून रक्तरंजित हिंसाचार सुरू आहे. केंद्र सरकारच्या कठोर भूमिकेमुळे त्यावर आता निश्चितपणे अंकुश लागला आहे. एकसंध भारताचे तुकडे करण्याचा माओवाद्यांचा उद्देश आहे. माओवादी सत्ता आणण्यासाठी वेगवेगळ्या माध्यमातून लोकांच्या मनात असंतोष निर्माण करायचा आणि त्यासाठी युवा पिढीला लक्ष्य करायचे हे त्यांचे धोरण आहे. जंगलातील माओवाद आणि शहरी माओवाद या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. २००४ मध्ये विविध संघटनांचे एकीकरण झाल्यावर तयार झालेल्या सीपीआय (माओवादी) या संघटनेची घटना आणि इतर चार पुस्तके मंजूर करण्यात आली. या पाच पुस्तकांपैकी 'स्ट्रॅटेजी ॲण्ड टॅक्टिक्स ऑफ इंडियन रिव्हॉल्युशन' हे पुस्तक अतिशय महत्त्वाचे आहे. माओवाद्यांच्या रणनीतीची नेमकी माहिती या पुस्तकात आहे. याच पुस्तकात शहरी क्षेत्रांत कसे काम करायचे याबाबत मार्गदर्शन आहे. त्यामुळे शहरी माओवाद नावाचा प्रकार अस्तित्वात नाही, असे दावे निरर्थक ठरतात. या पुस्तकात दिलेली माहिती लक्षात घेतल्यास माओवादी संघटना काय करू शकतात याचा अंदाज येतो. माओवादी चळवळ स्वतःला शोषित, वंचित आणि गरिबांच्या हक्कांसाठी लढणारी क्रांतिकारी चळवळ म्हणून दाखविते. मात्र, तिच्या विचारसरणीचा आणि प्रत्यक्ष कृतीचा अभ्यास केला असता तिने सामाजिक न्यायाच्या नावाखाली हिंसक संघर्षाला प्राधान्य दिले हे स्पष्ट होते. युवक, विद्यार्थी आणि कामगारांमध्ये असंतोष निर्माण करून त्यांना सशस्त्र संघर्षाकडे वळवण्याचा प्रयत्न हा माओवादी रणनीतीचा महत्त्वाचा भाग.

विद्यार्थी आणि युवक हे राष्ट्राचे भविष्य मानले जातात. त्यांच्यात ऊर्जा, परिवर्तनाची इच्छा आणि सामाजिक प्रश्नांविषयी संवेदनशीलता असते. याच ऊर्मींचा उपयोग करून काही कट्टर विचारसरणीच्या संघटना त्यांच्या मनात विद्यमान व्यवस्थेविषयी तीव्र अविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. शांततामय लोकशाही मार्गाऐवजी हिंसक क्रांती हाच एकमेव उपाय असल्याचे चित्र रंगवले जाते. कामगार वर्गालाही याच प्रकारे संघटित करण्याचा प्रयत्न केला जातो. त्यांच्या आर्थिक अडचणी, कमी वेतन, असुरक्षित रोजगार आणि श्रमिक हक्कांशी संबंधित प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवून संघर्षाची भाषा वापरली जाते. कामगारांच्या न्याय्य मागण्या हिंसक राजकीय उद्दिष्टांशी जोडल्या गेल्यास त्याचे परिणाम समाजासाठी आणि कामगारांसाठीही घातक ठरू शकतात. न्याय मिळवण्यासाठी कायदेशीर, संघटनात्मक आणि घटनात्मक मार्ग उपलब्ध आहेत. तरीही माओवादी विचारसरणीचे समर्थक असा युक्तिवाद करतात की, शासन व्यवस्था शोषणकारी असल्याने सशस्त्र संघर्ष आवश्यक ठरतो. लोकशाहीवादी देशात ही भूमिका अजिबात स्वीकारता येत नाही. कारण हिंसेतून कुणाचेही भले होत नाही, याची असंख्य उदाहरणे इतिहासात आहेत. भारताची लोकशाही व्यवस्था नागरिकांना निवडणुका, न्यायालये, कामगार संघटना, विद्यार्थी संघटना, प्रसारमाध्यमे आणि शांततामय आंदोलनांसारखे अनेक घटनात्मक मार्ग उपलब्ध करून देते. या माध्यमांतून सामाजिक बदल घडवून आणणे अधिक शाश्वत आणि लोकहिताचे असते. त्यामुळे भावनिक आवाहने, दिशाभूल करणारा प्रचार किंवा द्वेषपूर्ण भाषण यांच्या प्रभावाखाली न येता, वास्तव, संवैधानिक मूल्ये आणि मानवी जीवनाचे महत्त्व लक्षात घेऊन निर्णय घेणे ही काळाची गरज आहे. सामाजिक न्यायासाठी काही प्रमाणात संघर्ष आवश्यक असला तरी, तो लोकशाही, संवाद आणि अहिंसेच्या चौकटीत राहूनच अधिक प्रभावी आणि टिकाऊ ठरतो. सरकारने या अनुषंगाने जमिनीवरील वास्तवाकडे लक्ष दिले पाहिजे. माओवादावर नियंत्रण ठेवण्यासाठी केवळ सुरक्षा दलांवर अवलंबून न राहता कायद्याचे राज्य वास्तवात कसे उतरेल, यावर काम केले पाहिजे. गुप्तचर यंत्रणा बळकट करणे, कायद्यांची निष्पक्ष अंमलबजावणी करणे, हिंसक कारवायांमध्ये सहभागी व्यक्तींवर उपलब्ध पुराव्यांच्या आधारे कारवाई करणे, तसेच निरपराध नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि न्यायप्रक्रिया सुरक्षित ठेवणे यासारख्या बाबींकडे अग्रक्रमाने लक्ष द्यावे लागेल. महाविद्यालये, विद्यापीठे आणि विद्यार्थी-कामगार संघटनांमध्ये संवैधानिक मूल्ये, लोकशाही मार्गाने सामाजिक परिवर्तन आणि अहिंसक संघर्ष यांविषयी जागरूकता निर्माण करणेही तेवढेच महत्त्वाचे आहे. रोजगार, कौशल्यविकास, उद्योजकता आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या संधी वाढवल्यास कट्टर विचारसरणीचे आकर्षण कमी होऊ शकते. मजबूत लोकतांत्रिक संस्था, सर्व पातळ्यांवर न्यायाचे राज्य, समतोल विकास आणि लोकतंत्रावरील नागरिकांचा विश्वास या सर्वांचा समन्वय असलेले धोरण अधिक प्रभावी आणि टिकाऊ ठरू शकते. माओवाद्यांसारख्या देशविरोधी घटकांना पाठिंबा मिळू नये, यासाठी समाजात जे वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे, ते युद्धपातळीवर केले पाहिजे. ते वातावरण निर्माण होईपर्यंत धोका संपलेला नाही आणि नुसता सुरक्षा दलांच्या कारवाईने तो संपणार नाही, हे सर्वांनी समजून घेतले पाहिजे. ■

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# समाजमाध्यमांवर वयोमर्यादा हवी

आजचे युग पूर्णपणे डिजिटल झाले आहे. मोबाईल फोन आणि इंटरनेट ही तशी म्हटली तर फार प्रभावी साधने आहेत. त्यांच्यातील छुपे सामर्थ्य ओळखून डोळसपणे उपयोग केला तर बरीच कामे सहजपणे होतात, खर्च आणि वेळ वाचतो आणि वापरकर्त्याच्या ज्ञानातही भर पडते. इंटरनेटवरील सोशल मीडिया हा जगभरातील नागरिकांच्या आयुष्यातील आणि समाजातील एक महत्त्वपूर्ण माध्यम बनले आहे. सोशल नेटवर्किंग हा इंटरनेटच्या महाजालातील परवलीचा शब्द आहे. सोशल मीडियावर असणे आत्ताच्या काळाची अनिवार्य गरज झाली आहे. तिथे नसणे काळाबरोबर नसल्याचे लक्षण मानले जाते. सोशल मीडियाच्या माध्यमातून अनेकांना आपले विचार, मते, माहिती लोकांपर्यंत पोचवण्याचा एक नवा मार्ग पुढे आला आहे. ब्रिटनने १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर निर्बंध घालण्याच्या दिशेने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. यापूर्वी ऑस्ट्रेलियानेही अशाच प्रकारचा निर्णय घेतला होता. यामागील मुख्य कारण म्हणजे सोशल मीडियाचा मुलांच्या मानसिक, शारीरिक आणि सामाजिक विकासावर होणारा वाढता दुष्परिणाम. भारतातही हा विषय अत्यंत महत्त्वाचा बनला आहे, कारण आज अनेक मुलांच्या हातात वयाच्या अकराव्या बाराव्या वर्षीच स्मार्टफोन पोहोचत आहे. सोशल मीडिया हे ज्ञान, संवाद आणि सर्जनशीलतेचे प्रभावी माध्यम असले तरी त्याचा अतिरेक अनेक गंभीर समस्या निर्माण करतो. मुलांमध्ये व्यसनाधीनता, एकाग्रतेचा अभाव, नैराश्य, चिंता, झोपेचे विकार, सायबर बुलिंग, अश्लील किंवा हिंसक सामग्रीचा संपर्क आणि खोट्या माहितीचा प्रभाव वाढताना दिसत आहे.

अनेक संशोधनांनुसार सततच्या स्क्रीन वापरामुळे मुलांची सामाजिक कौशल्ये आणि प्रत्यक्ष संवाद क्षमता कमी होण्याचा धोका असतो. मात्र भारताची परिस्थिती ऑस्ट्रेलिया किंवा ब्रिटनपेक्षा वेगळी आहे. भारतात लोकसंख्या प्रचंड आहे, डिजिटल साक्षरतेची पातळी असमान आहे आणि कायद्यांची अंमलबजावणी करणे तुलनेने अधिक कठीण आहे. त्यामुळे १६ वर्षांखालील मुलांना सोशल मीडिया बंद करण्याचा निर्णय सत्वर घेणे पुरेसे ठरणार नाही. सोशल मीडियाचा मुलांच्या मानसिक आरोग्यावर होणारा नकारात्मक प्रभाव हे या बंदीमागील सर्वांत मोठ्या कारणांपैकी एक आहे. सायबर बुलिंग, ऑनलाईन शोषण आणि तुलना करण्याची मानसिकता यांसारख्या समस्यांमुळे मुले मानसिक तणावाचा सामना करतात. सोशल मीडियाचे व्यसन ही एक गंभीर समस्या बनत चालली आहे. मुले तासनतास स्मार्टफोनवर घालवतात. यामुळे शैक्षणिक कामगिरी आणि सामाजिक संबंध प्रभावित होतात. सोशल मीडियावर खोट्या माहितीचा प्रसार होण्याची शक्यता अधिक असते. मुले या खोट्या माहितीवर विश्वास ठेवतात आणि त्याचा परिणाम त्यांच्या विचारांवर होतो. सोशल मीडियावर गोपनीयता राखणे कठीण असते. मुलांची वैयक्तिक माहिती चोरली जाण्याचा धोका असतो.

यापुढील काळातील सर्वांत मोठे आव्हान म्हणजे वय पडताळणी. सध्या बहुतेक सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर खाते उघडताना फक्त जन्मतारीख विचारली जाते. कोणताही मुलगा किंवा मुलगी चुकीची जन्मतारीख देऊन सहज खाते तयार करू शकते. भारतात 'आधार'सारखी डिजिटल ओळख प्रणाली उपलब्ध असली तरी गोपनीयता, डेटा सुरक्षा आणि तांत्रिक अंमलबजावणी यांचे प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे केवळ कायदा करून समस्या सुटणार नाही. या बाबतीत भारताने बहुआयामी धोरण स्वीकारण्याची गरज आहे. प्रथम १३ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडिया वापरावर कडक निर्बंध असावेत. १३ ते १६ वयोगटासाठी पालकांच्या संमतीची व्यवस्था असावी. दुसरे म्हणजे, सोशल मीडिया कंपन्यांवर अल्गोरिदम पारदर्शकतेची जबाबदारी टाकली पाहिजे. मुलांना व्यसन लावणारी सामग्री, अखंड स्क्रोलिंग, सतत सूचना आणि लक्ष्यित जाहिरातींवर नियंत्रण असावे. तिसरे म्हणजे, शाळांमध्ये डिजिटल साक्षरता स्वतंत्र विषय म्हणून शिकवण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा, गोपनीयता, फेक न्यूज, ऑनलाईन फसवणूक आणि डिजिटल जबाबदारी यांचे शिक्षण दिले पाहिजे. फक्त तंत्रज्ञान वापरणे नव्हे, तर तंत्रज्ञानाचा सुज्ञ वापर करणे शिकवणे अधिक महत्त्वाचे आहे. चौथे म्हणजे, पालकांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे. अनेकदा पालकच मुलांना शांत ठेवण्यासाठी किंवा अभ्यासाच्या नावाखाली लहान वयामध्ये स्मार्टफोन देतात. घरामध्ये स्क्रीनटाईमचे नियम, मोबाईलमुक्त जेवण, मोबाईलमुक्त झोपेची वेळ आणि प्रत्यक्ष खेळांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आभासी वास्तव यासारखी तंत्रज्ञाने अधिक प्रभावी होणार आहेत. त्यामुळे मुलांच्या मनावर होणारा प्रभावही अधिक वाढू शकतो. आज योग्य धोरण आखले नाही तर उद्या डिजिटल व्यसन, मानसिक आरोग्य समस्या आणि सामाजिक एकटेपणा यांची मोठी किंमत समाजाला मोजावी लागू शकते. तसेच सोशल मीडियाच्या अनियंत्रित वापरामुळे काही तरुण सायबर गुन्हेगारीकडे आकर्षित होत असल्याचेही दिसून येत आहे. इंटरनेटवर सहज उपलब्ध असलेली हॅकिंगची साधने, बनावट ओळखी तयार करण्याची सुविधा, ऑनलाईन गेमिंग समुदाय, डार्क वेबची माहिती आणि जलद आर्थिक लाभाचे आकर्षण यामुळे काही किशोरवयीन मुले सायबर फसवणूक, खाते हॅकिंग, ओटीपी चोरी, फिशिंग, डिजिटल ब्लॅकमेलिंग आणि डेटाचोरी यांसारख्या गुन्ह्यांमध्ये सहभागी होत आहेत. अनेक वेळा ते आपल्या कृतीचे कायदेशीर परिणाम समजून न घेता केवळ कुतूहल, मित्रांचा प्रभाव किंवा प्रसिद्धी मिळवण्याच्या हेतूने असे प्रकार करतात. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात डीपफेक व्हिडीओ, बनावट सोशल मीडिया प्रोफाईल आणि डिजिटल दिशाभूल यांसारखी नवी आव्हानेही वाढत आहेत. त्यामुळे शाळा स्तरापासूनच सायबर नैतिकता, डिजिटल जबाबदारी आणि सायबर कायद्यांचे शिक्षण देणे अत्यावश्यक झाले आहे.

भारताने सोशल मीडिया पूर्णपणे बंद करण्याऐवजी 'सुरक्षित, नियंत्रित आणि जबाबदार वापर' हे उद्दिष्ट ठेवले पाहिजे. कायदा, तंत्रज्ञान, शिक्षण, पालक आणि समाज या सर्व घटकांनी एकत्रितपणे काम केल्यासच मुलांसाठी सुरक्षित डिजिटल वातावरण निर्माण होऊ शकते. प्रश्न सोशल मीडिया बंद करण्याचा नाही, तर पुढील पिढीचे मानसिक आणि सामाजिक आरोग्य जपत डिजिटल युगाशी सुसंगत विकास साधण्याचा आहे. हाच भारतासाठी सर्वांत योग्य आणि व्यावहारिक मार्ग ठरेल. ■

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**गिरीश शेरेकर**

# 'सेंट्रल किचन'च्या विरोधात षडयंत्र

राज्याच्या आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासी विद्यार्थ्यांचे भविष्य घडावे, यासाठी विविध योजना राबिवल्या जातात. त्यासाठी कोट्यवधींचा निधी दरवर्षी खर्च केला जातो. याचे अनेक सकारात्मक परिणाम पाहायला मिळाले तर काही गैरप्रकारही समोर आले आहेत. या दोन्हीच्या आडून काही मंडळी बक्कळ पैसे कमवत असल्याचे आरोप सातत्याने होतात. सदर विभागाच्या वतीने चालविल्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्याच काय इतरही योजनांमध्ये भ्रष्टाचार होतो, ही ओरड सातत्याने होते. त्यामुळेच या योजनांच्या प्रारूपामध्ये वेळोवेळी बदल करण्यात येतात. पण, या विभागात कार्यरत असलेले किंवा जुळलेले झारीतले शुक्राचार्य त्यातूनही मार्ग काढून आपला उद्देश यशस्वी करत असल्याची स्थिती आहे. हा विभाग राज्यात ५०० शासकीय आश्रमशाळा, ५५६ अनुदानित आश्रमशाळा, ४९० शासकीय वसतिगृहे चालविते. जवळपास ५.२५ लाख विद्यार्थी येथे प्रवेशित असतात. त्यासाठी चालू आर्थिक वर्षात ४८७१.६२ कोटींची तरतूद आदिवासी विकास विभागाच्या कार्यक्रम अंदाजपत्रकात नमूद आहे. या निधीतून विद्यार्थ्यांच्या प्रवेशापासून तर निवास, भोजनासह इतर सर्व आवश्यक सुविधा पुरविल्या जातात. सोप्या भाषेत सांगायचे तर सदर विद्यार्थ्यांच्या पालकांना एक रुपयाचा देखील खर्च आपल्या पाल्यावर करावा लागत नाही. एका चांगल्या उद्देशाने राज्य शासन आदिवासी मुलांवर पैसे खर्च करीत असताना बोंबाबोंब आणि गैरप्रकार तर पाचविलाच पुजला आहे. आदिवासी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या भोजनाच्या संदर्भात सातत्याने तक्रारी असतात. त्याची बहुतांश कारणे मानवी हस्तक्षेपाची आहे. यातून मार्ग काढण्याच्या प्रयत्नाचा एक भाग म्हणून शासनाने अन्नपूर्णा योजनेतून सेंट्रल किचन ही व्यवस्था पहिल्यांदा २०१५ मध्ये नाशिक आणि पालघरमध्ये राबविली. हा पथदर्शी प्रकल्प (पायलट प्रोजेक्ट) होता. या प्रकल्पाचे चांगले फायदे दिसल्याने टप्प्याटप्प्याने सेंट्रल किचन या संकल्पनेचा विस्तार वाढला. विद्यमान स्थितीत संपूर्ण राज्यात २० ठिकाणी सेंट्रल किचन आहे. त्यातील ४ किचनचे स्वरूप मोठे आहे. या प्रत्येक किचनला सुमारे ४० शाळा जोडल्या आहेत. उर्वरित १६ ठिकाणच्या किचनला सरासरी १० शाळा जोडल्या आहेत. साधारणपणे ३०० च्या आसपास आश्रमशाळामध्ये सेंट्रल किचनच्या माध्यमातून भोजन दिले जाते. इतर आश्रमशाळांमध्ये त्यांच्या स्तरावरच भोजन तयार करून विद्यार्थ्यांना देण्याची पूर्वीचीच योजना कायम आहे. राज्यात सर्वच ठिकाणी सेंट्रल किचन व्यवस्थित सुरू आहेत. मेळघाटातल्या धारणी तालुक्यातल्या ९ आश्रमशाळांसाठी १५ जुलैपासूनच सेंट्रल किचन सुरू करण्यात आले. फक्त १० दिवसांतच येथे आरडाओरड सुरू झाली. विशेष म्हणजे सर्व ९ शाळांच्या विद्यार्थ्यांसाठी भोजन एकाच ठिकाणी तयार झाले असताना विषबाधेची बोंब फक्त एकाच टिटंबा शाळेतून झाली. याचाच अर्थ अन्नातला दोष किती आणि त्या आश्रमशाळेतल्या पिण्याच्या पाण्यासह अन्य सुविधांचा किती? याचा शोध आवश्यक झाला आहे.

सदर प्रकरण समोर आल्यानंतर प्रशासनाने गंभीर दखल घेतली. लगेच दुसऱ्या दिवशी आदिवासी विकास मंत्री पोहोचले. त्यांनी आढावा घेतल्यावर कारवाई तीव्र झाली. सदर शाळेत आलेल्या अन्नाचे, पाण्याचे नमुने तपासणीसाठी घेतले आहे. त्याचा अहवाल आल्यावर नेमके कारण समोर येईलच. पण, तत्पूर्वी मुख्याध्यापकांना कारणे दाखवा नोटीस तर अधीक्षकांना निलंबित करण्यात आले आहे. टेमली येथील सेंट्रल किचन तात्पुरते बंद करण्यात आले आहे. आता पूर्वीप्रमाणेच ९ शाळांमध्ये सोमवारपासून भोजन बनविले जात आहे. धारणी तालुक्यात सेंट्रल किचन सुरू झाल्याने येथील अन्न न खाताच काहींना पोटदुखी सुरू झाली होती. त्यांनीच किचन बंद पाडण्याचे षडयंत्र रचले असून त्यांना स्थानिक पुरवठादारांनी बळ दिल्याचे सांगितले जात आहे. सेंट्रल किचनमुळे आश्रमशाळांना भोजनासाठी आवश्यक सर्व साहित्याचा पुरवठा बंद झाला. त्यामुळे अनेक पुरवठादारांची सर्व प्रकराची दुकानदारी बंद झाली होती. या दुकानदारीवर अवलंबून असलेले लाभार्थी सुद्धा अस्वस्थ झाले होते. या सर्वांनी मिळूनच शासनाच्या योजनेला आव्हान दिले. जुन्या व्यवस्थेतील तक्रारींपेक्षा सेंट्रल किचनमधल्या तक्रारींचे प्रमाण निश्चितच कमी असेल. ज्या तक्रारी आहेत त्या दूर करता येतील. तशा सूचना केल्या पाहिजेत. पण, सरसकट सेंट्रल किचन बंद करण्याची मागणी म्हणजे विद्यार्थ्यांवर अन्याय व भामट्यांसाठी मोकळे रान ठरेल. आदिवासी पालकांनी शासन व्यवस्थेच्या पाठीशी उभे राहायला हवे, ही अपेक्षा! ■

९४२०७२१२२५

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# धर्मेंद्र प्रधानांच्या राजीनाम्याचा अन्वयार्थ

कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनामुळे शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला. त्यांच्या राजीनाम्यामुळे देशात अनेकांना हळहळ वाटली. धर्मेंद्र प्रधान मोदी सरकारमधील चौथे शिक्षण मंत्री होते. १२ वर्षांत मोदी सरकारमध्ये चार जणांनी शिक्षण मंत्री हे पद भूषवले. आता प्रल्हाद जोशी यांच्याकडे शिक्षण मंत्रिपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे.

१९८५ ते २०२० पर्यंत या मंत्रालयाचे नाव मानव संसाधन विकास मंत्रालय असे होते. देशात नवीन शैक्षणिक धोरण लागू झाल्यानंतर या मंत्रालयाचे नाव बदलून ते शिक्षण मंत्रालय असे करण्यात आले. स्मृती इराणी, प्रकाश जावडेकर आणि रमेश पोखरियाल निशंक हे मानव संसाधन विकास मंत्री होते. त्या अर्थाने प्रधान यांना मोदी सरकारमधील पहिले शिक्षण मंत्री म्हणावे लागेल. अटलबिहारी वाजपेयी सरकारच्या काळात डॉ. मुरलीमनोहर जोशी हे देशाचे मानव संसाधन मंत्री होते. स्मृती इराणी या मोदी सरकारमधील पहिल्या मानव संसाधन विकास मंत्री होत्या, नंतर प्रकाश जावडेकर मानव संसाधन विकास मंत्री झाले, त्यांच्यानंतर रमेश पोखरियाल निशंक यांच्याकडे या मंत्रालयाची जबाबदारी आली. विद्यार्थी चळवळीतून पुढे आलेल्या तसेच अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्यकर्ते असलेल्या आणि विद्यार्थी आंदोलनात आघाडीवर राहात असलेल्या धर्मेंद्र प्रधान यांना विद्यार्थ्यांच्या आंदोलनामुळेच शिक्षणमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला, हा काव्यात्मक न्याय म्हणावा लागेल.

विशेष म्हणजे प्रधान यांनी शिक्षण मंत्री म्हणून पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला. असा कार्यकाळ पूर्ण करणारे ते मोदी सरकारमधील पहिलेच शिक्षण मंत्री होते. स्मृती इराणी यांनी दोन वर्षे, प्रकाश जावडेकर यांनी तीन वर्षे तर पोखरियाल यांनी दोन वर्षे या मंत्रालयांची जबाबदारी सांभाळली.

देशातील नवीन शैक्षणिक धोरणाचे शिल्पकार आणि सूत्रधार म्हणून धर्मेंद्र प्रधान यांचे नाव घ्यावे लागेल. नव्या शैक्षणिक धोरणाला मूर्त रूप देण्यात आणि त्यांची अंमलबजावणी घडवून आणण्यात शिक्षण मंत्री म्हणून प्रधान यांची मोठी भूमिका होती. योगायोग म्हणजे पेपरफूट प्रकरणाची नैतिक जबाबदारी घेत धर्मेंद्र प्रधान यांनी यावेळी राजीनामा दिला असला तरी याच मुद्यावर त्यांनी विद्यार्थी नेते असताना आंदोलनही केले होते. १९९७ ची घटना आहे. प्रधान त्यावेळी अभाविपचे राष्ट्रीय मंत्री होते. पेपरफुटीच्या घटनेच्या विरोधात प्रधान यांनी ओडिशात मंत्रालयासमोर निदर्शने केलीत. शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी लाठीहल्ला केला. यात प्रधान गंभीर जखमी झाले होते. मात्र आता तशाच आंदोलनाने त्यांना पायउतार व्हावे लागले. जवळपास चार दशकांपासून राजकारणात सक्रिय असलेले धर्मेंद्र प्रधान यांची कौटुंबिक पृष्ठभूमी राजकीय आहे. त्यांचे वडील देवेंद्र प्रधान जनसंघ आणि भाजपाचे नेते होते. देवेंद्र प्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळातही होते. शिक्षणमंत्रिपदाची जबाबदारी सांभाळण्याआधी प्रधान यांनी पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू, कौशल्य विकास तसेच पोलाद मंत्रालयांचीही जबाबदारी सांभाळली.

२००० मध्ये ओडिशाच्या पल्लाहारा विधानसभा मतदारसंघातील निवडणूक जिंकत धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीला प्रारंभ केला. २००४ ची लोकसभा निवडणूक प्रधान यांनी ओडिशाच्या देवगड मतदारसंघातून लढवली आणि जिंकली. देवगड हा त्याच्या वडिलांचा- देवेंद्र प्रधान यांचा- मतदारसंघ होता. मात्र २००९ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला, २०१० मध्ये भाजपाने त्यांना राष्ट्रीय महासचिव बनवले. २०१२ मध्ये प्रधान यांना भाजपाने बिहारमधून राज्यसभेवर पाठवले. दोन कार्यकाळ राज्यसभेत राहिल्यानंतर २०२४ ची लोकसभा निवडणूक त्यांनी ओडिशाच्या संबलपूर मतदारसंघातून लढवली आणि जिंकली. २००९ नंतर म्हणजे तब्बल १५ वर्षांनंतर ते लोकसभेत परतले.

मौलाना अबुल कलाम आझाद हे देशातील पहिले शिक्षण मंत्री होते. सर्वाधिक म्हणजे ११ वर्षे या मंत्रालयाची जबाबदारी अबुल कलाम आझाद यांनी सांभाळली. त्यांच्या खालोखाल डॉ. मुरलीमनोहर जोशी सहा वर्षे मानव संसाधन विकास मंत्री होते. प्रधान यांच्याआधी डॉ. के. एल. श्रीमाळी, प्रो. एस. नुरुल हसन, अर्जुनसिंह यांनी या पदावर पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला. नंतर पंतप्रधान झालेले विश्वनाथ प्रतापसिंह आणि पी. व्ही. नरसिंहराव यांनीही शिक्षण मंत्रालयाची जबाबदारी सांभाळली होती.

आधी शिक्षण मंत्री असलेले फखुद्दिन अली अहमद नंतर देशाचे राष्ट्रपतीही झाले होते. अर्जुनसिंह आणि नरसिंहराव यांच्याकडे एकदा नाही तर दोनदा या खात्याची जबाबदारी आली. महाराष्ट्राचे शंकरराव चव्हाण यांनीही देशाचे शिक्षण मंत्री म्हणून काम केले. कोणत्याही कारणाने राजीनामा द्यावा लागणारे धर्मेंद्र प्रधान हे मोदी सरकारमधील दुसरे मंत्री ठरले आहेत. २०१८ मध्ये मी टू आंदोलनादरम्यान लैंगिक शोषणाचा आरोप झाल्यामुळे तेव्हा परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री असलेले एम. जे. अकबर यांना राजीनामा द्यावा लागला होता.

शिक्षण मंत्रिपदावर असताना राजीनामा द्यावा लागलेले धर्मेंद्र प्रधान हे दुसरे मंत्री आहेत १९६७ मध्ये इंदिरा गांधी यांच्याशी व्यक्तिगत आणि राजकीय मुद्यांवरून मतभेद झाल्यामुळे तेव्हाचे शिक्षण मंत्री मोहम्मद करीम छागला यांनी राजीनामा दिला होता.

शिक्षणमंत्र्याने कोणत्याही राजकीय कारणामुळे अडचणीत येण्याची ही पहिली वेळ नाही. छागलानंतर त्रिगुण सेन हे शिक्षण मंत्री झाले. क्षेत्रीय भाषा विवादामुळे ते अडचणीत आले होते. विश्वनाथ प्रतापसिंह यांना मंडल आयोग आणि आरक्षण धोरणाचा फटका बसला होता. डॉ. मुरलीमनोहर जोशी यांच्यावर एनसीईआरटीच्या भगवेकरणाचा आरोप झाला होता. अर्जुनसिंह यांच्यावर ओबीसी आरक्षणाला विरोध केल्याचा आरोप होता. कपिल सिब्बल यांना चार वर्षीय स्नातक अभ्यासक्रमाने अडचणीत आणले होते. स्मृती इराणी यांच्या काळातही रोहित वेमुला, जेएनयू आणि अलाहाबाद विद्यापीठातील काही घटनांनी वादळ निर्माण केले होते. रमेश पोखरियाल निशंक यांना नव्या शैक्षणिक धोरणाच्या मुद्यावरून घेरले होते.


### नैतिक जबाबदारी घेत राजीनामा देणारे तीन मंत्री

पदावर असताना आतापर्यंत १० केंद्रीय मंत्र्यांना विविध कारणांवरून राजीनामा द्यावा लागला. नैतिक मुद्यावरून राजीनामा देणारे देशात आतापर्यंत तीन मंत्री झाले. यात लालबहादूर शास्त्री, नितीशकुमार आणि धर्मेंद्र प्रधान यांचा समावेश आहे. लालबहादूर शास्त्री आणि नितीशकुमार यांनी रेल्वे अपघाताची नैतिक जबाबदारी घेत राजीनामा दिला होता.

'नीट' परीक्षेतील गैरव्यवहाराची नैतिक जबाबदारी घेत ओडिशाचे लाल असलेल्या बहादूर धर्मेंद्र प्रधान यांनी आता राजीनामा दिला आहे. उर्वरित ७ मंत्र्यांना भ्रष्टाचाराच्या वा गैरवर्तनाच्या आरोपावरून राजीनामा द्यावा लागला होता. त्यामुळेच प्रधान यांच्या राजीनाम्याने सर्वसामान्य माणूस हळहळला आहे. ■

९८८१७१७८१७

### आदरणीय जोशी सर : पत्रकारितेतील दीपस्तंभ



पत्रकारितेच्या क्षेत्रात ज्यांनी आपल्या अभ्यासपूर्ण, सकारात्मक आणि गुरुतुल्य वृत्तीने पत्रकारांच्या अनेक पिढ्या घडविल्या ते आदरणीय जोशी सर काळाच्या पडद्याआड गेले आहेत. 'जळगाव तरुण भारत'ला ज्या ज्येष्ठ - श्रेष्ठ संपादकांची उल्लेखनीय परंपरा लाभली आहे, त्यात ल. त्र्यं. जोशी सर अग्रणी होते. राज्य आणि देश पातळीवरील राजकारण आणि समाजकारणाबरोबरच विविध राजकीय पक्षांतील नेत्यांच्या वृत्ती आणि स्वभावाचाही त्यांचा दांडगा अभ्यास होता. या सर्व गोष्टींचे प्रतिबिंब त्यांच्या लेखनात प्रभावीपणे उमटायचे. त्यामुळे सरांचे लेखन अभ्यासपूर्ण, वाचनीय आणि मार्गदर्शक वाटायचे.

मी 'जळगाव तरुण भारत'मध्ये कार्यरत असताना जोशी सरांनी या आवृत्तीसाठी घेतलेले कष्ट आणि घालून दिलेले आदर्श हेच माझ्यासाठी मार्गदर्शक होते. सरांनी या आवृत्तीला नावारूपाला आणण्यासाठी किती आणि कसे प्रयोग केले त्याबद्दल सर्व ज्येष्ठ सहकारी आणि वरिष्ठांकडून मला कळले होते. विशेषतः डॉ. भरत अमळकर, रत्नाकर पाटील, संजय बिर्ला, दिलीप चोपडा, रवी लढ्ढा यांच्यासोबतच अन्य प्रकल्पातील सहकाऱ्यांनीसुद्धा जोशी सरांचा स्वभाव आणि त्यांची कर्तव्यनिष्ठा याबद्दल वेळोवेळी जे सांगितले होते, त्यातूनच सरांचे एक आदरयुक्त व्यक्तिमत्त्व माझ्या मनात निर्माण झाले होते. माझा सरांशी प्रत्यक्ष संपर्क आला तो त्यांच्या 'सारांश' या सदराच्या निमित्ताने. त्यावेळी त्यांच्याशी बोलताना एक जाणवले की, ''समाजावर आईसारखे निःस्वार्थ प्रेम करूया'' या ध्येयाने समाजात विविधांगी सेवाकार्ये उभे करणारे स्व. श्रद्धेय डॉ. आचार्य दादांबद्दल सरांना किती नितांत आदर आहे. ते त्यांच्या प्रत्येक शब्दातून आणि प्रत्येकवेळी जाणवायचे. आपली आवृत्ती अधिक समृद्ध करण्यासाठी दिवाळी अंक, विशेषांक आणि नैमित्तिक अंकांची जी परंपरा सरांनी घालून दिली आहे ती आजतागायत सुरू आहे. आर्थिकदृष्ट्या लाभासाठी कुठलीही अयोग्य आणि अमान्य तडजोड करायची नाही हा त्यांचा दंडक सर्वांसाठीच आदर्शभूत आणि अनुकरणीय आहे. सरांसोबत प्रत्यक्ष काम करण्याची संधी जरी मला मिळाली नसली तरी 'तरुण भारत'मधील एक सहकारी म्हणून अन्य सहकाऱ्यांप्रमाणेच मलाही सरांचा स्नेह आणि आशीर्वाद लाभला आहे. तरुण भारतमधील प्रत्येक घटक सर्वार्थाने समृद्ध व्हावा या त्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी सारेच प्रयत्नशील राहूया. हीच आदरणीय जोशी सरांना खरी आदरांजली ठरेल!

**दिनेश दगडकर**/९९२२९१९४४६


(माजी निवासी संपादक, तरुण भारत, जळगाव)

■■■

## वाचक पत्रे

### अभिजित मुहूर्त नसतो सदाकदा

कॉक्रोच जनता पक्षाचे संस्थापक अभिजित दीपके यांनी जंतर मंतर येथील आंदोलनानंतर केंद्र सरकारने शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा घेतला असा दावा केला. आता आंदोलकांवरील सर्व खटले सरसकट मागे न घेतल्यास पुन्हा मोठे आंदोलन छेडू, असा इशाराही त्यांनी दिला आहे. मात्र, एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे की प्रत्येक आंदोलनात दरवेळी विजय मिळतोच असे नाही. त्यामुळे भावनिक आवेशापेक्षा संयम, विचारपूर्वक निर्णय आणि वक्तव्यातील प्रगल्भता अत्यंत आवश्यक असते. 'नीट' परीक्षेतील पेपरफुटी विरोधात कॉक्रोच जनता पक्षातर्फे केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली होती. आंदोलनाच्या दबावामुळेच हा राजीनामा झाला असा दावा केला जात असला, तरी यामागील राजकीय पृष्ठभूमी वेगळी होती.



एका मोठ्या वर्गाने याआधीच 'यूजीसीच्या नियमावलीतील बदलांवरून शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करत आंदोलन उभारले होते. पुढे सर्वोच्च न्यायालयाने या बदलांना स्थगिती दिल्याने तो विषय तिथेच थांबला. परंतु, वाढत्या नाराजीमुळे सरकारला प्रधान यांचा राजीनामा घेणे अनिवार्य झाले असावे. त्यामुळे हा राजीनामा केवळ एकाच आंदोलनाचा परिणाम होता, असे मानणे वास्तवाला धरून ठरणार नाही.

पंजाब, कर्नाटक आणि तेलंगणामध्ये झालेल्या पेपरफुटीबाबत तेथील शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा मागणार का, असा थेट प्रश्न विचारल्यावर दीपके यांचे उत्तर अत्यंत गोलमोल आणि पळपुटे होते; कारण तेथे विरोधी पक्षांची (आम आदमी पक्ष व काँग्रेस) सरकारे आहेत. अशी राजकीय सोयीनुसार उत्तरे देणे नेतृत्वातील अपरिपक्वता उघडी पाडणारे ठरते. आंदोलनाला कोणत्याही राजकीय दावणीला न बांधता संयम, निष्पक्षता आणि वैचारिक परिपक्वता दाखवली, तरच त्याला खरी नैतिक ताकद, प्रतिष्ठा आणि जनपाठिंबा मिळू शकतो. ■

**अविनाश देशपांडे**/पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

# 'सिंहगड'मध्ये उद्या कृषी व्यवसाय संधीवर राष्ट्रीय परिसंवाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै-**

सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंहगड इन्स्टिट्यूट, सोलापूर कॅम्पस येथील सेंटर फॉर रिसर्च अँड टेक्नॉलॉजी डेव्हलपमेंट यांच्या पुढाकाराने ग्रीन एज फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने 'Gen Z Farmers साठी Agribusiness Oortunities' या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन शुक्रवार, ३१ जुलै रोजी करण्यात आले आहे. हा परिसंवाद सिंहगड इन्स्टिट्यूटच्या विश्वेश्वरय्या सभागृहात सकाळी ९.३० वाजता सुरू होणार आहे. परिसंवादाचे उद्घाटन सत्र माजी क्षेत्रीय महाव्यवस्थापक, बँक ऑफ इंडिया, पुणे मुकुंद कुलकर्णी यांच्या बीजभाषणाने होणार आहे. माजी कुलगुरू तथा सिंहगड इन्स्टिट्यूटच्या CRTD संशोधन केंद्राचे प्रमुख प्रा. डॉ. एस. एच. पवार यांच्या मार्गदर्शनाखाली नाविन्यपूर्ण संशोधनावर विशेष भर देण्यात येत आहे.

## जाहीर नोटीस

सोलापूर येथील तमाम जनतेस विशेषतः अक्कलकोट ग्रामीण, ता. अक्कलकोट येथील जनतेस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन** : डि व सब डि सोलापूर पैकी तालुका अक्कलकोट पैकी मौजे अक्कलकोट ग्रामीण येथील गट नं.१०१०/७, यासी क्षेत्र १ हे २१ आर यासी आकारणी रू.२-२५० पैसे जिरायत शेतजमिन.

वर नमूद मिळकत ही शंकुतला शामराव होटकर यांच्याकडून आमचे अशिल विशाल चंद्रसेन राठोड, रा. १४३, खासबाग गल्ली, हसापूर रोड, अक्कलकोट यांनी दि. ३१/१२/२०२५ रोजी दस्त क्र. ९४०१/२०२५ अन्वये खरेदी घेतलेली आहे. सदरची शेतजमिन ही त्याचे मालकी कब्जे वहिवाटीचे असून सदरची मिळकत भोगवटदार २ मधील असून त्यास भोगवटदार १ मध्ये हस्तांतरण (तबदील) करणेसाठी जा.क्र.कु.का/कार्या-२/ई.ऑ.क्र.७३४५४००/आरआर/५५३/२०२६ अन्वये मा. जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांचेकडून पत्र मा. तहसिलदार साहेब अक्कलकोट यांचेकडे अटी व शर्तीस अधिन राहुन सदरची जाहिर नोटीस प्रसिध्द करत आहोत.

तरी वर नमुद मिळकतीबाबत इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, लिज, टाच, पोटगी, कोर्ट प्रकरण व इतर कायदेशीर हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खालील नमुद पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी आपली हरकत नोंदवावी. त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी.

जाहीर नोटीस दिली ता.२९/०७/२०२६.

**सही/-**
**ॲड. सौ. अरुणा संजय घोडके (साळुंके)**
**ब्लॉक नं.९, विद्युत नगर, लक्ष्मी पेठ, सोलापूर**
**मो. नं. ९५५२४७६२३८ अशिलातर्फे ॲडव्होकेट**

## मध्य रेल्वे

**सोलापुर मंडळ**

**विविध सिग्नलिंग कामे**

उपमुख्य सिग्नल व दूरसंचार अभियंता/प्रकल्प कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर भारत सरकारच्या राष्ट्रपतींच्यावतीने आणि त्यांच्यासाठी रेल्वेच्या ई-प्रोक्युअरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर सक्षम, नामांकित संस्था/कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी ऑनलाइन ई-निविदा मागवत आहे: उघडी निविदा सूचना क्रमांक SUR-SNT-PROJ-02-BS-2026 दिनांक: 28/07/2026 कामाचे नाव आणि ठिकाण : मध्य रेल्वेच्या सोलापूर मंडळातील माढा-टिकेकरवाडी विभागादरम्यानच्या मिड-सेक्शन ऑटो ब्लॉक हट (सिग्नल आणि दूरसंचार सेवा इमारत) चे बांधकाम व विद्युतीकरण यासह संबंधित कामांसह लगतच्या स्थानकांवरील विद्यमान इलेक्ट्रॉनिक/रिले इंटरलॉकिंगमध्ये बदल करणे आणि ऑटो हट्समध्ये इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंगसह सतत ट्रॅक सर्किटिंगसाठी मल्टी सेक्शन डिजिटल ॲक्सल काउंटरचा वापर करून स्वयंचलित सिग्नलिंग कामाचे सर्वेक्षण, डिझाइन, पुरवठा, इन्स्टॉलेशन, चाचणी आणि कार्यान्वित करण्याचे संयुक्त काम. कामाची अंदाजित किंमत रु. 80,52,10,740.79/- निविदा अर्जाची किंमत: काहीही नाही, जमा करावयाची बयाणा रक्कम: रु 1,61,04,200.00/- काम पूर्ण करण्याचा कालावधी: 24 महिने निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: 01/09/2026 रोजी 15.00 वाजल्यानंतर. अधिक माहितीसाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या.

**उप मु. सि. एवं दू. अ.**

रेल्वे मार्गाजवळ असुरक्षित आणि अनधिकृत काम करणे हा दंडनीय गुन्हा आहे. 36

## खरेदीपूर्व सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन : जिल्हा व उपजिल्हा सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिकेच्या नवीन हद्दवाढ भागातील केगांव, ता.उत्तर सोलापूर मधील बिनशेती प्लॉटजागा यांसी गट क्र.४२/ब/२/१ यापैकी प्लॉट क्र. १२६ याचे क्षेत्रफळ १००.०० चौ.मीटर असून, यांसी चतुःसिमा :- पुर्वेस - रस्ता, दक्षिणेस - प्लॉट क्र.१२७, पश्चिमेस - प्लॉट क्र.१३४ व उत्तरेस - प्लॉट क्र.१२५ आदि वर्णनाची प्लॉट जागा मिळकत ही श्री. सुभाष चतुर्भुज पारडे, रा. सोलापूर यांच्या स्वसंपादित खरेदी मालकी हक्क व प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीची असून, रेकॉर्ड ऑफ राईटसला तशी नोंद आहे.

सदर प्लॉट जागा आर्थिक अडचण निर्माण झालेने व प्लॉटधारकांना गैरसोयीची ठरत असलेने विक्री करण्याचे ठरवून आमचे अशिल क्र. १) राजकुमार गजेंद्र स्वामी, २) संगमेश्वर गजेंद्र स्वामी दोघेही रा. सोलापूर यांच्या समवेत खरेदीचा प्राथमिक करार करून इसारा रक्कम स्वीकारलेली आहे. त्यावेळी संबंधीत प्लॉटधारकांनी सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री दिली आहे.

सबब, या सावधानतेच्या जाहीर नोटीसीद्वारे तमाम लोकांस सुचना देण्यात येते की, या मिळकती संदर्भातील खरेदी-विक्रीचे व्यवहारास कोणाची कसलीही हरकत, आक्षेप, हक्क हितसंबंध कसलाही करार, हक्क पोहचत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ०७ दिवसांचे आत मो.क्र.९४२०४८९३३७ या क्रमांकावर पुराव्यानिशी आक्षेप नोंदवावा अगर मुदतीत कोणाची कसलीही हरकत / आक्षेप प्राप्त न झाल्यास आमचे अशिल सदर प्लॉटधारकासमवेत ठरल्याप्रमाणे खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर मात्र कोणाची कसलीही तक्रार विचारात घेतली नाही याची नोंद घ्यावी. कोणाची कसलीही फसगत होऊ नये म्हणून ही खरेदीपुर्व सावधानतेची सुचना आमचे अशिल देत आहेत. ही जाहीर नोटीस दिली दि. २९/०७/२०२६

**सही/-**
**ॲड. सुरेश भा. गायकवाड**
**एम.कॉम., एलएल.बी.**
**ॲड. मंजुश्री एस. देशमुख**
**चेंबर नं. १०८, बेसकर अर्च,**
**बॉम्बे मर्कंटाईल बँकेच्या वरती, सिध्देश्वर पेठ,**
**जिल्हा न्यायालयाचे शेजारी, सोलापूर**
**मो.नं. ९४२०४८९३३७**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन :-** डि. व सब डि. सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर शहर महानगर पालिका हद्दवाढ भागातील कसबे सोलापूर येथील जुना सर्व्हे नं. ११७/२ब यासी नविन सर्व्हे नं. ११५/२ब यापैकी क्षिरालिंग नगरमधील प्लॉट नं. ७२५ याचे क्षेत्र ५५.७६ चौ. मीटर अथवा ६०० चौ. फुट इतकी असून यासी चतुःसीमा :- पुर्वेस :- रस्ता पश्चिमेस :- रस्ता दक्षिणेस :- देवी मंदिर उत्तरेस :- प्लॉट नं. ७२६ येणेप्रमाणे चतुःसीमेतील प्लॉट जागा त्यातील तदंगभुत वस्तूंसह.

ही मिळकत प्लॉट जागा **१.** श्री. मल्लेश शंकरय्या वंगारी, रा. १३२, चाकोते नगर, सोलापूर, **२.** श्री. कृष्णा लिंगय्या संभारम, रा. प्लॉट नं. २४, पद्मा नगर, सोलापूरयांचे मालकीची असून त्यांनी ही प्लॉट जागा आमचे अशिलास कायम खुषखरेदीने देण्याचे ठरवून इसारा पावती लिहून दिला आहे. त्यांनी ही मिळकत निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याचे खात्री व भरवसा दिला आहे. तरीही या प्लॉट जागेवर कोणाचाही कसलाही गहाण, दान, बक्षिस, इसारा पावती, साठेखत, खरेदीखत, वारसा, पोटगी, टाच, बोजा, जप्ती, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क, हितसंबंध वा वाद असल्यास, त्यांनी खालील नमूद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांचे आत लेखी कळवावे. मुदतीत कोणाचेही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसल्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध नसल्याचे समजून अथवा त्यांनी तो जाणीवपुर्वक स्वेच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशिल लवकरच खरेदीखत करुन घेतील. नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. दि. २९/०७/२०२६

**सही/-**
**ॲड. राजरतन द. श्रीराम**
**ऑफिस - १६२८, कुचन नगर, सोलापूर-५**
**मो.नं. ९८८१२४०५१६**

## सावधगिरीची जाहीर नोटीस

तमाम जनतेस विशेषतः मौजे भालगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर व आसपासचे परिसरातील जनतेस या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, डि सोलापूर सब डि व ता. बार्शी पैकी मौजे भालगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील जमीन गट नं. १०६ याचे क्षेत्र ०० हे. ८४ आर, आकार ०३ रू. १२ पैसे, जमीन गट नं. २३ याचे क्षेत्र ०१ हे. ८१ आर, आकार ०१ रू. ३७ पैसे, जमीन गट नं. २५ याचे क्षेत्र ०१ हे. ०२ आर, आकार ०१ रू. ४४ पैसे, जमीन गट नं. ६९ याचे क्षेत्र ०२ हे. ३५ आर + पोटखराब ०६ आर असे एकूण ०२ हे ४१ आर, आकार ०३ रू. २५ पैसे, जमीन गट नं. १०२५ याचे क्षेत्र ०२ हे. २१ आर + पोटखराब ०७ आर असे एकुण ०२ हे. २८ आर तसेच जमीन गट नं. १००२ क्षेत्र ११ हे. ७३ आर + पोटखराब ०९ आर असे एकूण ११ हे. ८२ आर.

येणेप्रमाणे वर वर्णन केलेली मिळकत ही आमचे अशिल छाया सुरेश हंडीबाग यांची वडिलोपार्जीत सामाईकातील शेतजमीन आहे. सदर जमिनीचे अद्यापपावेतो सरस निरस मानाने वाटप झालेले नाही, त्या संदर्भात आमचे अशिलांनी बार्शी दिवाणी न्यायालयात दावा-डिक्लेरेशन व सरसनिरस मानाने वाटप होऊन, पृथक कब्जा मिळणेचा रे.दि.दावा क्र. ६८२/२०२४ हा दावा दाखल केलेला असून सदर दावा प्रलंबीत आहे. सदर दाव्याकामी आमचे अशिलास हमखास यश येण्याची खात्री आहे.

असे असताना सदर मिळकतीचे सहहिस्सेदार विनायक मोहन ढवळे, संतनाथ उर्फ संतराम मोहन ढवळे, रामचंद्र मोहन ढवळे, दिनेश उर्फ दिनकर मोहन ढवळे (मयत) यांचे वारस प्रेमा सतिश गायकवाड, संगिता दत्तात्रय शिंदे हे सदर मिळकती विक्री करण्याच्या तयासरीत असल्याचे आमचे अशिलास खात्रीशी माहिती झालेली आहे. करिता प्रस्तुत जाहीर प्रगटनाद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, वर नमुद मिळकतीसंदर्भात कोणीही इसारपावती, करारनामा, साठेखत, खरेदीखत, तारण, गहाण, बक्षिस, दान, टाच, बोजा इ. बाबतचा कसल्याही स्वरूपाचा हस्तांतरणाबाबतचा व्यवहार करू नये, तसा केला गेलेला विक्रीचा अथवा इतर हस्तांतरणाचा व्यवहार आमचे अशिल यांच्या कायदेशीर हक्क व अधिकारावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून व आमचे अशिलाचे हक्क, हिश्श्याची जाणीव करून देण्यासाठी सावधनतेची जाहिर नोटीस दिली असे. दिनांक :- २९/०७/२०२६

**जाहीर प्रगटन देणार तर्फे**
**सही/-**
**ॲड. श्रीहरी उत्तरेश्वर भोसले**
**जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी**
**मो.नं. ९८५०१२०१२४**
**जिल्हा व दिवाणी न्यायालय**





## श्री बालाजी बहुउद्देशीय समाजसेवा संस्था, शिराळे

### ता. बार्शी, जि. सोलापूर

**थेट मुलाखत**

संस्थेच्या सोलापूर जिल्ह्यातील अनुदानित माध्यमिक विद्यालयातील कनिष्ठ लिपिकाचे पद भरण्यासाठी खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या पात्र उमेदवारांनी संस्थेच्या यशवंत विद्यालय शिराळे, ता. बार्शी, जि. सोलापूर या पत्त्यावर रविवार दिनांक ०२/०८/२०२६ रोजी सकाळी १० ते १ या वेळेत थेट मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.

| अ. क्र | पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता | एकूण पदे | मानधन | आरक्षण प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ लिपीक | कोणत्याही शाखेचा पदवीधर मराठी-३० व इंग्रजी-४० टंकलेखन उत्तीर्ण व संगणकाचे ज्ञान आवश्यक | १ | १०,०००/- एकत्रित | खुला |

**सही/-**
**अध्यक्ष**
**श्री बालाजी बहुउद्देशीय समाजसेवा संस्था, शिराळे**
**ता. बार्शी, जि. सोलापूर**

## यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India

A Government of India Undertaking

क्षेत्रीय कार्यालय – अहिल्यानगर
प्लॉट नं. ३, ४, ८ व ९, बोल्हेगाव पुलाजवळ, नगर मनमाड रोड, नागापूर, अहिल्यानगर – ४१४१११

**आर्कीटेक्ट व ठेकेदार यांची ३ वर्षे मुदतीसाठी सुचीबध्द करण्यासाठी निवीदा**

युनियन बँक ऑफ इंडीया, क्षेत्रिय कार्यालय, अहिल्यानगर तीन वर्षे मुदतीसाठी नेमणुक करण्यासाठी आर्किटेक्ट / सल्लागार संस्था, सिव्हील व इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर यांचेकडून बंद लिफाफ्यात निवीदा मागवित आहेत. फर्नीशिंग, इंटेरियर डेकोरेशन, लॅण्डस्केपींग कामाचे स्वरूप (४० लाखांपर्यत) व इलेक्टीकल, ए.सी.व डाटा केबलिंग कामाचे स्वरूप (२० लाखांपर्यत) आणि आर्कीटेक्ट डिझाईनिंग काम हे अहिल्यानगर क्षेत्रिय कार्यालय कक्षेतील सर्व शाखा व इतर मालमत्ता करीता आहे.

इच्छुक वैयक्तिक/ फर्मस/ कंपनी हे अर्ज फॉर्म हे वरील पत्त्यावरुन रु १,000/– (विना परतावा) ची अहिल्यानगर येथे देय असलेली व युनियन बँक ऑफ इंडीयाच्या नावे पे ऑर्डर / डिमांड डाफ्टद्वारे भरणा केल्यावर कार्यालयीन वेळेत दि. ३०/०७/२०२६ ते दि.:१९/०८/२०२६ दरम्यान मिळवता येतील. सदर अर्ज फॉर्म हे बँकेची वेबसाईट www.unionbankofindia.co.in व www.eprocure.gov.in. व येथूनही डाऊनलोड करता येतील. पूर्ण भरलेले अर्ज फॉर्म व सिलबंद निविदा वरील पत्त्यावर सादर करण्याची अंतिम तारिख दि. १९/०८/२०२६ दु. ४.00 वाजेपर्यत आहे.

प्राप्त अथवा कोणताही निविदा अर्ज कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार युनियन बँक ऑफ इंडीयाने राखून ठेवला आहे.

दि. २९/०७/२०२६
अहिल्यानगर

क्षेत्रीय प्रमुख
क्षेत्रीय कार्यालय,अहिल्यानगर

ARL

## श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर

मुख्य कार्यालय : ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२ फोन नं-०२१७-२६२२९३४४/२६२२९३३

### नमुना झेड

**(नियम १०७ पोटनियम ११ (डी-१) पहा)**

**स्थावर मालमत्ता ताब्यात घेतलेबाबतची नोटीस**

ज्या अर्थी खाली सही करणार विशेष वसुली व विक्री अधिकारी श्री कृष्णाहरी यल्लप्पा मैसूर C/O श्री महावीर अर्बन को ऑप. बँक ली., सोलापूर ही संस्था महाराष्ट्र सहकारी कायदा १९६१ अन्वये यादीतील ऋणको (थकबाकीदार) याने रक्कम जमा करण्यास कसूर केले आहे. त्या अर्थी खाली सही करणाऱ्याने खालील नमूद यादीतील ऋणको यांची स्थावर मिळकतबाबत जप्तीची नोटीस देऊन व रजी. गहाणखत अन्वये गहाण ठेवलेली या पुढे निर्दिष्ट केलेली स्थावर मालमत्ता जप्त केलेली आहे. ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे, ऋणकोला आणि सर्व नागरिकांना जाहीर नोटीस देण्यात येते की, खाली निर्दिष्ट केलेल्या स्थावर मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १०७ पोटनियम ११ (डी-१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार प्रतीकात्मक (सिम्बॉलिक) ताबा घेतलेला आहे. विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येत आहे की, खाली नमूद केलेल्या यादीतील मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास श्री महावीर अर्बन को ऑप. बँक ली., सोलापूर या संस्थेच्या खाली नमूद केलेल्या बोजाची रक्कम आणि त्यावरील व्याज, कायदेशीर शुल्क व भविष्यात होणारे इतर खर्चाचा बोजा सदर मिळकतीवर राहील याची नोंद घ्यावी.

| अ. क्र. | कर्जदार / जामिनदाराचे/ मिळकतदाराचे नाव | मिळकतीचे वर्णन | सिसनं / गट नं / क्षेत्र | दिनांक मागणी नोटीस व प्रतीकात्मक ताबा दि. ३०/०६/२०२६ अखेर येणेबाकी |
|---|---|---|---|---|
| १ | चंद्रकांत गिरमला गाढवे (श्री साईबालाजी ट्रेडर्स, प्रोप्राः परमेश्वर चंद्रकांत गाढवे) यांचे सहकर्जदार | डी. व सब डी. सोलापूर पैकी ता. अक्कलकोट पैकी मौजे बोरेगांव येथील | चंद्रकांत गिरमला गाढवे यांच्या मालकीचे:<br>१. गट नं. १२८/१ याचे क्षेत्र १.४७.०० हे.आर. चौ. मी.<br>२. गट नं. ११९/५ याचे क्षेत्र १.५०.०० हे.आर.चौ. मी. पो. खराब ०.०३.०० | २७/०३/२०२६<br>२९.०७.२०२६<br>रु. ४१,५३,८९९/- |
| २ | बसवराज शिवशंकर उंबरजे प्रोप्रा : बसवराज शिवशंकर उंबरजे | डी. व सब डी. सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी सोमपा हद्दीतील मौजे शेळगी | येथील सि.स.नं. ७९/१/ब/२ (खरेदी खताप्रमाणे गट नं.७९/अ/२) पैकी प्लॉट नं.१०३ व १०४ क्षेत्र ७८७५ चौ. फुट व ७६२५ चौ फुट ऑनलाईन उताऱ्याप्रमाणे ०.१४.४० हे आर चौ.मी. | २७/०३/२०२६<br>२८/०७/२०२६<br>रु. २५,८२,१६१/- |

वरील सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या स्थावर मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा, ताबा पत्रावर सही करून, खाली नमूद वसुली अधिकारी यांच्याकडे या जाहीर प्रसिद्धीकरण दिनांकापासून १५ दिवसांच्या आत घ्यावा. अन्यथा तसे न केल्यास मुदतीनंतर सदर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेण्याची कायदेशीर प्रक्रिया मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांचेकडे अर्ज करून पार पडले जाईल व तसेच उपरोक्त स्थावर मालमत्ता विक्रीस काढण्यात येईल. तरी त्यापुढील होणाऱ्या सर्व परिणामास आपण सर्वस्वी जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी.

**स्थळ : सोलापूर**
**दिनांक : ३०/०७/२०२६**

**सही/-**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**श्री महावीर अर्बन को. ऑप. बँक ली., सोलापूर**

## खरेदीपूर्व सावधानतेची जाहीर

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन : जिल्हा व उपजिल्हा सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिकेच्या नवीन हद्दवाढ भागातील केगांव, ता. उत्तर सोलापूर मधील बिनशेती प्लॉट जागा यांसी गट क्र. ४२/ब/२/१ यापैकी प्लॉट क्र. १२५ याचे क्षेत्रफळ १००.०० चौ.मीटर असून, यांसी चतुःसिमा :- पुर्वेस - रस्ता, दक्षिणेस - प्लॉट क्र. १२६, पश्चिमेस - प्लॉट क्र. १३३ व उत्तरेस - प्लॉट क्र. १२४ आदि वर्णनाची प्लॉट जागा मिळकत ही श्री. सुभाष चतुर्भुज पारडे, रा. सोलापूर यांच्या स्वसंपादित खरेदी मालकी हक्क व प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीची असून, रेकॉर्ड ऑफ राईटसला तशी नोंद आहे.

सदर प्लॉट जागा आर्थिक अडचण निर्माण झालेने व प्लॉटधारकांना गैरसोयीची ठरत असलेने विक्री करण्याचे ठरवून आमचे अशिल क्र. १) प्रमोद सुनिल चव्हाण, २) लखण सुनिल चव्हाण दोघेही रा. देगांव, देशमुख वस्ती, सोलापूर यांच्या समवेत खरेदीचा प्राथमिक करार करून इसारा रक्कम स्वीकारलेली आहे. त्यावेळी संबंधीत प्लॉटधारकांनी सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री दिली आहे.

सबब, या सावधानतेच्या जाहीर नोटीसीद्वारे तमाम लोकांस सुचना देण्यात येते की, या मिळकती संदर्भातील खरेदी-विक्रीचे व्यवहारास कोणाची कसलीही हरकत, आक्षेप, हक्क हितसंबंध कसलाही करार, हक्क पोहचत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ०७ दिवसांचे आत मो.क्र. ९४२०४८९३३७ या क्रमांकावर पुराव्यानिशी आक्षेप नोंदवावा अगर मुदतीत कोणाची कसलीही हरकत/आक्षेप प्राप्त न झाल्यास आमचे अशिल सदर प्लॉट धारकासमवेत ठरल्याप्रमाणे खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर मात्र कोणाची कसलीही तक्रार विचारात घेतली नाही याची नोंद घ्यावी. कोणाची कसलीही फसगत होऊ नये म्हणून ही खरेदीपूर्व सावधानतेची सुचना आमचे अशिल देत आहेत. ही जाहीर नोटीस दिली दि. २९/०७/२०२६

**सही/-**
**ॲड. सुरेश भा. गायकवाड**
**एम.कॉम., एलएल.बी.**
**ॲड. मंजुश्री एस. देशमुख**
**चेंबर नं. १०८, बेसकर अर्च,**
**बॉम्बे मर्कंटाईल बँकेच्या वरती, सिध्देश्वर पेठ,**
**जिल्हा न्यायालयाचे शेजारी, सोलापूर**
**मो.नं. ९४२०४८९३३७**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

## सिलींग जमीन भोगावटदार वर्ग-२ वरून भोगावटदार वर्ग-१ करीता जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसेने कळविण्यात येते की,जि. सोलापूर ता. माळशिरस पैकी मौजे विझोरी येथील गट नं. १०४/२ क्षेत्र हे.०१-७४ आर,आकार रू.००-८० पैसे यांसी चतुःसिमा :- पूर्वेस - गट नं. १०४/१क/२, दक्षिणेस - विझोरी व पिसेवाडी शिवेचा रस्ता, पश्चिमेस - गट नं. १०४ पैकी व उत्तरेस :- गट नं. १०४ पैकी शिल्लक क्षेत्र अशा वर्णनाची मिळकत ही आमचे अशिल शंकरराव मोहिते-पाटील चॅरिटेबल ट्रस्ट शंकरनगर, ता. माळशिरस, जि. सोलापूर यांचे मालकीची असून सदरची जमीन भोगावटदार वर्ग-२ ची असल्याने सदर जमिनीची भोगवटदार वर्ग-२ वरून भोगवटदार वर्ग-१ करीता आमचे अशिल शंकरराव मोहिते-पाटील चॅरिटेबल ट्रस्ट शंकरनगर, ता. माळशिरस, जि. सोलापूर यांनी मा. अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर (कुळ कायदा शाखा) या कार्यालयास अर्ज सादर केलेला आहे.

तरी उक्त नमूद शेतजमिनीबाबत व त्यामध्ये झालेल्या व्यवहाराबाबत किंवा इतर कुठल्याही प्रकारचे व्यवहारांबाबत किंवा उक्त जमिनीबाबत कोणाचाही करारा, लिज, भाडेपट्टा, पोटगी हक्क, वारसा हक्क, बोजा, गहाण, दान, लिज, कर्ज कोर्ट केसेस, मृत्युपत्र, खरेदी, विक्री, साठेखत, पतसंस्थेचा बोजा, सावकारी देणे-घेणे इ.बाबत काही हरकत / तक्रार / हितसंबंध / अधिकार असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात (७) दिवसांचे आत मा. अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर (कुळ कायदा) सात रस्ता, सोलापूर या पत्तावर आपली हरकत नोंदवावी. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झालेस कोणाचीही हरकत नाही असे समजून उक्त शेतजमिनीचा भोगवटदार वर्ग-२ वरून भोगवटदार वर्ग-१ करणेकामी पुढील कार्यवाही करणेत येईल यांची नोंद घ्यावी.

कळावे, ही जाहीर नोटीस दिली असे ता. २९/०७/२०२६

**सही/-**
**श्री. दिलीप अभयकुमार फडे**
**आयडीबीआय बँक शेजारी, स्तंभासमोर**
**महावीर पथ, अकलूज - ४१३१०१**
**ता. माळशिरस, जि. सोलापूर**
**मो.नं. ९४२२४६०५७८**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम जनतेस डी. सोलापूर, सब डी व शहर बार्शी ता.बार्शी येथील व आसपास भागातील रहिवाशी यांना या जाहीर नोटीसिने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डी. सोलापूर सब. डी. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी शहर म्यु. पल हद्दीतील बिनशेती खुला प्लॉट याचा गट नं. १०८०/२/१/२ पैकी प्लॉट नंबर २ याचे क्षेत्रफळ १७३.०० चौ.मी. असे आहे. याचे चतुःसिमा :- पूर्व - ले आऊट प्लॉट नं.०३, दक्षिणेस - प्लॉट नंबर ९८, पश्चिमेस - ले आऊटमधील ९ मी. रुंदीचा रस्ता, उत्तरेस - ले आऊट प्लॉट नं.०१ येणेप्रमाणे चतुःसिमापूर्वक प्लॉट त्याची पाणी व वागणूक पश्चिमेस बाजूने आहे. आतील सर्व तदंगभूत वस्तु हक्कासह येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत ही जुबेर हनिफ मुलाणी, रा. बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांच्या मालकीची कब्जे वहिवाटीची असून त्यांनी आमचे अशिलास कायमखुष खरेदी देण्याचे ठरवून ईसार अन्वये इसारापोटी रक्कम घेतलेली आहे. जुबेर हनिफ मुलाणी यांनी सदरची मिळकत ही निर्वेध निर्जोखमि व बिनबोजाची असल्याबाबत आमचे अशिलास खात्री दिली आहे.

सबब या जाहीर नोटीसिने तमाम जनतेस कळविण्यात येते की, ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसांच्या आत वर नमूद मिळकतीबाबत कोणाचे काही हक्क, अधिकार, पोटगी, भाडेपट्टा, करारनामा, इसारपावती, कुलमुखत्यार, साठेखत, खरेदीखत, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र, गहाणखत, बँक प्रकरण, चोळी-बांगडी इ. काही व्यवहार असल्यास मुदतीत आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह खाली नमूद पत्त्यावर समक्ष भेटून खात्री करून पटवून द्यावी. मुदतीत कोणाची काही तक्रार न आल्यास सदरची मिळकत निर्वेध निर्जोखमी व बिनबोजाची आहे असे समजून ग्रहित धरून आमचे अशील खरेदीबाबतचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाची काही एक तक्रार चालणार नाही म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिद्ध केली आहे.

ही जाहीर नोटीस प्रसिद्ध केली ता. २९/०७/२०२६

**सही/-**
**ॲड. विजय बा. गलांडे**
**बार्शी जिल्हा व सत्र न्यायालय आवार,**
**बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर**
**मो. ७४१०७३७४७९**

## सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना लि., शंकरनगर-अकलूज ता. माळशिरस, जि. सोलापूर

जा.नं.-प्रशासन/अ.वार्षिक सर्व.सभा/१५२२/२०२६-२०२७

दिनांक २४ जुलै २०२६

### अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त सभासदांकरिता)**

आपले सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना लि., शंकरनगर-अकलूज या संस्थेची सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाची ६६ वी मा.अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक १४/०८/२०२६ रोजी दुपारी ३:०० वाजता "सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना फॅक्टरी बिल्डिंगमध्ये" खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी, सदर सभेस सभासदांनी उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

**- सभेपुढील विषय -**

विषय नं. १ - मागील दि.२३/०९/२०२५ रोजी भरलेल्या मा.अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत कायम करणे.

विषय नं. २ - दिनांक १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ अखेर संपणाऱ्या आर्थिक वर्षाचा संस्थेच्या कार्याचा मा.संचालक मंडळाकडून आलेला वार्षिक अहवाल स्विकारणे व त्याची नोंद घेणे.

विषय नं. ३ - दिनांक १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ अखेर वैधानिक लेखापरिक्षक एम.जी.बी.एम.ॲन्ड असोसिएटस्, चार्टर्ड अकौंटंटस्, यांनी तपासलेली व मंजूर केलेली हिशोबाची पत्रके असलेल्या ताळेबंद व नफा-तोटा पत्रकास मंजूरी देणे.

विषय नं. ४ - दिनांक १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ अखेर संपणाऱ्या आर्थिक वर्षाचा वैधानिक लेखापरिक्षक एम.जी. बी.एम.ॲन्ड असोसिएटस्, चार्टर्ड अकौंटंटस्, यांचेकडून आलेला हिशोब तपासणी अहवाल (ऑडीट रिपोर्ट) बाबत विचार विनिमय करणे.

विषय नं. ५ - सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षाकरिता मा. संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाजपत्रकाची (बजेट) नोंद घेणे आणि सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षामध्ये मंजूर अंदाजपत्रकापेक्षा कमी/जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे.

विषय नं. ६ - पोटनियम नं. ४ अन्वये मा. संचालक मंडळास भांडवल उभारणेचा अधिकार देणेबाबत विचार करणे.

विषय नं. ७ - सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षामध्ये " ई ऑक्शनद्वारे " विक्री केलेल्या स्क्रॅप मालाची माहिती घेऊन त्यास कार्योत्तर मान्यता देणे.

विषय नं. ८ - सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठी टॅक्स ऑडिटर व सल्लागार यांचे केलेल्या नेमणूकीस मंजूरी देणे व सन २०२७-२०२८ या आर्थिक वर्षाकरिता टॅक्स ऑडिटर व सल्लागार यांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणेबाबत विचार करणे.

विषय नं. ९ - सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षणासाठी शासनमान्य लेखापरिक्षकांच्या नामतालिकेमधून वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व लेखापरिक्षण शुल्क ठरविणेबाबत निर्णय घेणे.

विषय नं.१० - मा.साखर आयुक्तसो., महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील परिपत्रकाअन्वये सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात मा.संचालक मंडळाच्या पुर्व मंजूरीने यंत्र सामुग्री खरेदी व स्थापत्य बांधकाम विषयक केलेल्या भांडवली कामाची माहिती घेऊन त्यास कार्योत्तर मान्यता देणे.

विषय नं.११ - साखर कारखाना, को-जनरेशन व डिस्टीलरी प्रकल्प अनुषंगिक मशिनरी आधुनिकीकरण करणेबाबत विचार विनिमय करणे.

विषय नं.१२ - कारखाना पुरस्कृत स्थापन झालेल्या शंकरराव मोहिते-पाटील चॅरिटेबल हॉस्पिटल ट्रस्ट व सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील शेतकरी कल्याण निधी ट्रस्ट या विश्वस्त संस्थांकडील सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात झालेल्या कामकाजाची व हिशोब पत्रकांची माहिती घेवून मंजूरी देणे व निधी कपातीबाबत विचार करणे.

विषय नं.१३ - ॲसेटिक ॲसिड प्रकल्पाबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

मा.अध्यक्षांचे पूर्व परवानगीने योग्यरितीने सभेपुढे येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

कळावे,

आपला विश्वासू,
मा.संचालक मंडळाचे आदेशावरून,
(एस.आर.यादव)
कार्यकारी संचालक

### - विशेष सुचना -

१) सहकारी संस्था सभासदातर्फे मा.अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणे, कामकाजात भाग घेणे, मतदान करणे इ.बाबत आपल्या प्रतिनिधीस अधिकार दिल्याबद्दल सोसायटी पंचकमिटीच्या ठरावाची खरी नक्कल दि.०८/०८/२०२६ पर्यंत कारखाना कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत पोहोचल्या पाहिजेत.
२) ताळेबंद व नफा-तोटा पत्रकाच्या नकला सभासदांचे अवलोकनार्थ प्रशासकीय कार्यालयाचे नोटीस बोर्डवर लावलेले आहेत.
३) गणपुर्ती (कोरम) अभावी सभा तहकूब झालेस ती सभा कारखान्याच्या पोटनियम क्र.२३ ला अधिन राहून पार पाडली जाईल.
४) मा.सभासदांना कारखान्याच्या कामकाजासंबंधी काही माहिती हवी असल्यास ती दि.०८/०८/२०२६ पर्यंत कारखाना कार्यालयात ऑफिस वेळेमध्ये मागणी करणेत यावी.
५) कारखान्याचे थकबाकीदार सभासदांनी थकबाकी भरणा करावी.
६) कारखान्याचे सर्व सभासदांनी त्यांचेकडील संपुर्ण उपलब्ध ऊस सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याकडे गळीतासाठी द्यावा.
७) सभासदांनी त्यांचे भागाचे (शेअर्स) अपुर्ण रक्कम पुर्ण करावी.
८) सभासदांनी त्यांचे भागाचे (शेअर्स) संदर्भात वारस नोंद संस्थेकडे द्यावी.
९) सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याकडील उपलब्ध सेवांचा लाभ घ्यावा. ऊसाची नोंदणी करावी, उपलब्ध ऊस गाळपास द्यावा तसेच सभासदास लागू असलेल्या सर्व नियमांची पुर्तता करावी.
१०) सदर नोटीस संस्थेच्या शेतकी विभागातील कर्मचारी यांचे मार्फत पोहोच करण्यात आली आहे.

## SHRI MAHAVIR URBAN CO. OP BANK LTD., SOLAPUR

Head Office: 60/61, East Mangalwar Peth, Solapur 413002
PH: (0217) 2622933/44

**DEMAND NOTICE UNDER SECTION 13(2) OF SARFAESI ACT 2002**

Whereas you the below mentioned Borrower, Guarantor's and Mortgagors have availed loan from Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur, by mortgaging your immovable properties. Consequent to default committed by you all, your loan account has been classified as Non Performing Asset, whereas Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur being a secured creditor under the Act, and in exercise of the powers conferred under section 13(2) of the said Act read with rule 2 of Security Interest (Enforcement) Rules 2002, issued Demand Notice calling upon the Borrowers/Guarantor's/Mortgagors as mentioned below on their last known address to repay the amount mentioned in the notices with future interest thereon within 60 days from the date of the notice, but some notices have been returned unserved due to certain reasons, thus this public notice is being issued as follows:

| Sr. No. | Particular | Description |
|---|---|---|
| 1 | Name of Borrower/ Guarantor/ Mortgagor | 1) Vishal Pandit Navgan R/o: 3856, Bhavani peth, Barshi Dist.Solapur-413401<br>2) Pandit Sopan Navgan R/o: 3856, Bhavani peth, Barshi Dist.Solapur-413401<br>3) Atul Mohan Navgan R/o: 3856, Bhavani peth, Barshi Dist.Solapur-413401<br>4) Ganesh Jayant Waghmare R/o: 3338, Mahavir Marg, Barshi Dist.Solapur-413401 |
| | Loan Account No. / Type | 0060032150000008 / Housing Loan |
| | Loan Amount | Rs. 20,00,000/- |
| | Details of the Security to be enforced | All that piece and parcel of Land & Building situated within the District Solapur and Sub District Barshi within limit of Barshi Muncipal C.S.No.3856 its Adm. area 176.4 Sq.Mtrs out of its Regd Mojani No.80 & 2016 part of their No. 2 .Pandit Sopan Navgan C.S.No.3856 & 2, (As per online property extract C.S.No.3856) admeasing area 58.80 Sq.Mtr. and its Three floor building having boundaries as follows: East - C.S.No.3856 & 1, West - C.S.No. 3856 & 3, South - 4 ft Road & bol, North - Barshi Kurduwadi Road |
| | Date of NPA | 30/06/2023 |
| | Demand Notice date | 15/07/2026 |
| | Amount Due in Rs. as on 30/06/2026 | Rs. 26,58,011/- (Rs.Twenty Six Lakh Fifty Eight Thousand Eleven Only) Plus future interest @ 14% p.a. and other expenses thereon. |

Notice is therefore given to the Borrower/Guarantor & Mortgagor as mentioned above, calling upon them to make payment of the aggregate amount mentioned above against all the respective Borrower within 60 days of Publication of this notice as the said amount is found payable in relation to the respective loan account as on the date shown above. It is made clear that if the aggregate amount together with future interest and other amounts which may become payable till the date of payment is not paid, Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur shall be constrained to take appropriate action for enforcement of security interest upon properties described above. Please note that this publication is made without prejudice to such rights and remedies as are available to Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur against the Borrower/ Guarantor's/ Mortgagors of the said financials under the law, you are further requested to note that as per section 13(13) of the said act, you are restrained/ prohibited from disposing of or dealing with the above security or transferring by way of sale, lease or otherwise of the secured asset without prior consent of Secured Creditor.

**Date:** 29/07/2026
**Place:** Solapur

SEAL


**Sd/-**
**Authorised Officer**
**Shri. Mahavir Urban Co op Bank Ltd., Solapur**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# मुष्टियुद्धात नऊ पदके निश्चित


अरुंधती चौधरी


साक्षी चौधरी

**ग्लासगो, २९ जुलै**

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत बुधवारी भारताच्या मुष्टियुद्ध संघासाठी हा दिवस अत्यंत यशस्वी ठरला. नरेंद्र बेरवाल (९०+कि.) व अंकुश यादवने साक्षी चौधरी, अरुंधती चौधरी आणि सचिन सिवाच यांच्यासोबत उपांत्य फेरीत धडक मारली.

बुधवारच्या या चार विजयांमुळे उपांत्य फेरीत पोहोचलेल्या भारतीय मुष्टियोद्ध्यांची संख्या आठवर पोहोचली आहे. या खेळाडूंनी लवलिना बोरगोहेन (७५ किलो), प्रिया घांघस (६० किलो), प्रीती पवार (५४ किलो) व जादुमणी सिंग (५५ किलो) यांच्या पंक्तीत स्थान मिळविले आहे. त्यांनी याआधीच उपांत्य फेरीतील आपले स्थान निश्चित केले. यामुळे ग्लासगो राष्ट्रकुल स्पर्धेतील मुष्टियुद्ध प्रकारात भारतासाठी किमान नऊ कांस्य पदके निश्चित झाली आहेत.

माजी जागतिक युवा विजेता सचिन सिवाच यानेही पुरुषांच्या ६० किलो वजनी गटाच्या उपांत्य फेरीत धडक मारत किमान कांस्य पदक निश्चित केले. सचिनने बोत्सवानाच्या ट्रेझर मोरेमीचा ५-० असा एकमताने पराभव केला. त्याने संयमित खेळ करत पाचही पंचांच्या गुणपत्रिकेवर प्रभावी विजय नोंदवला.

गतवर्षी जागतिक मुष्टियुद्ध चषक फायनल्समध्ये रौप्य पदक जिंकणाऱ्या अंकुश यादवने सेशेल्सच्या जेड मायकॉकचा ५-० असा एकमताने पराभव करून पुरुषांच्या ८० किलो वजनी गटाच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला.

### साक्षी, अरुंधतीचा शानदार विजय

भारतीय मुष्टियोद्धे साक्षी चौधरी आमि अरुंधती चौधरीने बुधवारी चमकदार कामगिरी करीत ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील आपापल्या वजनी गटाच्या उपांत्य फेरीत धडक मारत किमान कांस्य पदक निश्चित केले.

५१ किलो वजनी गटात २६ वर्षीय साक्षीने उत्तर आयर्लंडच्या कॅटलिन फ्रायर्सचा ५-० असा पराभव करीत स्पर्धेच्या अंतिम चार खेळाडूंच्या फेरीत (उपांत्य फेरीत) प्रवेश केला. पंचमंडळाच्या एकमताने साक्षीने हा विजय मिळविला. अरुंधतीला न्यूझीलंडच्या मॉर्गन हेंडरसनविरुद्ध ३-१ असा विजय मिळवण्यासाठी बरीच मेहनत घ्यावी लागली.

लवलिना बोरगोहेन (७५ किलो), प्रीती पवार (५४ किलो), प्रिया घांघस (६० किलो) आणि जादुमणी सिंग (पुरुष ५५ किलो) यांच्यानंतर, पदकाची निश्चिती करणारी ती या स्पर्धेतील पाचवी भारतीय मुष्टियोद्धा ठरली आहे.

आपल्या उंचीचा आणि हातांच्या लांबीचा पुरेपूर फायदा घेत, ५४ किलो वजनी गटातून खाली आलेल्या साक्षीने सुरुवातीपासूनच सामन्यावर वर्चस्व राखले. तिने अचूक 'जॅब्स' आणि योग्य वेळी मारलेल्या 'स्ट्रेट पंच्स'च्या जोरावर फ्रायर्सला दूर ठेवले. आयर्लंडच्या मुष्टियोद्ध्याने सतत आक्रमक पवित्रा घेत आणि एकापाठोपाठ एक पंच मारून साक्षीला विचलित करण्याचा प्रयत्न केला. मात्र, साक्षीने संयम राखला; तिने प्रतिस्पर्ध्याचे बहुतेक हल्ले हुलकावणी देऊन चुकवले आणि त्यानंतर अधिक प्रभावी व अचूक 'कॉम्बिनेशन पंच्स'द्वारे प्रत्युत्तर दिले.

माझी रणनीती जवळून लढण्याची होती व ती वारंवार मला पकडून ठेवत होती. याउलट, लांबून मुष्टियुद्ध करणे ही माझी जमेची बाजू आहे आणि मी तसेच केले, असे साक्षीने सांगितले.

◂ (वृत्तसंस्था)

## प्रियाचीही दमदार मुसंडी

**ग्लासगो, २९ जुलै**

जागतिक क्रमवारीत चौथ्या स्थानावर असलेल्या प्रिया घांघसने महिलांच्या ६० किलो वजनी गटातील उपांत्यपूर्व फेरीत स्कॉटलंडच्या निआम्ह मिचेलचा 'विभाजित गुणां'द्वारे ४-१ असा पराभव केला. या विजयामुळे प्रियाने या स्पर्धेत किमान कांस्यपदक निश्चित केले.


प्रिया घांघस

१९ वर्षीय मिचेलने सामन्याची जोरदार सुरुवात केली आणि पाचपैकी चार पंचांच्या निर्णयानुसार पहिली फेरी आपल्या नावे केली; सुरुवातीच्या काळात स्थानिक बॉक्सरविरुद्ध वर्चस्व गाजवताना प्रियाला काहीसा संघर्ष करावा लागला.

मात्र, दुसऱ्या फेरीत भारतीय बॉक्सरने अधिक आक्रमक पवित्रा घेत सामन्याचे चित्र पालटले आणि चार पंचांच्या निर्णयानुसार ही फेरी जिंकली. या फेरीत दोन्ही बॉक्सर्सना प्रत्येकी एक गुण वजा करण्याची शिक्षा देण्यात आली, त्यामुळे शेवटच्या तीन मिनिटांपूर्वी सामना अत्यंत चुरशीच्या स्थितीत पोहोचला.

त्यानंतर प्रियाने तिसऱ्या फेरीत अत्यंत प्रभावी खेळ केला आणि पाचही पंचांनी ही फेरी तिच्या बाजूने दिली. तिचा हा दमदार शेवट निर्णायक ठरला; तिला तीन पंचांकडून २८-२७ आणि एका पंचाकडून २९-२६ असे गुण मिळाले, तर पाचव्या पंचाने २८-२७ असे गुण मिचेलच्या बाजूने दिले.

या विजयामुळे प्रियाने उपांत्य फेरीत धडक मारली आणि ग्लासगोमध्ये भारतासाठी आणखी एक बॉक्सिंग पदक निश्चित केले.

### परवीनचा हिकीकडून पराभव

महिलांच्या ६५ किलो वजनी गटाच्या उपांत्यपूर्व फेरीत, परवीन हुडाने शेवटच्या फेरीत जोरदार पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला, परंतु तिला इंग्लंडच्या साशा हिकीकडून ३-२ अशा 'स्प्लिट डिसिजन'ने निसटता पराभव पत्करावा लागला. ◂ (वृत्तसंस्था)

# गोळाफेकपटू तूर, गिल अंतिम फेरीसाठी पात्र


समरदीप सिंग गिल


तजिंदरपाल सिंग तूर

**ग्लासगो, २९ जुलै**

भारतीय गोळाफेकपटू तजिंदरपाल सिंग तूर आणि समरदीप सिंग गिलने बुधवारी येथे झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेच्या पात्रता फेरीत सहजपणे अंतिम फेरी गाठली.

राष्ट्रीय विक्रमवीर तूर याने 'गट अ'मध्ये २० मीटरचे 'ऑटोमॅटिक क्वालिफिकेशन' अंतर पार करण्यासाठी दोन प्रयत्न केले. त्याच्या पहिल्या प्रयत्नात १९.९३ मीटर अंतर नोंदविले गेले, तर दुसऱ्या प्रयत्नात त्याने २०.१४ मीटरची कामगिरी केली. ही एकूणच दुसरी सर्वोत्तम कामगिरी ठरली. त्याने तिसरा प्रयत्न केला नाही.

पात्रता फेरीच्या 'गट ब' मध्ये गिलची सर्वोत्तम कामगिरी १९.९५ मीटर अशी होती. ही वेळ त्याने पहिल्याच प्रयत्नात नोंदविली. त्याच्या दुसऱ्या थ्रोमध्ये १९.७५ मीटर अंतर कापले गेले व तिसरा प्रयत्न 'फाऊल' ठरला. दोन्ही गटांतील एकूण १५ स्पर्धकांमध्ये गिलने पाचवे स्थान मिळविले. 'गट अ' मध्ये सात व 'गट ब' मध्ये आठ स्पर्धक होते. २० मीटरचे अंतर पार करणारे किंवा सर्वोत्तम कामगिरी करणारे १२ खेळाडू गुरुवारी होणाऱ्या अंतिम फेरीसाठी पात्र ठरतात.

न्यूझीलंडचा गतविजेता व विजेतेपदाचा प्रबळ दावेदार असलेल्या टॉम वॉल्शने 'गट अ' मधील पहिल्या फेरीतील २१.०३ मीटरच्या थ्रोसह एकूण अव्वल स्थान पटकावले. ३१ वर्षीय तूरची या हंगामातील सर्वोत्तम कामगिरी २१.०३ मीटर आहे, तर त्याच्या नावावर असलेला राष्ट्रीय विक्रम २१.७७ मीटरचा आहे. त्याने हा विक्रम २०२३ मध्ये नोंदविला होता.

मागील दोन आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये सुवर्णपदक जिंकणारा तूर आपल्या दुसऱ्या राष्ट्रकुल स्पर्धेत सहभागी होत आहे; यापूर्वी २०१८ मध्ये गोल्ड कोस्ट येथे झालेल्या स्पर्धेत तो आठव्या स्थानावर राहिला होता. दुखापतीमुळे तो २०२२ च्या स्पर्धेत सहभागी होऊ शकला नव्हता.२५ वर्षीय गिलची या हंगामातील सर्वोत्तम कामगिरी २०.४६ मीटर आहे, जी त्याची वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी देखील आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# अनिमेश २०० मीटरच्या उपांत्य फेरीत

### हंगामातील सर्वोत्तम वेळेची नोंद


**ग्लासगो, २९ जुलै**

राष्ट्रीय विक्रमवीर अनिमेश कुजूर याने बुधवारी येथे सुरू असलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत २०० मीटर शर्यतीच्या उपांत्य फेरीसाठी पात्रता मिळविताना आपल्या हंगामातील सर्वोत्तम वेळेची नोंद केली.

२३ वर्षीय कुजूरने पहिल्या फेरीतील 'हीट ४' (गट ४) मध्ये २०.४६ सेकंदांची वेळ नोंदवून विजय मिळविला आणि एकूण सातवे स्थान पटकावले. विविध १० गटांमधून (हीट्स) सर्वोत्तम वेळ नोंदविणारे १६ धावपटू गुरुवारी होणाऱ्या उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतात.

कुजूरच्या नावावर असलेला राष्ट्रीय विक्रम २०.३२ सेकंदांचा आहे. याआधी, त्याने गत महिन्यात 'न्यू तैपेई सिटी ॲथ्लेटिक्स ओपन'मध्ये २०.४७ सेकंदांची वेळ नोंदविली होती, ही त्याच्या मोसमातील सर्वोत्तम वेळ होती.

◂ (वृत्तसंस्था)



# गुलवीर सिंगने घडविला इतिहास

### राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत १०,००० मीटर शर्यतीत पदक जिंकणारा पहिला भारतीय पुरुष

**ग्लासगो, २९ जुलै**

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत मुष्टियुद्ध स्पर्धेतील पदके निश्चित करण्याकडे सर्वांचे लक्ष केंद्रित झालेले असतानाच, इथून काही किलोमीटर अंतरावर असलेल्या स्कॉट्सटॉन स्टेडियमवर भारताचा एक मध्यम-अंतराचा धावपटू गुलवीर सिंगने इतिहास घडविला. मुसळधार पाऊस आणि अधूनमधून पडणारे ऊन अशा आव्हानात्मक परिस्थितीत, गुलवीर सिंगने पुरुषांच्या १०,००० मीटर शर्यतीत २७:४९.७८ मिनिटांची वेळ नोंदवित रौप्य पदक जिंकले. या स्पर्धेच्या इतिहासात या प्रकारात पदक जिंकणारा तो पहिला भारतीय पुरुष ठरला.



# पॅरा-जलतरणपटू सोलापूरचा सुयश जाधव अंतिम फेरीत

**ग्लासगो, २९ जुलै**

बुधवारी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पॅरा-जलतरणपटू चैतन्य विश्वास कुळकर्णी आणि सुयश नारायण जाधवने आपापल्या प्रकारातील अंतिम फेरीत धडक मारली.

पॅरा-जलतरण स्पर्धेत चैतन्य व सुयशने एस-७ गटातील ५० मीटर फ्रीस्टाईलच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. प्राथमिक फेरीत चैतन्य ३२.७७ सेकंदांच्या वेळेसह चौथ्या, तर सुयश ३५.३५ सेकंदांच्या वेळेसह सहाव्या स्थानावर राहिले. 'एस७' हा गट पायांची हालचाल मर्यादित असणाऱ्या जलतरणपटूंसाठी आहे.

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पदक जिंकणारा प्रशांत करमरकर हा एकमेव भारतीय पॅरा-जलतरणपटू आहे; त्याने २०१० च्या दिल्ली राष्ट्रकुल स्पर्धेत 'एस9' गटातील ५० मीटर फ्रीस्टाईल प्रकारात कांस्यपदक जिंकले होते. 'एस९' या गटात शरीरचा एखादा अवयव (हात किंवा पाय) गमावलेले किंवा पाठीच्या कण्याशी संबंधित समस्या असलेले खेळाडू समाविष्ट असतात.

याआधी, साजन प्रकाश याला पुरुषांच्या ५० मीटर बटरफ्लायच्या उपांत्य फेरीत आणि २०० मीटर बटरफ्लाय प्रकारात पात्रता मिळवण्यात अपयश आले.

◂ (वृत्तसंस्था)


चैतन्य कुळकर्णी


सुयश जाधव

# प्रणॉय, उन्नतीची आगेकूच

**ताइपेई ओपन बॅडमिंटन**

**ताइपेई (तैवान), २९ जुलै**

भारताच्या मोहिमेचे नेतृत्व करणारे अनुभवी बॅडमिंटनपटू एच. एस. प्रणॉय व उन्नती हुड्डाने बुधवारी येथे सुरू असलेल्या ताइपेई ओपन सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेत आपापल्या एकेरीच्या प्रकारांत दुसऱ्या फेरीत प्रवेश केला.

सातवे मानांकन असलेल्या प्रणॉयने पुरुष एकेरीच्या पहिल्या फेरीत जपानच्या मिनोरू कोगाचा २१-११, २१-१४ असा पराभव केला; हा सामना अवघ्या ३५ मिनिटांत संपला. पुढील फेरीत त्याचा सामना हाँगकाँगच्या जेसन गुनावानशी होईल. जेसनने पहिल्या फेरीतील अन्य एका सामन्यात भारताच्याच मिथुन मंजुनाथचा २१-१८, २१-४ असा पराभव केला.


एच. एस. प्रणॉय

पुरुष एकेरीत दुसऱ्या फेरीत धडक मारणाऱ्या इतर भारतीय खेळाडूंमध्ये किरण जॉर्ज व तरुण मन्नेपल्ली यांचा समावेश असून जॉर्जने चीन ताइपेईच्या वांग पो-वेईचा २१-१०, २१-१८ असा पराभव केला, तर मन्नेपल्लीने कोरियाच्या आठव्या मानांकित जिओन ह्योक जिनला २१- १२, २१-१५ असे अनपेक्षितरीत्या हरवले. आता पुढील फेरीत जॉर्ज आणि मन्नेपल्ली आमनेसामने असतील. मात्र, पुरुष एकेरीच्या पात्रता फेरीतून मुख्य फेरीत आलेला उदयोन्मुख खेळाडू रौनक चौहान याचे आव्हान संपुष्टात आले; त्याला इंडोनेशियाच्या रिची दुता रिचर्डोने १४-२१, १६-२१ असे पराभूत केले.

तिसरे मानांकन असलेल्या उन्नतीने महिला एकेरीत आपल्या मोहिमेची सुरुवात सकारात्मकरीत्या केली. उन्नतीने चीन ताइपेईच्या पेई यू वांगचा २१-१२, २१-१८ असा पराभव केला.

# ग्रामीण भागातून उत्कृष्ट खेळाडू निर्माण होतील

## अक्कलकोट नरेश श्रीमंत विजयसिंहराजे भोसले क्रिकेट ट्रेनिंग अकॅडमीची सुरवात

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. २९ जुलै-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून ३९ वर्षामध्ये अनेक उल्लेखनीय उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये आता टर्फ क्रिकेट संस्कृतीची भर पडली आहे. गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून न्यासाने अक्कलकोट नरेश श्रीमंत विजयसिंहराजे भोसले क्रिकेट ट्रेनिंग ॲकॅडमीची उभारणी केली आहे. यामुळे ग्रामीण भागातील खेळाडूना प्रोत्साहन मिळेल आणि उत्कृष्ट खेळाडू निर्माण होतील असे गौरोदगार राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री भरतशेठ गोगावले, यांनी व्यक्त केले

ते बुधवारी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ ट्रस्ट, अक्कलकोट संचलित न्यासाच्या लगत असलेल्या जागेत अक्कलकोट नरेश श्रीमंत विजयसिंहराजे भोसले क्रिकेट ट्रेनिंग अकॅडमीच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी आमदार शेखर निकम (चिपळूण), आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार शिवाजीराव पाटील, माजी गृहराज्य मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले, संदीप फुगे (भरत मित्र मंडळ), बाळासाहेब दाभेकर (पुणे), श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले चंद्रकांत पंडित (माजी भारतीय क्रिकेटपटू व प्रशिक्षक), समीर दिघे (माजी भारतीय क्रिकेटपटू व प्रशिक्षक), संजय पाटील (सिलेक्टर, रणजी ट्रॉफी, मुंबई), धर्मराज गोपाल सिंग (सिंगस स्पोर्ट्स मुंबई), ॲड. नितीन हबीब (जेष्ठ विधिज्ञ) ओंकारेश्वर उटगे (चार्टर्ड अकाऊंटंट), अरविंद शिंदे, योगेश अहंकारी (आर्कीटेक्ट), बालाजी सलगर (अजिंक्यतारा टेन्साईल रुफ,पुणे), किरण पाटील (इंजिनिअर्स) यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्वेता हुल्ले यांनी केले. अरविंद शिंदे यांनी आभार मानले.

**रोजगार हमी योजना मंत्री भरतशेठ गोगावले यांचे प्रतिपादन**



### श्री क्षेत्र शेगावनंतर श्री क्षेत्र अक्कलकोट येथे क्रिकेट ॲकॅडमी

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाने ग्रामीण भागातील क्रिकेट खेळाडूंना संधी देण्याचे काम न्यास करीत आहे. या पूर्वी शेगाव येथे अश्याच ॲकॅडमीचे उद्घाटन करण्याचा योग आला होता. आता श्री क्षेत्र अक्कलकोट मध्ये ॲकॅडमीचे उद्घाटन करण्याचा मान आम्हाला मिळाला आहे. पूर्वी अश्या ॲकॅडम्या ह्या मोठ्या महानगरामध्ये पाहायला मिळत होत्या, आता त्या अक्कलकोट शहरापर्यंत पोहचले आहेत. याचा फायदा तरुण खेळाडूने घ्यावेत.

**-संजय पाटील**, सिलेक्टर व रणजी ट्रॉफी, मुंबई

### अकॅडमीच्या माध्यमातून ग्रामीण खेळाडूना संधी

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाने अक्कलकोट नरेश श्रीमंत विजयसिंहराजे भोसले क्रिकेट ट्रेनिंग ॲकॅडमीमुळे अक्कलकोट सह ग्रामीण भागातील खेळाडूंना व्यासपीठ मिळवून देण्याचे महत्वपूर्ण काम केले आहे. या माध्यमातून आय.पी.एल., महाराष्ट्र, भारतासाठी या ॲकॅडमीच्या माध्यमातून खेळाडू मिळो अशी अपेक्षा व्यक्त करतो.

**-समीर दिघे**, भारतीय क्रिकेटपटू व प्रशिक्षक, मुंबई

### पैलवांनाना दोन लाखांची मदत

या कार्यक्रमा प्रसंगी उपस्थित मान्यवरांचा सत्कार, न्यासाचे संस्थापक अध्यक्ष- जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांची सुंदर, सुबक, कोरीव प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांनी पै. महेंद्र गायकवाड यांना रु. १ लाख व पै. काकासाहेब पवार यांना ५१ हजार रुपये तर. पै. धनराज भुजबळ यांना ५१ हजाराची देणगी यांना दिली. यावेळी ॲकॅडमी जवळील रहिवाश्यांच्या वतीने श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांचा तसेच वेळेच्या आत ॲकॅडमीचे काम अद्यावत पूर्ण केल्याबद्दल न्यासाचे सचिव शामराव मोरे व ॲकॅडमीचे प्रशिक्षक मल्लिकार्जुन कोळी यांचा सत्कार मंत्री गोगावले यांच्या हस्ते करण्यात आला. करण्यात आला.



# भारताच्या लॉन टेनिस संघाच्या कर्णधारपदी सोलापूरची संध्याराणी बंडगर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै -**

येथील संध्याराणी बंडगर यांची २ ते ७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत पोर्तुगाल (लिस्बन) येथे होणा-या आंतरराष्ट्रीय टेनिस फेडरेशनने आयोजित केलेल्या मास्टर वर्ल्ड टूर टीम चैम्पियनशिप स्पर्धेत भारतातर्फे सहभागी होणा-या ४५ वर्षापुढील वयोगटातील महिला संघाच्या कर्णधारपदी निवड झाली आहे.

सौ. संध्याराणी यांनी सन २०२५ व २०२६ मधे आंतरराष्ट्रीय टेनिस फेडरेशनने सोलापूर, डेहराडून व इंदौर येथे आयोजित केलेल्या स्पर्धेत सहभाग नोंदवून विजेतेपद पटकावले होते. त्यांच्या या यशामुळे त्यांच्या वैयक्तिक गुणात वाढ केली.

सध्या १३०० गुणांसह त्यांना अखिल भारतीय स्तरावर प्रथम मानांकन प्राप्त असून जागतिक स्तरावर त्या ३२व्या स्थानावर आहेत. संध्याराणी या विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण खात्यात मुख्य लेखापाल पदावर कार्यरत असून त्यांना लक्ष्मण आवारे, डीएफओ यांचे सहकार्य तसेच महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटनेचे संयुक्त सचिव राजीव देसाई यांचे मार्गदर्शन लाभले.

संध्याराणी बंडगर यांना बालाजी अमाईन्स लि. व प्रिसिजन फाउंडेशनकडून आर्थिक सहाय्य लाभले. त्यांच्या या निवडीबद्दल सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेचे अध्यक्ष राजेश दमाणी, संघटनेचे सह सचिव पंकज शहा, कोषाध्यक्ष दिलीप अत्रे, उपाध्यक्ष दिलीप बचुवार यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

## महत्वाचे...



## १७ ऑगस्टला देशभर जिल्हा मुख्यालयांवर भारतीय मजदूर संघाचे धरणे आंदोलन

**सोलापूर, दि. २९ जुलै-**

भारतीय मजदूर संघाच्या अखिल भारतीय कार्यसमितीची बैठक २६ ते २८ जुलैदरम्यान रांची (झारखंड) येथील सरला बिर्ला विद्यापीठात पार पडली. बैठकीत कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधण्यासाठी १७ ऑगस्ट रोजी देशातील सर्व जिल्हा मुख्यालयांवर धरणे आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला. ईएसआयसी वेतन मर्यादा ४२ हजार करणे, ईपीएफ किमान पेन्शन ७,५०० करणे, ईपीएफ वेतन मर्यादा ३० हजार करणे, बोनस व ग्रॅच्युइटीची मर्यादा वाढविणे, कंत्राटी कामगारांना समान काम-समान वेतन, श्रमसंहितांतील कामगारविरोधी तरतुदींमध्ये सुधारणा, बँक कर्मचाऱ्यांना पाच दिवसांचा आठवडा आणि किमान वेतन ३० हजार निश्चित करण्यासह विविध मागण्या करण्यात आल्या. बैठकीला अध्यक्ष एस. मल्लेशम, महामंत्री सुरेंद्र कुमार पांडे यांच्यासह देशभरातील पदाधिकारी उपस्थित होते. महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सुधांशू रानडे व सरचिटणीस किरण मिलगीर, जिल्हाध्यक्ष नंदकुमार भोसले यांनी आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले.



## संत श्री गजानन महाराज पालखीचे करकंबमध्ये धार्मिक उत्साहात स्वागत

**करकंब, दि.२९ जुलै -**

पंढरपूर येथील आषाढी वारीनिमित्त आलेल्या श्री गजानन महाराजांच्या पालखी सोहळ्याच्या परतीचा प्रवास सुरु झाला आहे. पहिल्या मुक्कामासाठी करकंब ता.पंढरपूर येथील रामभाऊ जोशी हायस्कूल येथे पारंपरिक उत्साहात,भक्ती भावाने स्वागत करण्यात आले. पालखीचे आगमन होताच परिसर 'गण गण गणात बोते'च्या जयघोषाने दुमदुमून गेला. ढोल-ताशांचा गजर व टाळ-मृदंगाच्या तालावर पालखीचे भव्य स्वागत झाले. प्रशालेचे मुख्याध्यापक हेमंत कदम, स्वाती कदम या दांपत्याने पालखीचे स्वागत करून श्रींचे पूजन केले. संपूर्ण कार्यक्रमात शिस्त, नियोजन, भक्तिभाव यांचा सुंदर संगम दिसून आला. पालखीच्या दर्शनासाठी करकंब व परिसरातील हजारो भाविकांनी गर्दी केली होती. महिलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वच भक्तांनी मोठ्या श्रद्धेने श्रींचे दर्शन घेतले. मुक्कामाच्या निमित्ताने भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची, निवासाची तसेच स्वच्छतेची उत्तम व्यवस्था केली होती. स्थानिक स्वयंसेवक, शिक्षक व ग्रामस्थांनी मिळून सेवाभावी वृत्तीने काम करत सोहळा सुरळीत पार पाडला.

## मोहम्मद रफी यांच्या स्मृत्यर्थ आज 'यादों की मैफिल' गाण्यांचा कार्यक्रम

**सोलापूर दि.२९ जुलै-**

प्रख्यात गायक स्व. मोहम्मद रफी यांच्या ४६ व्या पुण्यातिथीनिमित्त गुरुवार दिनांक ३० जुलै रोजी सोलापुरात हुतात्मा स्मृती मंदिर येथे सायंकाळी ७ वाजता सरगम स्टुडिओतर्फे यादों की मैफिल हा गाण्यांचा कार्यक्रम आयोजित केला आहे, अशी माहिती संयोजक आरिफ एलाल यांनी पत्रकार परिषदेत दिली. कार्यक्रमास सुधीर खरटमल, हाजी तौफिक हत्तूरे, जाविद झुंजे, जाकिर हुंडेकरी, नसिमा पठाण, हारुण शेख, इलियास सिध्दीकी आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाचे नियोजन बब्बी हुमनाबादकर हे करणार आहेत. कार्यक्रमात आरिफ एलाल, अनिता अय्यर, इम्रान अली, मुस्तकीम एलाल, बाबर कोरबु, जुबेर पटेल, राजकुमार कोकलगी, अशोक दर्गी, घोडके, लता राज, शंकर सरवदे, शफोद्दीन सय्यद, एजाज खलिफा, शार्दुल आपली कला सादर करणार आहेत.

## निधन वृत्त...


### पद्मिनी घुले



**सोलापूर, दि. २९ जुलै-**

सलगरवाडी येथील रहिवासी पद्मिनी विठ्ठल घुले (वय ७६) यांचे अल्पशा आजारामुळे निधन झाले. त्यांच्या पश्चात एक बहिण आहे. जिल्हा परिषदमधील निवृत्त उपलेखापाल विठ्ठल घुले यांच्या त्या पत्नी आहेत.

### अशोक गायकवाड



**सोलापूर, दि. २९ जुलै-**

सेटलमेंट, फ्रि कॉनली नं.६ येथील रहिवासी अशोक सिद्राम गायकवाड (वय ५८) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, एक मुलगा असा परिवार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल विभागातील सहाय्यक अधिकारी महानंद जाधव यांचे ते मामा आहेत.

### सय्यद इनामदार



**सोलापूर, दि. २९ जुलै-**

सिद्धेश्वर पेठेतील जुने सामाजिक कार्यकर्ते व ओबीसी चळवळचे सय्यद इरफान इनामदार यांचे मोठे भाऊ सय्यद फारूक इनामदार यांचे निधन झाले ते ९० वर्षाचे होते त्यांच्या पश्चाात दोन भाऊ, एक मुलगी, जावाई, नातवंडे असा परिवार आहे.जडेसाब कब्रस्तान येथे नमाज जनाजा अदा करून तेथेच दफनविधी करण्यात आले.



# 'उजनी'त येणारी आवक घटली

## भीमेतील विसर्गही घटण्याची शक्यता

**दौंडहून केवळ २९,४३७ क्युसेक आवक; उजनीतून सध्या ६१,६०० क्युसेक पाणी भीमा नदीपात्रात**

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २९ जुलै -**

पुणे जिल्ह्यासह उजनी धरणाच्या वरील पाणलोट क्षेत्रात तीन दिवसांपासून पावसाचा जोर ओसरला आहे. उजनी धरणात येणाऱ्या पाण्याच्या आवकेत मोठी घट झाली आहे. दौंड येथून धरणात सध्या केवळ २९,४३७ क्युसेक पाण्याची आवक होत असून, काही दिवसांपूर्वीच्या तुलनेत ही आवक तब्बल ४० हजार क्युसेकने घटली आहे. यात आणखी घटीची शक्यत असल्याने येत्या तीन ते चार दिवसांत उजनी धरणातून भीमा नदीपात्रात होणारा विसर्गही टप्प्याटप्प्याने कमी होण्याची शक्यता आहे.

बुधवार, २९ जुलै रोजी सायंकाळी ६.०० च्या नोंदीनुसार उजनी धरणाची पाणीपातळी ४९६.७९० मीटर इतकी आहे. धरणातील उपयुक्त पाणीसाठा ९९.१२ टक्के झाला आहे. धरणाचे जलसाठा क्षेत्र ३३५.३० चौ.कि.मी., एकूण पाणीसाठा ३३०६.५९ दशलक्ष घनमीटर (११६.७६ टीएमसी) तर उपयुक्त पाणीसाठा १५०३.७८ दशलक्ष घनमीटर (५३.१० टीएमसी) इतका झाला आहे.

धरणातील उच्च जलसाठा लक्षात घेऊन प्रशासनाने सध्या सांडव्यावरून ६० हजार क्युसेक आणि वीजगृहातून १,६०० क्युसेक असा एकूण ६१,६०० क्युसेक पाण्याचा विसर्ग भीमा नदीपात्रात कायम ठेवला आहे. मात्र धरणात येणारी आवक सातत्याने कमी होत असल्याने पुढील काही दिवसांत परिस्थितीचा आढावा घेऊन विसर्गात कपातीची शक्यता जलसंपदा विभागाच्या सूत्रांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

याशिवाय सीना-माढा उपसा सिंचन योजनेस २८० क्युसेक, दहिगाव उपसा सिंचन योजनेस ९० क्युसेक, बोगद्यातून ९०० क्युसेक आणि मुख्य कालव्यातून २,५०० क्युसेक पाणी सोडण्यात येत आहे.

दरम्यान नदीकाठच्या गावांतील नागरिकांनी सतर्क राहावे, नदीपात्रात, बंधाऱ्यांवर अथवा पुलांवर जाणे टाळावे आणि प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन जलसंपदा विभागाने केले आहे.



## रोटरी क्लबचे कार्य समाजसेवेचा आदर्श : इंगळे

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २९ जुलै-**

रोटरी क्लबचे कार्य म्हणजे खऱ्या अर्थाने समाजसेवेचा आदर्श असल्याचे प्रतिपादन येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन तथा नगरसेवक महेश इंगळे यांनी केले.

रोटरी क्लब ऑफ अक्कलकोटच्या पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा येथील श्रीमंत कांतामती भोसले मंगल कार्यालयात झाला. यावेळी दीप प्रज्वलन केल्यानंतर नगरसेवक महेश इंगळे बोलत होते. शिक्षण, आरोग्य, रक्तदान आणि गरजू लोकांना मदत अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून रोटरीने नेहमीच समाजापुढे एक सकारात्मक उदाहरण ठेवल्याचे कौतुकोद्गारही त्यांनी काढले.

प्रारंभी रोटरी क्लब ऑफ अक्कलकोटच्या वतीने पदग्रहण अधिकारी रो.महेशकुमार कोठारी, रो.जयेश पटेल यांनी आ.सचिन कल्याणशेट्टी, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, चेअरमन महेश इंगळे, आरोग्य सभापती अविनाश मडीखांबे व आदींचा सत्कार केला. सोहळ्यात नवनिर्वाचित अध्यक्ष संजीवकुमार किरनळ्ळी, सचिव रो.डॉ.प्रमोद सुतार, कोषाध्यक्ष रो.सागर हळगोदे, या वर्षाचे नूतन सदस्य संतोष पराणे, विजयकुमार पवार, शिवानंद कारले, राघवेंद्र पोतदार, महेश शवारी आदींची निवड केली. कार्यक्रमास अमोलराजे भोसले यांच्यासह रोटरी, रोट्रॅक्ट सदस्य उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रदिप तोरस्कर यांनी केले.

## महिला वैद्यकीय अधीक्षकाकडे ५ लाखांच्या खंडणीची मागणी; दोघांविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**उमरगा, दि. २९ जुलै -**

उमरगा येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. कोमल गरड-जाधव यांना शासकीय कामात अडथळा निर्माण करत, खात्यांतर्गत चौकशी व बडतर्फ करण्याची धमकी दिली. तसेच पाच लाख रुपयांची खंडणी मागितल्याप्रकरणी उमरगा पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

प्रफुल श्रावण गायकवाड (रा. औराद) व ज्ञानेश्वर पांडुरंग जाधव (रा. तुरोरी) यांच्याविरुद्ध मंगळवारी (दि. २८ जुलै) रात्री ११.३३ वाजता गुन्हा नोंदवला. दि. २० जुलै रोजी दुपारी साडेतीन ते चारच्या दरम्यान डॉ. गरड या रुग्णालयातील कक्षातून बाहेर पडत असताना आरोपींनी त्यांना अडवून रुग्णालयातील जनरेटरसाठी वापरण्यात येणाऱ्या डिझेलबाबत माहिती मागितली. त्यावर संबंधित माहिती अधिकृत प्रक्रियेनुसार कार्यालयात अर्ज करून घेण्यास सांगण्यात आले. यावर प्रफुल गायकवाडने आरोग्य विभागाच्या उपसंचालक रेखा गायकवाड या माझ्या नातेवाईक आहेत. माहिती दिली नाही तर तुमची चौकशी लावून नोकरी घालवतो, बडतर्फ करायला लावून धिंड काढतो, अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे.




त्यानंतर आरोपींनी रुग्णालयातील कर्मचारी फुलसुंदर व जनाबाई कुंभार यांच्या शासकीय कामात अडथळा निर्माण करून कपाटातील डिझेलचे रजिस्टर बळजबरीने काढण्याचा व त्याचे छायाचित्र घेण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. आरोपींनी डॉ. गरड यांच्याकडे पाच लाख रुपयांची खंडणी मागितली. तसेच शासकीय कामात अडथळा निर्माण करणे, दमदाटी करणे, विनयभंग व हातापाई केल्याचाही आरोप आहे.

घटनेनंतर डॉ. कोमल गरड यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून उमरगा पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला. पोलीस निरीक्षक प्रल्हाद सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत भराटे तपास करीत आहेत.

## धनश्री प्रवचनमालेला शुक्रवारपासून प्रारंभ

**संत कान्होपात्रांच्या अभंगातून उलगडणार भक्तीचे जीवनदर्शन**

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. २९ जुलै-**

लक्ष्मीबाई काळुंगे यांच्या स्मरणार्थ धनश्री, सिताराम व आष्टी परिवाराच्या वतीने धनश्री प्रवचनमालाचे आयोजन केल्याचे धनश्री, सिताराम व आष्टी परिवाराचे संस्थापक प्रा. शिवाजीराव काळुंगे यांनी सांगितले.

प्रवचनमालेचे हे आठवे वर्ष असून, शुक्रवार दि.३१ जुलै ते मंगळवार दि.४ ऑगस्ट रोजी सायं. ६ ते ८ या वेळेत श्रीराम पॅलेस, श्रीराम मार्ट, शिशुविहार समोर, मंगळवेढा येथे ही प्रवचनमाला होत आहे.



संत विचारांचा प्रसार आणि अध्यात्मिक उन्नती साधण्यासाठी या प्रवचनमालेचे आयोजन दरवर्षी केले जाते. प्रवचनमालेत संत माणकोजी महाराज बोधले यांचे अकरावे वंशज ह.भ.प. डॉ. श्रीगुरु जयवंत महाराज बोधले धामणगावकर हे संत कान्होपात्रा अभंग चिंतन या विषयावर पाच दिवस प्रवचन करणार आहेत.

मंगळवेढ्यातील संत कान्होपात्रेचा अधिकार आपल्याला या प्रवचनातून कळणार आहे. मंगळवेढा व परिसरातील सर्व श्रोत्यांनी या श्रावण सुखाचा आनंद घ्यावा असे आवाहन संयोजक धनश्री सिताराम व आष्टी परिवाराच्या वतीने केले आहे.

## महिलेने खाल्ल्या उंदीर मारण्याच्या गोळ्या

**सोलापूर, दि. २९ जुलै-**

घरगुती तक्रारीत एका महिलेने उंदीर मारण्याच्या गोळ्या खाल्ल्याची घटना लिमयेवाडी येथे मंगळवारी रात्री साडे दहा वाजता घडली. अनिता दशरथ मुत्तुडकर (वय ४२ रा. लिमयेवाडी सोलापूर) असे त्या महिलेचे नाव आहे. त्या मंगळवारी रात्री घरात असताना घरगुती तक्रार झाल्याच्या रागाच्या भरात त्यांनी उंदीर मारण्याच्या दहा ते बारा गोळ्या खाऊन टाकल्या. याचा त्रास होऊ लागल्याने त्यांना उपचार करता मुलगा रवी याने येथील शासकीय रुग्णालयात मध्यरात्री दाखल केले.

## महिलेस मारहाण करून दागिना लंपास

**श्रीपूर, दि. २९ जुलै-**

येथील लक्ष्मी भिसनाळ यांना चोरट्यांनी मारहाण करत गळ्यातील सोन्याची अर्धा तोळ्याची मण्यांची माळ हिसकावून नेली. म्हशीला चारा म्हणून त्या एक ते दीड किलोमीटरवर असलेल्या ओढ्यालगत गवत काढत होत्या.त्यांचेवर पाळत ठेवून व आसपास कोणी नाही याची खात्री करून चोरट्यांनी त्यांचे गळ्यातील सोन्याची माळ ओढण्याचा प्रयत्न केला. चोरट्याने त्यांना जबर मारहाण करत गळ्यातील सोन्याच्या माळेला हिसका देवून माळ घेवून पळून गेला. रस्त्यावर मोटार सायकल घेवून थांबलेला दुसऱ्या साथीदाराबरोबर ते पळून गेले.

## पंढरपूर-मंगळवेढ्याच्या वीज प्रश्नांवर तातडीने उपाययोजना करा

**ऊर्जा राज्यमंत्र्यांचे अधिकाऱ्यांना निर्देश**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२९ जुलै -**

पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील प्रलंबित वीज समस्यांबाबत आमदार समाधान आवताडे यांच्या मागणीनुसार ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी मुंबई येथे आढावा बैठक झाली. यावेळी वीजविषयक प्रश्न तातडीने मार्गी लावण्याचे आदेश बोर्डीकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

बैठकीत आमदार आवताडे यांनी मंगळवेढा येथे महावितरणचे स्वतंत्र विभागीय कार्यालय सुरू करणे, पंढरपूर येथे महापारेषणचे नवीन विभागीय कार्यालय मंजूर करणे, किमान आठ तास वीजपुरवठा, अपूर्ण सबस्टेशनची कामे तातडीने पूर्ण करणे, गादेगाव सबस्टेशनचे अर्धवट




काम पूर्ण करावे, वटवटे येथील सबस्टेशनच्या जागेची अडचण सोडवून तत्काळ कामास सुरुवात करावी, शेतकरी आणि उद्योजकांना सुरळीत वीजेसाठी अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर मंजूर करावेत याही सूचना मांडल्या.

यावर बोर्डीकर यांनी आवश्यक सबस्टेशनची कामे पूर्ण करण्यासह सर्व प्रस्ताव तातडीने शासनाकडे सादर करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले. बैठकीस महावितरणच्या मुख्य अभियंता शिल्पा कुंभार, अधीक्षक अभियंता प्रांजल कांबळे, सहसचिव सूर्यकांत निकम, एस. एस. दराडे, नितीन काळे, प्रवीणसिंह परदेशी, सुनील माने यांच्यासह संबंधित अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

## शिष्यवृत्ती परीक्षांत सुयश विद्यालय महाराष्ट्रात अग्रेसर

**३२५ विद्यार्थी पात्र; अनेकांना विविध विषयात पैकीच्या पैकी गुण**

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. २९ जुलै -**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून फेब्रुवारी २०२६ मध्ये झालेल्या पाचवी आणि आठवी शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल मागील पंधरवड्यात जाहीर झाला सुयश विद्यालय बार्शी येथील इयत्ता आठवीचे १४४ विद्यार्थी व इयत्ता पाचवीचे ११६ विद्यार्थी असे एकूण २६० विद्यार्थी पात्र ठरले आहेत.

एप्रिल २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता चौथी व इयत्ता सातवी परीक्षेचा निकाल २५ जुलै रोजी जाहीर झाला. या परीक्षेतही सुयश विद्यालयानेच महाराष्ट्रात बाजी मारल्याचे निकालावरुन सिद्ध होते. या परीक्षेत इयत्ता चौथीचे २०३ विद्यार्थी तर इयत्ता सातवीचे १२२ विद्यार्थी असे एकूण ३२५ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. इयत्ता पाचवी व इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांप्रमाणेच इयत्ता चौथी व इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनीही नेत्रदीपक यश मिळवून सुयश विद्यालय शैक्षणिक गुणवत्तेत महाराष्ट्रात अग्रेसर आहे हे सिद्ध केले आहे.




इयत्ता चौथीचे २६० पेक्षा जास्त गुण प्राप्त विद्यार्थी- आवटे विराज- २८०, पायगन रविराज - २७४, आवाड अर्णव - २७०, देशमुख रिद्धेश- २६६, माहुले ओवी- २६४, डुमणे सक्षम- २६४, बाशिंगे आर्या- २६२, देव स्वरूपा- २६०, मोहिते वीरेंद्रसिंह- २६०, जाले सत्यजित- २६०. इयत्ता सातवीचे २६० पेक्षा जास्त गुणप्राप्त विद्यार्थी- काळे अनय- २८४, देवकर गिरीश- २६८, आत्तार अबूसुफियान- २६४, पिंगळे साईराज- २६४, साखरे सोहम- २६२, स्वामी सोहम- २६२, भास्कर आदर्श- २६२, सालसकर अनिश- २६२, बांगर अथर्व- २६०, आगलावे ईश्वरी- २६०, शिरगिरे सार्थक- २६०

इयत्ता चौथीचे- इंग्रजी- ५० पैकी ५० गुण प्राप्त ४० विद्यार्थी. गणित- १०० पैकी १०० गुण प्राप्त चार विद्यार्थी आहेत.

या विद्यार्थ्यांना अमृता खडसरे (इंग्रजी), ज्योती भोसले (गणित), संदीप मुंढे (मराठी), आशा जटाळे (बुद्धिमत्ता) या शिक्षकांचे मार्गदर्शन मिळाले. तसेच इयत्ता सातवी परीक्षेतही इंग्रजी:- विषयात ५० पैकी ५० गुण प्राप्त ११ विद्यार्थी,गणित:- १०० पैकी १०० गुण प्राप्त चार विद्यार्थी व मराठी:- ५० पैकी ५० गुण प्राप्त दोन विद्यार्थी आहेत.

या विद्यार्थ्यांना अर्चना शेटे (इंग्रजी ) विजयालक्ष्मी सुरवसे (गणित ) अर्चना माने (मराठी) व सोनाली बोंगाळे (बुद्धिमत्ता) यांनी मार्गदर्शन केले.

या उत्तुंग यशाबद्दल बार्शीचे आमदार राजेंद्र राऊत, संस्थेचे अध्यक्ष शिवदास नलवडे, मार्गदर्शिका प्रतिभा नलवडे, श्री प्रसाद नलवडे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले

# स्वामी समर्थांची पादुका पालखी, न्यासाच्या सुशोभित रथाची मिरवणूक

## वर्धापनदिन, गुरुपौर्णिमा उत्सवाची सांगता; रिमझिम पावसातही भक्तांची प्रचंड गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. २९ जुलै-**

अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त, सद्गुरू...! श्री स्वामी समर्थ महाराज की...!, श्री अन्नपूर्णा माता की जय...! च्या जय घोषात श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली व मान्यवरांच्या उपस्थितीत श्री स्वामी समर्थांच्या पादुका पालखी आणि न्यासाच्या सुशोभित रथाच्या भव्य मिरवणुकीचा शुभारंभ करण्यात आला. या मिरवणुकीत दिंड्या, वाद्यांच्या गजरात, स्वरांजली बँडपथक लालबाग मुंबई, विजुभाई तांडेल, चुनाभट्टी यांचे आराध्य ढोलपथक, नादब्रह्म, पुणे यांचा ढोल-ताशा ध्वज पथकांच्या तालात व अमोलराजे भोसले लेझीम संघाच्या शानदार खेळाने, केरळ येथील ढोल पथक, संभळ, ब्यांड सह श्री हनुमान देखावा, कोल्हापूर व अक्कलकोट येथील हलगी पथक, पारंपारिक वाद्याला प्राधान्य देत, फटाक्यांची अतिषबाजी व रिमझिम पावसाच्या सरी झेलत पालखी सोहळा संपन्न झाला. गुरुपौर्णिमा उत्सव व मंडळाचा ३९वा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात मिरवणूकीने सांगता बुधवारी करण्यात आली.

दरम्यान भरत मित्र मंडळ पुणे अध्यक्ष व न्यासाचे क्रियाशील सभासद बाळासाहेब दाभेकर, भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य शहाजीराजे पवार, सो.म.पा. नगरसेवक व शिवसेना जिल्हाप्रमुख अमोलबापू शिंदे, सो.म.पा. माजी उपमहापौर दिलीप कोल्हे, सो.म.पा. नगरसेवक, स्थायी समितीचे माजी चेअरमन व शहर-जिल्हाध्यक्ष (काँग्रेस) चेतन नरोटे, सो.म.पा. स्थायी समिती सभापती रंजीताताई चाकोते, आराध्य तांडेल चुनाभट्टी (मुंबई), सागर पिसे (सोलापूर), पुणे नगरसेवक संदीप खर्डीकर, उद्योजक श्री रेघे (मुंबई) यांच्या हस्ते पालखी व रथ मिरवणुकीचा शुभारंभ यांच्या हस्ते पालखी व रथ मिरवणुकीचा शुभारंभ करण्यात करण्यात आला. रथाची व पालखी मिरवणूक श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या प्रांगणातून निघून नवी विहीर, राजे फत्तेसिंह चौक, सर्जेराव जाधव पथ मार्गे, समर्थ चौक, सेंट्रल चौक, सोन्या मारुती, वीर सावरकर चौक, कापड लाईन मार्गे कारंजा चौक, बुधवार पेठेतील समाधी मठ, तेथील आरतीनंतर कारंजा चौक, सुभाष गल्ली, जय जवान गल्ली, मधला मारुती, राम गल्ली, गुरु मंदिर, भारत गल्ली, देशमुख गल्ली मार्गे अन्नछत्र मंडळात आरतीने सांगता करण्यात आली.

या भव्य-दिव्य पालखी सोहळ्याचे नेटके व अचूक नियोजन अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकारी अध्यक्ष व संयोजक अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते. रथ व पालखीला नयनरम्य फुलांनी सजविण्यात आले होते. मिरवणूक प्रसंगी विविध सामाजिक संघटनेकडून पालखी मार्गावर प्रसाद वाटप करण्यात आले.याबरोबरच स्वागत कमानी, डिजिटल ब्यानर लावण्यात आले होते. मिरवणूक बघण्यासाठी पालखी मार्गावर दुतर्फा प्रचंड गर्दी झालेली होती. याप्रसंगी न्यासाचे श्री व सौ. श्रीकांत घाटगे (सोलापूर), उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, संदीप फुगे, हर्षवर्धनराजे अमोलराजे भोसले यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते. पालखी व रथाचे विधिवत पूजा न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पु पुजारी, विश्वसंभर पुजारी व संजय कुलकर्णी, सोमकांत कुलकर्णी यांनी केले. सचिव शामराव मोरे यांनी आभार मानले.

**भर पावसात खेळ सादर**

आराध्य ढोल पथक चुनाभट्टी मुंबई यांनी भर पावसात पथकावर प्लास्टिक अछादन धरून खेळ सादर केला. यास अनेक स्वामी भक्तांनी अछादन धरण्यासाठी मदत केली.





### लक्षवेधी मिरवणूक

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली निघालेली पालखी व रथ मिरवणुकीसाठी न्यासाने उत्कृष्ट नियोजन केलेले होते. या सोहळ्यास परराज्य, परदेशांतून स्वामी भक्त उपस्थित होते. पालखी व रथ मिरवणुकीत वाद्य वृन्दांची लावलेले क्रम व अमोलराजे लेझीम संघाचा बहारदार खेळ, मिरवणुकीची केलेली मांडणी व पालखीचे भक्तगणांतून कौतुक होत होते. इंव्हेट बाबत अन्नछत्र मंडळाचे उत्कृष्ट नियोजन पाहण्यासाठी राज्यातील अन्य तीर्थ क्षेत्रातील आवर्जून तेथील मंडळीनी या अन्नछत्र मंडळाच्या ३९ व्या वर्धापन दिन व गुरुपौर्णिमा उत्सवास भेटी दिल्या.

### श्रींच्या पालखी मिरवणुकीला लालबाग राजाच्या बँन्डची सलामी

गुरुपौर्णिमेच्या दिवशी सायंकाळी हजारो भाविकांच्या साक्षीने, श्री स्वामी समर्थ महाराजांना अखंड गरज आणि भक्तीभावाच्या अविस्मरणीय वातावरणात राज वैभवी, निघणाऱ्या श्रींच्या पालखीला लालबागचा राजा, लालबाग मुंबई येथील ख्यातनाम स्वरांजली बँन्ड पथकाच्या सलामीने मार्गस्थ करण्यात आले. सदरचे बँन्ड हे दरवर्षी लालबाग राजाच्या गणेश उत्सवाच्या काळात प्रतिष्ठापणा पासून ते विसर्जन पर्यंत श्रींच्या सेवेत असतो, यंदाच्या गुरुपौर्णिमेला विशेष आमंत्रित बँन्ड पाथक हे अन्नछत्र मंडळाच्या पालखी व रथोत्सवाच्या सेवेत आले होते.

## महत्वाचे...

### मोहोळमध्ये तरुणीची गळफास घेऊन आत्महत्या

**मोहोळ, दि. २९ जुलै -**

मोहोळ शहरात राहणाऱ्या २४ वर्षीय तरुणीने दि. २९ जुलै रोजी पहाटे ५ वा. चे पुर्वी राहत्या घरी आत्महत्या केली. याप्रकरणी मोहोळ पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.किर्ती शेजाळ (वय २४ )असे या मृत तरुणीचे नाव आहे. मोहोळ पोलिसांच्या माहितीनुसार, मोहोळ शहरातील अण्णा भाऊ साठे नगर परिसरात किसन शेजाळ हे कुटुंबासमवेत राहतात. त्यांची मुलगी किर्ती शेजाळ ही आय.सी.सी. आय. बँकेमध्ये नोकरीस आहे.



दि. २९ रोजी पहाटे ५ वा. चे सुमारास किर्तीचे वडील किसन व आई हे त्यांचे राहत्या घराच्या दुसऱ्या खोलीचा दरवाजा वाजवित असल्याचे पाहुन त्यांचे बंधू बिरुदेव शेजाळ तिथे गेले. यावेळी आवाज देवुन देखील किर्ती आतमधून प्रतिसाद देत नव्हती. त्यावेळी तिच्या कुटुंबियांनी खिडकीची काच फोडून आतमध्ये पाहिले असता, ती लोखंडी पंख्यास लटकत असल्याचे दिसले. त्यांनी खोलीचा दरवाजा तोडून आतमध्ये प्रवेश केलस. किर्तीने लोखंडी पंख्यास साडीच्या सहाय्याने गळफास घेतल्याचे दिसले. तिला तात्काळ ग्रामीण रुग्णालय मोहोळ येथे आणले असता डॉक्टरांनी उपचारापुर्वीच मृत झाल्याचे सांगितले. याप्रकरणी बिरुदेव शेजाळ यांनी मोहोळ पोलिसांत खबर दिली असून अधिक तपास स.पो.फौ. धुमाळ करीत आहेत.

### चोरीच्या संशयावरून एकास मारहाण

**सोलापूर, दि. २९ जुलै-**

घरात झोपले असता चोरीच्या संशयावरून दगड, काठी आणि लाथाबुक्क्याने मारहाण करून जखमी करण्यात आले. ही घटना उंबरेपागे (ता.पंढरपूर) येथे सोमवारी पहाटेच्या सुमारास घडली. सतीश ढोबळे (वय ४८ रा. उंबरेपागे) असे जखमीचे नाव आहे. ते सोमवारी पहाटेच्या सुमारास घरात झोपले होते. यावेळी श्याम काळे, शांताराम काळे, अक्षय काळे आणि इतर १० जणांनी मिळून घरात येवून त्यांना मारहाण केली. त्यांना पंढरपूर येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात मंगळवारी रात्री ज्ञानेश्वर (भाऊजी) यांनी दाखल केले.

### तंबूमध्ये पिकअप घुसला; जखमी व्यक्तीचा मृत्यू

**सोलापूर, दि. २९ जुलै-**

पिलीव येथे तंबूमध्ये झोपले असता अचानक घुसलेल्या पिकअपच्या अपघातात जखमी झालेला ४० वर्षीय इसम सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना आज सोमवारी पहाटे मरण पावला. शिरीषकुमार चंद्रमा शहा (वय ४० मूळ रा.बिहार. सध्या रा.पिलीव ता. माळशीरस) असे मयत झालेल्या इसमाचे नाव आहे. तो पिलीव बाजार येथील तंबूमध्ये झोपला होता. १२ जुलै रोजी दुपारी ४ वाजेच्या सुमारास तंबूमध्ये अचानक पिकप घुसल्याने तो चाकाखाली सापडून गंभीर जखमी झाला होता. त्याला अकलूज येथे प्राथमिक उपचार करून सुरज कुमार (मुलगा) याने रविवारी सोलापुरात दाखल केले होते. त्याचा उपचारादरम्यान सोमवारी मृत्यू झाला.

### उंब्रज येथे कोल्हा चावल्याने वृद्ध इसम जखमी

**सोलापूर, दि. २९ जुलै-**

मोकळ्या रानात शौचास करीत असताना अचानक कोल्ह्याने झडप टाकून चावा घेतल्याने ६३ वर्षीय वृद्ध जखमी झाले. ही घटना उंब्रज (जि.विजयपुरा) येथे आज सोमवारी सकाळच्या सुमारास घडली. मल्लप्पा सिद्धप्पा ईरमानी (वय ६३ रा.उंब्रज) असे जखमीचे नाव आहे. सोमवारी सकाळी सहा वाजेच्या सुमारास ते घराजवळील मोकळ्या रानात शौचासाठी गेले होते.त्यावेळी अचानक समोरून आलेल्या कोल्ह्याने त्यांच्या छातीला चावा घेतल्याने ते जखमी झाले.त्यांना मंद्रूप येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

### पत्नीला त्रास दिल्याचा जाब विचारल्याने मारहाण


**सोलापूर, दि. २९ जुलै-**

माझ्या पत्नीला विनाकारण त्रास का देता ? अशी विचारणा करणाऱ्या पतीस लाकूड आणि लाथाबुक्याने मारहाण केल्याची घटना कविटगाव (ता.करमाळा) येथे सोमवारी सायंकाळच्या सुमारास घडली. विजय बब्रुवान पाटील (वय ३८ कविटगाव) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे.त्यांना शिवाजी शिंदे, राणी शिंदे आणि इतर दोघांनी मिळून मारहाण केली. जखमीने त्यांना माझ्या पत्नीला त्रास का देता? म्हणून विचारणार केली होती. त्यावरून त्यांनी मारहाण केली. त्यांना उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात अर्चना पाटील (पत्नी) हिने दाखल केले.

### दोन सराईत गुन्हेगार शहर व जिल्ह्यातून तडीपार

**सोलापूर, दि. २९ जुलै-**

गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असलेले यासीन इक्बाल बागवान (टोळी प्रमुख वय २७, रा. मद्दा झोपडपट्टी सोलापूर) आणि खंडोबा गणेश चव्हाण (वय-२६ वर्षे, रा. घर नं. १९२, इंगळे वस्ती, सोलापूर) या दोघा सराईत गुन्हेगारांना सोलापूर शहर व जिल्ह्यातून दोन वर्षाकरिता तडीपार केले आहे.





दोघांविरुध्द २०१५,२०१९, २०२०,२०२१, २०२३, २०२४ व २०२६ या कालावधीत टोळीच्या माध्यमातून दुखापत करणे, गैरकायद्याची मंडळी जमवून दंगा करणे, चोरी करणे आदी गुन्हे दाखल आहेत. त्यांचेविरुध्द जेलरोड पोलीस ठाणेकडून तडीपार प्रस्ताव पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ), सोलापूर शहर यांना सादर केला होता. सदर प्रस्तावाचे अनुषंगाने पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ)प्रितम यावलकर यांनी वरील दोघा आरोपींना दि.२८ जुलै रोजी सोलापूर शहर व उर्वरीत सोलापूर जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार केले आहे.

### ट्रकला धडकल्याने मोटारीतील तिघे जखमी

**सोलापूर, दि. २९ जुलै-**

मोटारीतून प्रवास करीत असताना समोरील ट्रकला धडकल्याने मोटारीतील तिघे जखमी झाले. हा अपघात आज बुधवारी पहाटेच्या सुमारास अक्कलकोटजवळ घडला. रोहित डुकरे (वय ३४), गणेश मुदगल (वय ३५) आणि विकी ढेकणे (वय २९ सर्व रा.रामनगर जि.धाराशिव) असे जखमीची नावे आहेत. ते सर्वजण मोटारीतून गाणगापूरकडे निघाले होते अक्कलकोटपासून चार किलोमीटर अंतरावर समोरील ट्रकला साईडने धडकल्याने तिघेही जखमी झाले. त्यांना ॲम्बुलन्स मधून सोलापुरातील शासकीय दवाखान्यात दाखल करण्यात आले.

## सराफ दुकानात घुसखोरी करून मारहाण, तोडफोड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै-**

सराफ बाजारातील एका दुकानात घुसून दोन महिलांनी कामगाराला मारहाण केली आणि सोने आटणी करण्याच्या भट्टीची तोडफोड केली. ही घटना पूर्व मंगळवार पेठ येथे २७ जुलै रोजी सकाळी घडली. याप्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात दोन महिलांवर गुन्हा दाखल केला आहे.

फरजाना शेख आणि रेहाना शेख अशी गुन्हा दाखल केलेल्या महिलांची नावे आहेत. याबाबत विलास घोरपडे (वय ४१, रा. समृद्धी पार्कवे, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे २७ जुलै रोजी सकाळी साडेआठ वाजता सराफ दुकानात साफसफाई करत होते. सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास वरील दोन्ही महिला विनापरवानगी दुकानात घुसल्या. त्यांनी दुकानातील कामगार विकास पवार याची गची धरून त्याला शिवीगाळ करत दुकानाबाहेर काढले. त्यानंतर त्यांनी दुकानातील हातोडीने सोने आटणी करण्याची भट्टी फोडली. जाताना महिलांनी स्वतःकडील कुलूप दुकानाला लावून पुन्हा शिवीगाळ केली. याबाबतची माहिती फिर्यादी घोरपडे यांनी दुकान मालक शिवकुमार कोळी यांना दिली. दुकानातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता या महिलांची ओळख पटली. यानंतर पोलिसांनी संबंधित महिलांविरुद्ध गुन्हा दाखल केला. फौजदार राधा जेऊघाले गुन्ह्याचा तपास करत आहेत.

## मारहाण करून ५० वर्षीय महिलेचा विनयभंग; आठ जणांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २९ जुलै-**

घरासमोर धुणी-भांडी करण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून एका महिलेसह तिच्या कुटुंबीयांना बांबूने मारहाण केली. तसेच महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी आठ जणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

राही माने, निशा माने, चिंगी माने, काजल कांबळे, सचिन कांबळे, नितीन कांबळे, मनोज कांबळे आणि भोला माने (सर्व रा. सोलापूर) अशी गुन्हा दाखल केलेल्यांची नावे असून याबाबत पीडितेने फिर्याद दिली आहे. फिर्यादी महिला व त्यांची मुलगी २७ जुलै रोजी रात्री घरासमोर बोलत बसल्या होत्या. त्यावेळी आरोपींनी तिथे येऊन तुम्ही घरासमोर धुणी भांडी का करता असे म्हणत शिवीगाळ केली. तसेच हाताने, लाथाबुक्क्यांनी व बांबूने मारहाण करून फिर्यादी महिला, तिची मुलगी, मुलगा आणि बहिणीचा मुलगा यांना जखमी केले. तुम्ही इथे कसे राहता आम्ही बघतो, परत आमच्या नादाला लागला तर तुम्हाला खल्लास करीन अशी धमकी दिली. तसेच मनास लज्जा वाटेल असे कृत्य केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. फौजदार येळे हे गुन्ह्याचा तपास करत आहेत.

## दूध व्यवसायासाठी सुवर्णसंधी; मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेत लाखोंचे अनुदान

### पाच गाई-म्हशींसाठी ११.३५ लाखांपर्यंत आर्थिक सहाय्य

### महिला, शेतकरी, भूमिहीनांनाही लाभाची संधी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ जुलै-**

ग्रामीण भागातील युवक, शेतकरी आणि महिला बचत गटांना स्वावलंबी बनविण्यासाठी राज्य शासनाची मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना महत्त्वाची ठरणार आहे. दूध व्यवसायाला चालना देत ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या या योजनेत पाच दुधाळ गाई किंवा म्हशींच्या प्रकल्पासाठी तब्बल ११ लाख ३५ हजार रुपयांपर्यंत अनुदान उपलब्ध होणार आहे. त्यामुळे पारंपरिक शेतीला जोडधंदा म्हणून नव्हे, तर उद्योगाचे स्वरूप देण्याची संधी ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना मिळणार आहे.

अलीकडे अन्न व औषध प्रशासनाकडून राज्यभरात दूध भेसळ आणि बनावट दूध निर्मितीविरोधात सुरू असलेल्या कारवायांमुळे शुद्ध दुधाबाबत ग्राहकांचा विश्वास वाढत आहे. अशा पार्श्वभूमीवर दर्जेदार दूध उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी ही योजना अधिक फायदेशीर ठरणार असल्याचे मानले जात आहे. जिल्ह्यातही शुद्ध दूध उत्पादनाला चालना मिळाल्यास उत्पादकांना चांगला दर मिळण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



### योजनेची तरतूद

योजनेअंतर्गत एका दुधाळ गाईची किंमत १ लाख १२ हजार रुपये गृहीत धरून प्रकल्पाला आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे. सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थ्यांना ५० टक्के, तर अनुसूचित जाती प्रवर्गासाठी ७५ टक्के अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय महिला बचत गटांसाठी ३० टक्के, तर दिव्यांगांसाठी ५ टक्के आरक्षण राखीव ठेवण्यात आले आहे.

### दूध व्यवसायातून ग्रामीण कुटुंबांना शाश्वत रोजगार

शेतीपूरक जोडधंद्याला उद्योगाचे स्वरूप देणे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे हा मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेचा प्रमुख उद्देश आहे. दूध व्यवसायातून ग्रामीण कुटुंबांना शाश्वत रोजगार मिळावा यासाठी ही योजना राबविण्यात येत आहे. अर्ज प्रक्रिया लवकरच सुरू होईल.

**- डॉ. अनिल तांबे, उपायुक्त, पशुसंवर्धन विभाग, सोलापूर**

या योजनेत फक्त शेतकरीच नव्हे, तर अल्पभूधारक, अत्यल्प भूधारक, वनहक्क धारक, भूमिहीन तसेच महिला बचत गट यांनाही या योजनेचा लाभ घेता येणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील अधिकाधिक कुटुंबांना रोजगाराची नवी संधी उपलब्ध होणार आहे. दूध व्यवसायाबरोबरच शेळी व मेंढीपालन प्रकल्पासाठीही ११ लाख ३८ हजार रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येणार असल्याने पशुपालन क्षेत्राला मोठी चालना मिळण्याची शक्यता आहे.

सध्या योजनेच्या अर्ज प्रक्रियेला अद्याप सुरुवात झालेली नसली, तरी पशुसंवर्धन विभागाकडून आवश्यक तयारी सुरू आहे. अर्ज प्रक्रिया सुरू झाल्यानंतर इच्छुकांनी आवश्यक कागदपत्रांसह वेळेत अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात येणार आहे.

## एकाच विभागातील कर्मचाऱ्यांची 'रोटेशन' प्रक्रिया; जि.प.मध्ये ४९ जणांच्या बदल्या

### पाच वर्षे एकाच विभागात कार्यरत कर्मचाऱ्यांना नवी जबाबदारी

### प्रशासनात पारदर्शकता व कार्यक्षमतेला चालना

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २९ जुलै :**

प्रशासनात पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि कार्यक्षमतेला बळकटी देण्याच्या उद्देशाने सोलापूर जिल्हा परिषदेने एकाच विभागात सलग पाच वर्षांहून अधिक काळ कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या विभागीय बदल्यांची प्रक्रिया पूर्ण केली आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्या आदेशानंतर वर्ग तीन व वर्ग चार मिळून एकूण ४९ कर्मचाऱ्यांना नवीन विभागांमध्ये नियुक्ती देण्यात आली आहे.

दीर्घकाळ एकाच विभागात कार्यरत राहिल्यामुळे कामकाजात एकसुरीपणा येऊ नये, तसेच विविध विभागांमध्ये अनुभवी मनुष्यबळाचा प्रभावी वापर व्हावा, या दृष्टीने ही नियमित प्रशासकीय प्रक्रिया राबविण्यात आली आहे. बदल्यांमुळे विविध विभागांतील कामकाजाला अधिक गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या प्रक्रियेत वर्ग चारमधील १९ आणि वर्ग तीनमधील ३० कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या. विभागनिहाय पाहता सामान्य प्रशासन विभागातील सर्वाधिक १६ कर्मचाऱ्यांचे स्थानांतर करण्यात आले आहे. त्याखालोखाल परिचर संवर्गातील १९, अर्थ विभागातील ६, बांधकाम विभागातील ५, आरोग्य विभागातील २ आणि कृषी विभागातील १ कर्मचाऱ्याचा समावेश आहे.



जिल्हा परिषद प्रशासनाकडून वेळोवेळी रोटेशन पद्धतीने बदली प्रक्रिया राबविण्यात येते. यामुळे कर्मचाऱ्यांना विविध विभागांचा अनुभव मिळण्याबरोबरच प्रशासनातील पारदर्शकता टिकून राहण्यास मदत होते. तसेच विभागांमधील मनुष्यबळाचा समतोल राखून सेवा अधिक प्रभावीपणे देणे शक्य होते.

प्रशासकीय दृष्टीने महत्त्वाची मानली जाणारी ही बदली प्रक्रिया लवकरच पूर्ण होणार असून संबंधित कर्मचाऱ्यांना नवीन विभागात रुजू होण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आगामी काळात नव्या जबाबदाऱ्यांमुळे विभागीय कामकाज अधिक गतिमान होईल, अशी अपेक्षा जिल्हा परिषद प्रशासनाने व्यक्त केली आहे.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Group Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT


## महत्वाचे...

### हुंड्यासाठी विवाहितेस उपाशी ठेवून शारीरिक व मानसिक त्रास

**सोलापूर, दि. २९ जुलै-**

लग्नात सोफा, ए.सी व दोन तोळे सोने दिले नाही म्हणून एका विवाहितेस शारीरिक व मानसिक त्रास देऊन तीन वेळा तलाक शब्दाचा उच्चार केल्याप्रकरणी इंडी येथील पतीसह सात जणांविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. समीर अरब-पती, हुस्नबानू -सासू, महिबूब-सासरे, मिनाज-नणंद, सोहेल -दीर, शबाना-देवरानी, सलमान-दीर (सर्व रा. इंडी, जि. विजापूर) अशी गुन्हा दाखल आरोपींची नावे असून याबाबत सायमा समीर अरब (वय २६, रा. १००, न्यू तिहेगाव फॉरेस्ट, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी दि.३ मे २०२५ ते मार्च २०२६ दरम्यान सासरी नांदत असताना वरील आरोपींनी मिळुन फिर्यादीस लग्नात सोफा, ए.सी व दोन तोळे सोने दिले नाही म्हणून शिवीगाळ, मारहाण करुन तिला उपाशी ठेवले तसेच पतींनी फिर्यादीस तीन वेळेस तलाक, बोलून तिला शारीरीक व मानसिक त्रास दिल्याची फिर्याद आहे. स. पोलीस निरीक्षक पाटील हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

### रूपाभवानी चौकात दगड व लाथा बुक्क्यांनी मारहाण

**सोलापूर, दि. २९ जुलै-**

रिक्षा घेऊन थांबलेल्या एका रिक्षा चालकाला दोघांनी दगड व लाथाबुक्याने मारहाण करून जीव मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हे दाखल झाला आहे प्रशांत यल्लप्पा शिवशरण आणि राजू बाबू शिंगाडे अशी गुन्हा दाखल आरोपींची नावे असून याबाबत अतुल जीवराज धोत्रे (वय ३३ वर्षे, रा. १७/७१, बाळीवेस, वडार गल्ली, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी त्यांची रिक्षा (क्रं. एमएच १३ सीटी ३६०९) घेवून दि. २७ जून २०२६ रोजी पहाटे ५.३० वा.चे सुमारास रुपाभवानी चौक या ठिकाणी प्रवाशांची वाट पाहत थांबले होते. त्यावेळी वरील आरोपी हे रिक्षाजवळ येवून फिर्यादीस दगडाने तसेच लाथाबुक्यांनी मारहाण करुन जखमी केले व रिक्षाची काच फोडुन तसेच जिवे ठार मारण्याची धमकी दिल्याची फिर्याद आहे. पोलीस हवालदार दुधाळे हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

### दुचाकी घसरून जखमी झालेल्या माकणीच्या तरुणाचा मृत्यू

**सोलापूर, दि. २९ जुलै-**

दुचाकी घसरून जखमी झालेल्या माकणीच्या तरुणाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात बुधवारी सकाळी नऊ वाजता मृत्यू झाला. विजय व्यंकट जाधव (वय २८, रा. माकणी, जि.धाराशिव सध्या पनवेल, जि. ठाणे) असे त्या मयत दुचाकीस्वाराचे नाव आहे. तो २५ जुलै रोजी रात्री दुचाकी वाहनाच्या बाजारासाठी दुचाकीवरून निघताना वाटेत ओल्ड पनवेल ठाणा नाका जवळ दुचाकी घसरून तो गंभीर जखमी झाला होता. त्यामुळे त्याला दोन खाजगी दवाखान्यात उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात बुधवारी सकाळी मामा विश्वनाथ यांनी बेशुद्ध अवस्थेत दाखल केले असता त्याचा उपचारदरम्यान दोनच तासात मृत्यू झाला.

*जातो माघारी पंढरीनाथा। तुझे दर्शन झाले आता ।।*

# संतांच्या पालख्या व वारकऱ्यांचा परतीचा प्रवास सुरु

### गोपाळकाल्याने आषाढी यात्रेची सांगता

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २९ जुलै-**

गोपाळकाला गोड झाला, गोपाळाने गोड केला या जयघोषात अवघी श्रीकृष्णनगरी म्हणजेच गोपाळपूरनगरी लाखो वारकऱ्यांच्या गजराने दुमदुमून गेली. ज्ञानेश्वर माऊली तुकारामाच्या गजरात गोपाळपूरात मानाच्या पालख्यांसह सर्व संताच्या पालख्या दाखल झाल्या आणि गोपाळकाला केल्यानंतर श्री विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी विठ्ठल मंदीरात आल्या. मानाच्या पालख्याने श्री विठ्ठलाचे दर्शन घेतले आणि परतीचा प्रवास सुरु केला.

पोर्णिमेच्या दिवशी परंपरेनुसार गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथे मानाची अंमळनेरकर महाराजांची दिंडी काल्याच्या उत्सवासाठी पहाटे ४.०० वाजता भगवान श्रीकृष्ण मंदिरात दाखल झाली. त्यानंतर भजन झाले. तर शेगावच्या श्री संत गजानन महाराज पालखीचे पहाटे ५.०० वाजता गोपाळपूरात आगमन झाले. पहाटेपासूनच एकामागोमाग एक अशा विविध सुमारे ५०० संतांच्या दिंड्या, पालख्या विठ्ठलनामाचा गजर करीत गोपाळपुरात दाखल झाल्या होत्या.



सकाळी ९च्या सुमारास जगदगुरु श्री संत तुकाराम महाराजांची तर ९.३०च्या सुमारास संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांचे पालखी सोहळे गोपाळपुरात दाखल झाले. श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या तसेच श्री तुकाराम महाराजांच्या पादुकांचे पूजन करण्यात आले. मंदिराजवळ पालख्या विसावल्या होत्या. या पालख्यासह संत सोपानकाका, संत मुक्ताबाई, संत नामदेव महाराज, संत गोरोबा, संत एकनाथ महाराज, संत निवृत्तीनाथ महाराज, संत निळोबाराय, चांगावटेश्वर देवस्थान यांच्यासह अन्य संतांच्या पालख्यांचे व दिड्यांचे गोपाळपुरात आगमन झाले. तत्पूर्वी गोपाळपूर येथील श्रीकृष्ण मंदीरात पहाटे २.३० वाजता प्रमुख विश्स्तांच्या हस्ते पूजा करण्यात आली. पूजा झाल्यानंतर पहाटे ३.३० वाजता श्रीकृष्ण मंदीर भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात आले. भाविकांनी मोठ्या श्रध्देने श्री गोपाळकृष्णाचे दर्शन घेऊन मंदिराला प्रदक्षिणा घातली तसेच एकमेकांना प्रेमाने लाह्यांचा काला भरवून गळाभेट घेतली. श्रीकृष्ण मंदिर समितीच्या वतीने प्रसाद म्हणून लाह्यांच्या काल्याचे वाटप करण्यात आले. गोपाळपूर ग्रामपंचायतीच्या वतीने ग्रामपंचायत अधिकारी ज्योती पाटील तसेच ग्रामपंचायत प्रशासकीय समिती यांनी पालख्यांचे व दिड्यांचे स्वागत केले. या सोहळ्यासाठी सहा. पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे, तहसिलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.एकनाथ बोधले उपस्थित होते.

#### संत-देव भेटीचा सोहळा

गोपाळकाला झाल्यानंतर सर्व मानाच्या पालख्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात दाखल झाल्या व सर्व संताच्या पादुका विठ्ठल दर्शनासाठी नेण्यात आल्या. यावेळी देवाची आणि संताची अनुपम भेट घडवून आणण्यात आली. श्री विठ्ठल-रुक्मणि मातेचे दर्शन घेतल्यावर हा संतदेव भेटीचा सोहळा पार पडला. देव आणि संत भेटीचा हा अनुपम सोहळा पाहण्यासाठी हजारो भाविकांनी मंदिर परिसरात मोठी गर्दी केली होती. यानंतर पालख्या परतीच्या मार्गावर रवाना झाल्या. सुरुवातीला श्री.संत एकनाथ महाराज त्यानंतर श्री.संत निवृत्तीनाथ महाराज संस्थान त्र्यंबकेश्वर, श्री.संत सोपानदेव महाराज संस्थान, श्री.संत चांगावटेश्वर देवस्थान सासवड, श्री.संत मुक्ताबाई संस्थान मुक्ताईनगर, श्री.संत निळोबाराय संस्थान पिंपळनेर, श्री.विठ्ठल रूख्माई संस्थान कौंडण्यपूर, श्री.संत तुकाराम महाराज संस्थान देहू, श्री.संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान आळंदी, श्री.संत नामदेव महाराज संस्थान पंढरपूर या संतांचा देव भेटीचा सोहळा पार पाडला.

**जातो माघारी पंढरीनाथा।**
**तुझे दर्शन झाले आता ।।**

म्हणत जड अंत:करणाने संताच्या पालख्यांनी व वारकऱ्यांनी परतीचा प्रवास सुरु केला. यावेळी मंदिर समिती सदस्य संभाजी शिंदे, ॲड. माधवी निगडे, हभप ज्ञानेश्वर देखमुख जळगांवकर, हभप प्रकाश जवंजाळ, नगराध्यक्षा तथा पदसिध्द सदस्य प्रणिता भालके, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक प्रविणकुमार घम, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, विभाग प्रमुख भिमाशंकर सारवाडकर, सहायक विभाग प्रमुख संदीप कुलकर्णी व पांडूरंग दशपुत्रे उपस्थित होते.

#### सोमवारी प्रक्षाळपूजा

पंढरपूर येथील आषाढी यात्रेत भाविकांना दर्शन देण्यासाठी श्री विठ्ठल-रुक्मिणीमाता अहोरात्र उभे असतात.या कालावधीत देवाचे नित्योपचार बंद असतात. श्री विठ्ठलाचे नवरात्र असल्याने पलंग काढण्यात आलेला असतो. त्यामुळे सोमवारी (दि.०३ ऑगस्ट) श्रींची प्रक्षाळपूजा करण्यात येणार आहे, तर गुरुवार दि.३० जुलै रोजी महाद्वार काला होणार आहे. अशी माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

### तरुणाच्या मृत्यूस कारणीभूत वीज कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २९ जुलै-**

वीज मंडळाकडून तोडण्यात आलेल्या झाडाच्या फांद्या काढत असताना विजेचा शॉक लागून एका तरुणाच्या मृत्यू प्रकरणी अज्ञात वीज कर्मचाऱ्यांवर सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे घटनेच्या तब्बल २७ महिन्यानंतर हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत रेणुका धर्मा मणिवरू (वय ४५ वर्ष, रा. मार्कंडेय नगर, कुमठा नाका, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. दि. २४ एप्रिल २०२४ रोजी वीज मंडळाच्या आरोपी कर्मचाऱ्यांनी महावीर चौकातील डॉ. बागीवाडीकर यांचे वॉलकंपाऊंड लगत असलेले इलेक्ट्रीक पोलजवळ अशोक झाडाचे फांद्या तोडुन न उचलता तेथेच टाकुन निघुन गेले होते. सदर झाडाच्या फांद्या यातील फिर्यादीचा मुलगा शैलेश हा सकाळी११ वा चे सुमारास भिंतीवरुन चढुन काढत असताना झाडाची फांदी इलेक्ट्रिक वायरला लागल्याने त्यात त्यास विजेचा धक्का बसल्याने तो खाली पडला . डोकीस मार लागुन त्याचा मृत्यू होण्यास यातील आरोपी वीज मंडळाचे कर्मचारी जबाबदार असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे . सहाय्यक पोलीस निरीक्षक सावंत हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.




# अरण तीर्थक्षेत्राला मंजूर निधी उपलब्ध करून दिला जाईल

### विकासकार्य अहवालाच्या प्रकाशनप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस यांचे आश्वासन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै-**

संत सावता महाराजांचा विचार हा शेती, माती आणि माणुसकीला जोडणारा आहे. हा विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचला पाहिजे. अरण तीर्थक्षेत्राला विशेष 'अ' वर्ग दर्जा आणि १५१ कोटी रुपयांचा विकास निधी मंजूर झाला आहे. सोलापूर जिल्ह्यातील तीर्थक्षेत्र अरणचा सर्वांगीण विकास करण्यासाठी राज्य सरकारकडून लागेल तो सर्व निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.



संत शिरोमणी सावता महाराज चॅरिटेबल ट्रस्ट आणि संत शिरोमणी सावता महाराज भक्त परिवार यांच्या वतीने गेल्या ५ वर्षांपासून सुरू असलेल्या तीर्थक्षेत्र अरणच्या विकास कामांचा सविस्तर कार्य अहवाल मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते मंत्रालयातील मुख्यमंत्री दालनात प्रकाशित करण्यात आला. त्यावेळी तो बोलत होते. या प्रसंगी राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, राज्याचे बहुजन कल्याण दुग्धविकास दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे, संत शिरोमणी सावता महाराजांचे वंशज गुरुवर्य सावता महाराज वसेकर, संस्थेचे सचिव ह.भ.प. प्रभु महाराज माळी, ह.भ.प. साखरचंद महाराज लोखंडे, ह.भ.प. महादेव महाराज भुजबळ, युवा व्याख्याते अमर हजारे, आबासाहेब खारे तसेच ट्रस्टचे पदाधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्र्यांनी नुकत्याच पार पडलेल्या पंढरपूर वारीच्या उत्कृष्ट नियोजनाबद्दल जयकुमार गोरे यांचे विशेष कौतुक केले. तसेच लवकरच तीर्थक्षेत्र अरणच्या भूमिपूजन समारंभासाठी आपण उपस्थित राहू, असे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले. याप्रसंगी ट्रस्टच्या वतीने दोन प्रमुख मागण्यांचे निवेदन मुख्यमंत्री महोदयांना देण्यात आले. यामध्ये संत सावता महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त पंढरपूरहून अरणला येणाऱ्या पालखीची व्यवस्था विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्यामार्फत करण्यात यावी. संत सावता महाराजांच्या ७७५ व्या जन्मोत्सवानिमित्त त्यांचा चरित्र ग्रंथ व ओवीबंध पारायणाची प्रत राज्य शासनाने प्रकाशित करावी या मागण्यांचा समावेश आहे.

# वीजबिलमुक्त पाणीपुरवठ्याकडे जिल्हा परिषदेची वाटचाल

### नऊ ग्रामपंचायतींमध्ये सौरऊर्जेवर पाणीपुरवठा योजना; ५७ लाखांच्या प्रकल्पासाठी निविदा प्रक्रिया सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ जुलै-**

जिल्ह्यातील ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजनांवर वाढत्या वीजबिलांचा बोजा कमी करून ग्रामपंचायतींना आर्थिक दिलासा देण्याबरोबरच नागरिकांना अखंडित पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

नऊ ग्रामपंचायतींमध्ये सौरऊर्जेवर आधारित पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यासाठी ५७ लाख ५० हजार रुपयांच्या प्रकल्पाची निविदा प्रक्रिया सुरू केली आहे. हा प्रायोगिक उपक्रम यशस्वी ठरल्यास जिल्ह्यातील इतर गावांमध्येही सौरऊर्जेवर आधारित पाणीपुरवठा योजना राबविण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

सध्या अनेक ग्रामपंचायतींना वाढत्या वीजबिलांचा फटका बसत असून थकीत देयकांमुळे पाणीपुरवठा योजनांच्या संचालनात वारंवार अडथळे निर्माण होत आहेत. परिणामी ग्रामीण भागातील नागरिकांना नियमित पाणीपुरवठ्याचा त्रास सहन करावा लागत आहे. या समस्येवर दीर्घकालीन उपाय म्हणून सामाजिक परिवर्तन फाउंडेशनच्या माध्यमातून सौर ग्रीड प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या प्रकल्पासाठी इच्छुक कंत्राटदारांकडून १ ऑगस्टपर्यंत निविदा स्वीकारण्यात येणार असून ३ ऑगस्ट रोजी निविदा उघडण्यात येतील. त्यानंतर तातडीने कामाला सुरुवात केली जाणार आहे. ग्रामीण भागात पाणीपुरवठा ही अत्यावश्यक सेवा अधिक सक्षम करण्यासाठी सौरऊर्जेचा वापर हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

**या पहिल्या टप्प्यात या ग्रामपंचायती**

मिरी, देगाव व अर्जुनसोंड (ता. मोहोळ), मद्रे, विंचूर व बक्षीहिप्परगा (दक्षिण सोलापूर), नरोटेवाडी, पाथरी व नंदूर (ता. उत्तर सोलापूर).



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १५१७

**विष्णुमय खरें जग । येथें लागतसे लाग ।**

समता हा मानवतेचा आधारस्तंभ आहे. ज्या ठिकाणी समता नाही, त्या ठिकाणी मानवतेचे दर्शन होत नाही. आपल्याप्रमाणे इतरांनीही मानवी जीवनाचा आनंद उपभेगावा असे आपणाला वाटत असेल तर समता जोपासणे हे आपले ध्येय असायला हवे. माणूस म्हणून जन्माला येणारा प्रत्येक माणूस समता जोपासतोच असे नाही. अशा समता न जोपासणाऱ्या व्यक्तिला समत्वाचा धडा देण्यासाठी व जे समता जोपासत आहेत, ते समत्वापासून कधीच ढळू नयेत, म्हणून संत महात्म्यांना समतेचा उपदेश करावा लागतो. वारकरी सांप्रदाय हा मानवतेची आठवण करून देणारा व चोहीकडे समत्व जोपासणारा सांप्रदाय आहे. हा सांप्रदाय सर्व जीवात एका भगवंताला पाहतो. या सांप्रदायाप्रमाणे सर्व जीवांनी एकमेकात एकाच ईश्वराला पाहायला हवे. सर्व जग हे विष्णुमय आहे. प्रत्येक जीवाचे स्थान, अधिकार, हक्क त्याच्या ठिकाणी समान असायला हवेत. कोणत्याही जीवाकडे वर्ण किंवा जातीनुसार वेगळ्या भावनेने पाहू नये. आत्मीक दृष्ट्या सर्व जीव एकच आहेत. केवळ बाह्यांगाने



किंवा राहणीमानाने ते वेगवेगळे दिसत असले तरीही त्यांची विभागणी वर्णानुसार, जातीनुसार केली जाऊ नये. सर्वत्र समत्व जोपासले जावे. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात,

**विष्णुमय खरें जग । येथे लागतसे लाग ।**
**वांटिले विभाग । वर्णधर्म हा खेळ ।**

स्त्री-पुरुष, वर्ण, रंग, जात, वंश, सत्ता आदिच्या आधारावर माणसांची कळत नकळत विभागणी केली जाते. कोणाच्या पोटी किंवा कोणत्या जाती धर्मात जन्म घ्यावा हे कोणाच्याच हाती नसते. तरीपण लोक कोण कोणाच्या पोटी, कोणत्या जातीत जन्माला आला यावरून त्याची विभागणी केल्याशिवाय राहत नाहीत. मूळात सर्व जीव सारखेच आहेत. या विचाराच्या मुळाशी न जाता माणूस वरकरणी पाहतो आणि स्वत:ला जे योग्य वाटेल त्याप्रमाणे व्यक्ती व्यक्तीमध्ये भेद करून मोकळा होतो. भेदाची झळ किंवा भेदामुळे होणारी हानी ही केव्हा केव्हा कधीच न भरून निघणारी असते. आपल्यावर जेव्हा असे भेदाचे गंडातर येते तेव्हा भेद करणे उचित नाही, असे आपणाला वाटते. पण आपल्याकडून किंवा आपल्या विचारसरणीमुळे इतरावर भेदाची कुऱ्हाड कोसळते तेव्हा आपणाला त्याचे कांहीच वाटू नये, हे आश्चर्य नव्हे काय? आपण ज्ञानोबा-तुकोबांच्या आचार-विचारांचा आदर्श घेणारे आहोत. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत आपल्याकडून भेदात्मक वर्णन होता कामा नये. आपल्या देशाला वाढत्या लोकसंख्येची गरज नाही तर आहे त्या लोकांत समता निर्माण होण्याची गरज आहे, हे आपण याप्रसंगी लक्षात ठेवायला हवे. महाराजांच्या अभंगांचे आम्ही काढलेले अर्थ अंतिम नसल्याने वाचकांनी मूळ गाथा वाचावी ही विनंती. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : गुरूवार,**
**दि. ३० जुलै २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - आषाढ कृ. प्रतिपदा**
**ऋतु - वर्षा ।**
**नक्षत्र- श्रवण (१७.४२)**
**योग - आयुष्मान (२४.०४)**
**करण - बालव (०८.१८)**
**राहू काल : गुरूवार**
**स. ०१.३० ते ०३.००**

**दिनविशेष :१६२२: रामचरितमानसचे रचनाकार संत तुलसीदास यांनी देहत्याग केला.**
**१९२८: प्रसिद्ध अभिनेत्री, पद्मश्री आणि महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित सुलोचना लाटकर यांचा जन्म.**
**१९७३: भारतीय पार्श्वगायक सोनू निगम यांचा जन्म.**
**१९८३: शास्त्रीय गायक व अभिनेते पंडित वसंतराव देशपांडे यांचे निधन.**



# नेहरू वसतीगृहाच्या गाळे भाड्याची ३० लाखांची थकबाकी

### जिल्हा परिषदेसमोर थकबाकी वसुलीचे आव्हान; भाडे, पाणीपट्टी, वीजबिल आणि देखभाल खर्चाचा वाढता आर्थिक ताण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२९ जुलै-**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत येणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकातील जवाहरलाल नेहरू वसतीगृहातील गाळे क्रमांक १ ते १७ च्या भाडेवसुलीचा आढावा घेतल्यानंतर तब्बल ३० लाख १७ हजार ६७९ इतकी थकबाकी असल्याचे वास्तव समोर आले आहे.

नेहरू वसतीगृहाच्या उत्पन्नाचा प्रमुख स्रोत असलेल्या गाळेभाड्याची मोठी रक्कम अद्याप वसूल न झाल्याने देखभाल, दुरुस्ती आणि इतर मूलभूत सुविधांवरील खर्चाचे नियोजन अडचणीत येण्याची शक्यता व्यक्त होत आहे. त्यामुळे थकीत भाडे तातडीने वसूल करण्यासाठी प्रशासनाने हालचाली सुरू केल्याची माहिती समोर आली आहे.

भाडे थकबाकीबरोबरच वसतीगृहाच्या देखभाल आणि दुरुस्तीचा खर्चही वाढत आहे. वसतीगृह व्यवस्थापन, दुरुस्ती, सुधारणा, पाणीपट्टी आणि वीजबिलासाठी दरवर्षी लाखो रुपयांचा खर्च होत आहे. केवळ वीजबिलासाठीच दरमहा सुमारे २५ हजार ५० इतका खर्च होत असून वर्षाकाठी सुमारे ३ लाख खर्च केला जातो. तर महापालिकेला पाणीपट्टीसाठी सुमारे ६ लाख ८५ हजार रुपये मोजावे लागत आहेत. अशा परिस्थितीत भाडे वेळेत वसूल होणे आर्थिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे.

दरम्यान, यापुढे थकबाकीदारांना नोटिसा देणे, थकीत रक्कम भरण्यासाठी मुदत देणे आणि त्यानंतरही प्रतिसाद न मिळाल्यास नियमांनुसार पुढील कारवाई करण्याची तयारी सुरू असल्याचे समजते.

वसतीगृहाच्या उत्पन्नातूनच दैनंदिन देखभाल, आवश्यक दुरुस्ती आणि सुविधा पुरवल्या जात असल्याने थकबाकीची समस्या लवकरात लवकर मार्गी लावणे गरजेचे बनले आहे.

**थकबाकीदारांमध्ये यांचा समावेश**

विजय प्रताप युवा मंच (गाळा क्र. १७) यांच्याकडे सर्वाधिक १० लाख ५७ हजार ६६६ इतकी रक्कम बाकी आहे. त्यानंतर बी. आर. म्हमाणे (गाळा क्र. १६) यांच्याकडे ७ लाख ११ हजार २३९, शाम क्षिरसागर (गाळा क्र. ११) यांच्याकडे ३ लाख ३४ हजार ९४२, जनसेवा संघटना (गाळा क्र. १२) यांच्याकडे २ लाख ६६ हजार ३७४, संदीप पोपटलाल गांधी (गाळा क्र. ८) यांच्याकडे २ लाख ४७ हजार ८२१ आणि पोस्ट ऑफिस (गाळा क्र. ४) यांच्याकडे २ लाख ३३ हजार ४८९ इतकी थकबाकी असल्याची नोंद आहे.

काही गाळेधारकांनी संपूर्ण भाडे भरले असून काहींकडे किरकोळ जादा रक्कम जमा झाल्याचेही नोंदीत दिसून येते.

सोलापूर जिल्हा परिषदेच्या अर्थ विभागाच्या उपलब्ध गोषवाऱ्यानुसार, १ ऑगस्ट २०२३ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत गाळ्यांकडून १ कोटी ४२ लाख ३० हजार ९२९ इतके भाडे अपेक्षित होते. मात्र, प्रत्यक्षात १ कोटी १२ लाख १३ हजार २५० इतकीच रक्कम जमा झाली असून ३० लाख १७ हजार ६७९ इतकी थकबाकी शिल्लक आहे.

### वसतीगृहाचा निधी हा वसतीगृहाच्या सुविधांसाठीच वापरला जाणार



जवाहरलाल नेहरू वसतीगृह हे जिल्हा परिषदेची महत्त्वाची मालमत्ता आहे. गाळेधारकांनी नियमानुसार व वेळेत भाडे भरणे ही त्यांची जबाबदारी आहे. थकीत भाड्यामुळे वसतीगृहाच्या देखभाल व विकासकामांवर परिणाम होतो. त्यामुळे सर्व थकबाकीदारांकडून नियमानुसार भाडेवसुली केली जाईल. आवश्यक तेथे नोटिसा देऊन नियमांनुसार कारवाई करण्यात येईल. वसतीगृहाचा निधी हा वसतीगृहाच्या सुविधांसाठीच वापरला जाणार असून आर्थिक शिस्त राखण्याला प्राधान्य दिले जाईल.

- **इंद्रजीत पवार,** उपाध्यक्ष तथा अर्थ व बांधकाम समितीचे सभापती.

## प्रगतीचे रहस्य गुरु शिष्य परंपरेतच




'गुरु-शिष्य परंपरा टिकली पाहिजे. गुरुशिष्य परंपरेमुळे मनुष्याला अनंतकाळाचा वारसा प्राप्त झाला आहे.मानवाच्या सर्व क्षेत्रातील प्रगतीचे खरे रहस्य त्याच्या गुरु शिष्य परंपरेतच साठवलेले आहे'असे प्रतिपादन वे ऑफ लाइफच्या प्रणेता ध्यानसिद्धा श्री. अक्षयश्री म.सा.यांनी केले.

बलिदान चौक येथील जैन स्थानकात अक्षय चातुर्मासानिमित्त आयोजित प्रवचनात त्या बोलत होत्या.यावेळी महासती मल्लिश्रीजी, मौनसाधिका वैभवश्रीजी, नवदीक्षिता श्री.संयमश्रीजी आदी साध्वीगण उपस्थित होते. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या, भरत क्षेत्रअतिशय समृद्ध आहे. या समृद्धीचे कारण म्हणजे मुक्तीकडे जाण्याचा मार्ग या क्षेत्रात आहे. अशी ही पुण्यभूमी अनेक महासंतांची कर्मभूमी आहे. असे क्षेत्र फक्त पुण्यवानांनाच प्राप्त होते. मुक्तीचा मार्ग हा फक्त आपल्याच देशात आहे. आगामी काळात साधू, साधवी, श्रावक, श्राविका यांनाच खऱ्या अर्थाने मुक्ती मिळणार आहे. चातुर्मासाच्या काळात जिनेश्वर वाणी आत्मसात करा. जिनेश्वर वाणी श्रवण केल्यामुळे लक्ष प्राप्तीचा मार्ग सुंदर व प्रशस्त बनतो.यासाठी वाणी श्रवण करताना लक्षपूर्वक श्रवण करा.

मनुष्य जोपर्यंत आपल्या पाठीवर इच्छा अपेक्षांचे ओझे घेऊन फिरतो तोपर्यंत तो सुखी होऊ शकत नाही. सोन्या चांदीच्या पर्वतामध्ये जरी त्याला सोडले तरी त्याची हाव कमी होत नाही. तो अजूनच्या मागे लागलेलाच असतो. सर्व मलाच मिळाले पाहिजे ही माणसाची वृत्ती चुकीची आहे. ज्यादिवशी मनात खऱ्या अर्थाने कोणत्याच इच्छा अपेक्षा राहणार नाहीत त्याच दिवशी त्याला अनंत सुखाची प्राप्ती झाल्याशिवाय राहणार नाही. संकटांचा सामना करण्याची क्षमता शिष्यांमध्ये निर्माण करतात, त्याचे खांदे मजबूत बनवतात. म्हणून गुरुप्रती विनम्र भावनेने, विश्वासाने समर्पण भाव ठेवा.



## स्पर्धा परीक्षा ही एकदिवसीय नव्हे, तर सातत्याची कसोटी : संपदा वांगे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै-**

स्पर्धा परीक्षा ही एका दिवसात जिंकली जाणारी लढाई नसून सातत्यपूर्ण अभ्यास, योग्य नियोजन, संयम आणि चिकाटी यांची दीर्घकालीन कसोटी आहे. कोणत्याही माध्यमातून शिक्षण घेतले असले तरी आत्मविश्वास, सकारात्मक दृष्टिकोन आणि नियमित परिश्रम यांच्या बळावर प्रत्येक विद्यार्थ्याला स्पर्धा परीक्षेत यश मिळिवता येते, असे प्रतिपादन मुंबई येथील सहाय्यक आयुक्त तथा विक्रीकर निरीक्षक संपदा वांगे यांनी केले.

वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स आणि हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स यांच्या संयुक्त विद्यमाने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे आयोजित विशेष व्याख्यानात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्रा. शिवकुमार बिरादार होते. प्रास्ताविक प्रा. डॉ. संगमेश्वर निला यांनी केले. प्रमुख वक्त्यांचा परिचय डॉ. भागवत गजधाने यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. पद्मावती पाटील यांनी केले. डॉ. अमोल शिंदे यांनी आभार मानले. यावेळी प्रा. डॉ. सिद्राम सलवदे, प्रा. हनुमंत मते, डॉ. गोविंद तोडकरी, डॉ. रामचंद्र गोरे, डॉ. महावीर साबळे, डॉ. दत्तात्रय कांबळे, डॉ. परमेश्वर कमळे, डॉ. दीपाली राजमाने, प्रा. संगीता माळी आदी उपस्थित होते.

# प्रिसिजन वाचन अभियानात हेमकिरण पत्की यांच्याशी संवाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ जुलै-**

पुस्तक वाचणे हा एक अनुभव असतो; मात्र त्या पुस्तकामागील विचारविश्व घडविणाऱ्या लेखकाला प्रत्यक्ष भेटून त्याच्या साहित्यप्रवासाशी संवाद साधणे हा त्याहून समृद्ध करणारा अनुभव असतो. हाच अनुभव रसिकांना देण्यासाठी प्रिसिजन फाउंडेशन आयोजित 'प्रिसिजन वाचन अभियान' अंतर्गत मराठीतील चिंतनशील कवी, लेखक आणि तत्त्वज्ञ जे. कृष्णमूर्ती यांच्या विचारांचे अभ्यासक मा. हेमकिरण पत्की यांच्याशी मुक्त संवादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात पत्रकार रजनीश जोशी आणि लेखिका प्रा. डॉ. प्रिया निघोजकर हे त्यांच्या साहित्य, कविता, वाचनसंस्कृती आणि जीवनदृष्टीचा वेध घेणार आहेत.

हा कार्यक्रम शनिवार, दि. १ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६.२५ वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे होणार आहे.

हेमकिरण पत्की हे मराठी साहित्यातील संवेदनशील आणि चिंतनशील लेखनासाठी ओळखले जातात. कविता, वैचारिक लेखन आणि जे. कृष्णमूर्ती यांच्या तत्त्वज्ञानाचा त्यांनी सखोल अभ्यास केला असून, त्यांच्या साहित्यकृतींमध्ये मानवी मन, नातेसंबंध, आत्मशोध आणि जीवनातील सूक्ष्म अनुभवांचे प्रभावी दर्शन घडते. त्यांच्या साहित्यप्रवासातील विविध पैलू, लेखनामागील प्रेरणा, वाचनाचे महत्त्व, बदलती साहित्यसंस्कृती आणि आजच्या काळातील लेखकाची भूमिका यांवर या कार्यक्रमात सखोल चर्चा होणार आहे. या संवादात सहभागी होणाऱ्या प्रा. डॉ. प्रिया निघोजकर या मराठी साहित्यिक, समीक्षक, संपादक आणि संशोधक असून त्या सध्या सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे येथे सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

मराठी भाषा व साहित्य क्षेत्रातील त्यांचे संशोधन, लेखन आणि संपादन कार्य उल्लेखनीय असून त्यांना विविध राज्यस्तरीय साहित्य पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.



## आषाढी वारीत डॉ.श्रद्धा कदम यांनी तीन हजार रुग्णांवर केले मोफत उपचार

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.२९ जुलै-**

पंढरपूर येथील आषाढी वारी निमित्त श्री विश्वधारा आयुर्वेदिक प्रतिष्ठानच्या डॉ. श्रध्दा कदम यांच्या वतीने मोफत उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या मोफत आरोग्य शिबिरामध्ये ३००० वारकऱ्यांवर मोफत उपचार करण्यात आले. श्री विश्वधारा आयुर्वेद प्रतिष्ठान यांच्या वतीने सलग ४ वर्षांपासून आषाढी वारीमध्ये मोफत आरोग्य शिबिराचे आयोजित करण्यात येत आहे.

श्री विश्वधारा आयुर्वेद प्रतिष्ठानच्या आषाढी वारीतील मोफत आरोग्य शिबिरामध्ये डॉ.श्रीधर यलमार, डॉ.श्रीकांत खटावकर, डॉ.कैलास नरळे, डॉ. किरण थोरात, डॉ. स्वप्नील बारी, निलेश जगताप, दिपाली सतपाल, सारिका आरफा खाटीक, पूजा यांनी परिश्रम घेतले. शिबिरासाठी रेखा चंद्रराव यांनी सहकार्य केले. शिबिरास पोलीस उपअधीक्षक हिम्मत जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी भेट दिली.



## महावीर हायस्कूलमध्ये लैंगिक शिक्षण व जीवन विकास कौशल्य विषयावर मार्गदर्शन

**सोलापूर, २९ जुलै-**

विकास नगर येथील श्री महावीर हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रिसिजन फाउंडेशन व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'लैंगिक शिक्षण व जीवन विकास कौशल्य' विषयावर विशेष मार्गदर्शन वर्ग आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्याध्यापिका उज्वला पाटील यांनी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशनचे प्रोग्राम मॅनेजर वीरेंद्र परदेशी यांचे स्वागत केले. मार्गदर्शनादरम्यान विद्यार्थ्यांना चित्रफलक, विविध ॲक्टिव्हिटीज आणि स्लाईड शोच्या माध्यमातून वैयक्तिक आरोग्य, स्वच्छता, जीवन कौशल्ये, बाल लैंगिक शोषणापासून संरक्षण, व्यसनमुक्ती तसेच कॅन्सर व मधुमेह यांसारख्या आजारांबाबत माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी वीरेंद्र परदेशी यांनी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाही या विषयांचे महत्त्व व विद्यार्थ्यांशी संवेदनशील संवादाची आवश्यकता याविषयी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन एस. बी. बिडवई यांनी केले.




## अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव शांततेत साजरा करा

### पोलिस आयुक्त एम. राजकुमार; शांतता कमिटीची संयुक्त बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ जुलै-**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव-२०२६ शांततेत व कायदेशीर चौकटीत पार पाडण्यासाठी पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी पोलीस आयुक्तालयात शांतता समितीची संयुक्त बैठक झाली. यावेळी पोलीस अधिकारी, महापालिका, महावितरण, आरटीओ, धर्मादाय आयुक्त कार्यालयाचे अधिकारी, उत्सव मंडळांचे पदाधिकारी, शांतता समिती सदस्य व पत्रकार उपस्थित होते.

बैठकीत १ ते ९ ऑगस्टदरम्यान होणाऱ्या उत्सवानिमित्त मंडळांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. मिरवणुकीत पारंपरिक वाद्यांचा वापर करणे, ध्वनीप्रदूषणाबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे, सीसीटीव्ही व्यवस्था करणे, अधिकृत वीजजोडणी घेणे, सामाजिक संदेश देणारे देखावे उभारणे, तसेच मिरवणुकीत सुरक्षिततेचे सर्व नियम पाळण्याचे आवाहन करण्यात आले. सोशल मीडियावर आक्षेपार्ह संदेश आढळल्यास तातडीने पोलिसांना माहिती देण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. बैठकीस पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) वृष्टी जैन, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) डॉ. अश्विनी पाटील, पोलीस उप आयुक्त (परिमंडळ) प्रितम यावलकर ,सहा पोलीस आयुक्त विभाग-२, श्रीमती कुर्री, सहा. पोलीस आयुक्त (शवाशा) खिरडकर, सहा पोलीस आयुक्त दिलीप पवार (गुन्हे शाखा), यादव, सहा पोलीस आयुक्त (नियंत्रण कक्ष) सहा पोलीस आयुक्त देवकर (विशेषशाखा) तसेच सोलापूर महानगरपालिका कडील एस.ए.हिबारे, महावितरण अभियंता गायडे, सोलापूर अग्नीशामक दलाचे समीर पाटील, धर्मादाय आयुक्त कार्यालय कडील उमेश देशमुख उपस्थित होते.

## गांजा तस्करी प्रकरणातील आरोपीची जामीनावर सुटका



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २९ जुलै-**

कुर्डुवाडी पोलीस स्टेशनला गुप्त माहितीगारामार्फत दि. १ सप्टेंबर २०२५ रोजी माहिती मिळाली की, कुर्डुवाडी येथील अजीनाथ उर्फ महाराज वाघमोडे यांचे घरी गांज्याचा मोठा साठा आहे. अशी माहिती मिळाल्यानंतर कुडुवाडी डी पोलीसांनी अजिनाथ वाघमोडे यांचे घरावर धाड टाकली असता अजिनाथ वाघमाडे यांचे घराचे टेरेसवर असलेल्या खोलीमध्ये पाच पोत्यामध्ये ६९.५ किलो गांजा मिळून आला. त्याचा सविस्तर पंचनामा पोलिसांनी करुन गांजा जप्त केला व कुर्दुवाडी पो.गु.र.नं. ३६२/२०२५ अन्वये आरोपी अजिनाथ वाघमोडे यांचेवर गुन्हा दाखल करुन अटक केली.

पोलीस तपासादरम्यान आरोपी अजिनाथ वाघमोडे यांनी आरोपी समीर तांबोळी व रोहित कोरडे यांनी रक्कम रुपये ६,००,०००/- (अक्षरी सहा लाख रुपये) घेवून गांजा दि. ३१ ऑगस्ट २०२५ रोजी वारदवाडी फाटा येथे आरोपी अजिनाथ वाघमोडे यांना विक्री केलेला आहे, तसेच गांजा हा विशाखापट्टणम येथील आरोपींनी रेल्वेने आणला व तो गांजा आरोपींनी बार्शी, उस्मानाबाद येथे नेवून नंतर दि. ३१ ऑगस्ट २०२५ रोजी वारदवाडी फाटा येथे गांजा आरोपींनी अजिनाथ वाघमोडे यांना दिला. पोलिसांनी आरोपी समीर तांबोळी यांना अटक केली, तसेच आरोपी समीर तांबोळी विशाखापट्टनम येथे गेले. त्यावेळचे लोकेशन, तसेच आरोपी अजिनाथ वाघमोडेबरोबर मोबाईल फोनवरुन केलेले संभाषणाचे CDR इत्यादी पुरावा गोळा केला.

यात आरोपीचे ॲड. सुभाष जाधवर यांनी मा. सर्वोच्च न्यायालय व मुंबई उच्च न्यायालयाचे न्याय निवाड्यांचा संदर्भ देवून पोलिसांनी आरोपीविरुद्ध गोळा केलेला पुरावा हा सकृतदर्शनी आरोपी समीर तांबोळी यास दोषी धरण्यासाठी पुरेसा नाही. तसेच केसमध्ये पुरावा नोंदविणेसाठी अनिश्चित कालावधी लागेल व आरोपीस जेलमध्ये ठेवून कोणताही हेतु साध्य होणार नाही. तरी जामीनवर सोडणेत यावे, असा युक्तीवाद केला तर सरकार पक्षातर्फे सरकारी वकील पाटील यांनी आरोपीने विशाखापट्टणम येथून गांजा आणून त्याची विक्री आरोपी नं. १ अजिनाथ वाघमोडे यांना केलेली आहे. त्याबाबतचा सबळ पुरावा पोलिसांनी गोळा केलेला आहे. आरोपी समीर तांबोळी यांना यापुर्वीचे गांजा तस्करी प्रकरणी जामीन दिलेला आहे, अशा प्रकारे आरोपी हा सराईत गांजा तस्करी करतो त्यांचा जामीन देण्यात येवू नये, असा युक्तीवाद केला. आरोपीचे ॲड. सुभाष जाधवर यांनी केलेला युक्तीवाद मा.ना. हायकोर्ट सर्किट बेंच कोल्हापूर येथील न्यायमूर्ती पठाण यांनी ग्राह्य धरुन आरोपीला जामीन मंजूर केला. या प्रकरणी आरोपीतर्फे ॲड. सुभाष जाधवर, ॲड. तेजस सुभाष जाधवर तर सरकार पक्षातर्फे सरकारी वकील ॲड. पाटील यांनी काम पाहिले.

## चक्रवर्ती गणपती ट्रस्टतर्फे एसटी महामंडळाचे स्मार्ट कार्ड शिबिर शनिवारी

**सोलापूर, दि. २९ जुलै-**

चक्रवर्ती गणपती देवस्थान ट्रस्टतर्फे महाराष्ट्र शासनाच्या एसटी महामंडळातर्फे देण्यात येणाऱ्या एनसीएमसी स्मार्ट कार्डच्या शिबिराचे आयोजन केले आहे. हे शिबिर शनिवार दि. एक ऑगस्ट रोजी श्री चक्रवर्ती महागणपती देवस्थान मंडप. ९५/३इ चक्रवर्ती हाउसिंग सोसायटी, दयानंद कॉलेज शेजारी रविवार पेठ सोलापूर येथे सकाळी १० ते २ वाजेपर्यंत होईल. यासाठी व्यक्ती स्वतः हजर राहणे आवश्यक. आधार कार्ड व मोबाईल आणि मोबाईल आधार कार्ड लिंक केलेला आवश्यक. वय वर्ष बारा पूर्ण केलेल्या सर्व महिलांसाठी आणि वय वर्ष ६५ पूर्ण केलेल्या महिला व पुरुषांसाठी आहे. तरी या भागातील अथवा शहराच्या कोणत्याही भागातील इच्छुकांनी संतोष सोनीमिंडे (९४२२४ ६२८०४ ) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन चक्रवर्ती महागणपती देवस्थान ट्रस्टचे सेक्रेटरी रमेश जैन यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# स्वामी समर्थ मंदिर परिसराचा कॉरिडॉरच्या धर्तीवर विकास

## आमदार कल्याणशेट्टी यांच्या पाठपुराव्याला यश, म्हाडा विशेष नियोजन प्राधिकरण



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २९ जुलै-**

अक्कलकोट येथील श्री वटवृक्ष स्वामी समर्थ मंदिर परिसराच्या सर्वांगीण, नियोजनबद्ध आणि दीर्घकालीन विकासासाठीच्या आराखड्यास अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केलेल्या मागणी व सातत्यपूर्ण पाठपुराव्यास अनुसरून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या सूचनेनुसार उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यास मान्यता देत महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) यांची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यास मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे अक्कलकोटच्या विकास आराखड्याला गती मिळणार असून धार्मिक, पर्यटन आणि नागरी विकासाला नवे बळ मिळणार आहे.

या प्रस्तावासाठी अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा केला होता. त्यानंतर अक्कलकोट नगरपरिषद, सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालय आणि म्हाडा यांनी संयुक्तपणे शासनाकडे प्रस्ताव सादर केला. शासनाने या प्रस्तावाला हिरवा कंदील दिल्याने मंदिर परिसराच्या विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. विकास आराखड्यानुसार मंदिर परिसरातील प्रमुख रस्त्यांचे रुंदीकरण व सुशोभीकरण, आधुनिक वाहनतळांची उभारणी, आरक्षित जागांचा विकास, पादचारी सुविधांची निर्मिती तसेच आवश्यक पायाभूत सुविधांचे बळकटीकरण करण्यात येणार आहे. या महत्त्वाकांक्षी योजनेसाठी म्हाडाने आवश्यक निधीची तरतूद करण्याची तयारी दर्शविली आहे. म्हाडाच्या या संकल्पनेतून अक्कलकोटचा विकास दोन टप्प्यांत करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात श्री स्वामी समर्थ मंदिर परिसर आणि श्री स्वामी समर्थ समाधी मठ परिसराचा विकास करण्यात येणार असून, दुसऱ्या टप्प्यात श्री स्वामी समर्थ मंदिर ते श्री स्वामी समर्थ समाधी मठ या पालखी मार्गाचा विकास साधला जाणार आहे.

देशभरातून अक्कलकोटला येणाऱ्या लाखो भाविकांना अधिक सुसज्ज, सुरक्षित आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध होणार असून, तीर्थक्षेत्राच्या पर्यटन विकासालाही मोठी चालना मिळणार आहे. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, पालकमंत्री जयकुमार गोरे, गृहनिर्माण विभागाचे अतिरिक्त सचिव असिम कुमार गुप्ता आणि म्हाडाचे उपाध्यक्ष संजीव जैस्वाल यांचे सहकार्य लाभल्याबद्दल मी विशेष आभार व्यक्त करीत आहे.



- **सचिन कल्याणशेट्टी**, आमदार, अक्कलकोट

श्री स्वामी समर्थ मंदिर परिसराचा विकास, पालखी मार्गाचे सुशोभीकरण, समाधी मंदिर परिसराचा विकास, शहरातील वाहतूक व्यवस्थेचे आधुनिकीकरण, तलाव व उद्यानांचे संवर्धन तसेच भाविकांसाठी आधुनिक सार्वजनिक सुविधा उभारण्याचाही आराखड्यात समावेश आहे.

---

## महत्वाचे...



### ग्रामीण आरोग्य केंद्र इमारत निधीसाठी आ.राऊत यांनी मंत्री मुश्रीफांची घेतली भेट

**बार्शी, दि. २९ जुलै-**

आमदार राजाभाऊ राऊत यांनी वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांची ग्रामीण आरोग्य प्रशिक्षण केंद्र इमारत बांधकाम निधीसाठी भेट घेतली. यावेळी नगरविकास, परिवहन, सामाजिक न्याय व वैद्यकीय शिक्षण खात्याच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ उपस्थित होत्या. बार्शी तालुक्यातील वैराग येथे डॉ. वैशंपायन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर अंतर्गत ग्रामीण आरोग्य प्रशिक्षण केंद्र, वैराग हे सध्या ग्रामीण रुग्णालयच्या इमारतीमध्ये कार्यरत आहे. सध्या या आरोग्य प्रशिक्षण केंद्रामध्ये स्वतंत्र व सुसज्ज हॉस्पिटल इमारत, विद्यार्थी वसतिगृह, वैद्यकीय अधिकारी व प्रशिक्षणार्थी यासाठी निवासस्थाने या सोयीसुविधा उपलब्ध नसल्यामुळे आरोग्य सेवा आणि प्रशिक्षणावर मर्यादा येत आहेत. त्यासाठी नवीन सुसज्ज हॉस्पिटल इमारत, विद्यार्थी व निवासी डॉक्टरांसाठी सुसज्ज वसतिगृह, प्राध्यापक, अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने, अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा, वीज व पायाभूत सुविधा इत्यादी कामांसाठी निधी तसेच प्रशासकीय मान्यता मिळावी ही मागणी आमदार राजाभाऊ राऊत यांनी वैद्यकीय शिक्षणमंत्री ना.हसन मुश्रीफ यांच्याकडे केली.




### 'ए. जी. पाटील'च्या विद्यार्थ्याची फ्रान्समधील आंतरराष्ट्रीय संस्थेत निवड

**सोलापूर, दि. २९ जुलै-**

शांती एज्युकेशन सोसायटी संचलित ए. जी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील कॉम्प्युटर अभियांत्रिकी विभागाच्या २०२६ बॅचचा विद्यार्थी रोनी भकता याची फ्रान्समधील पॅरिस येथील आंतरराष्ट्रीय संस्थेत निवड झाली. त्याला दरमहा ५,८०० युरो (सुमारे ५.८५ लाख रुपये) वेतनाचे आकर्षक पॅकेज मिळाले आहे. उत्कृष्ट तांत्रिक कौशल्य, संशोधनवृत्ती आणि जागतिक दर्जाच्या कामगिरीच्या बळावर त्याने हे यश संपादन केले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष एस. ए. पाटील यांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला. यावेळी सेक्रेटरी एस. एस. पाटील, कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार यांनी त्याचे अभिनंदन केले.



### हरिओम संस्थेकडून जगन्नाथ रथयात्रेत महाप्रसाद वाटप

**सोलापूर, दि. २९ जुलै-**

यंदाच्या वर्षी सुद्धा इस्कॉनतर्फे जगन्नाथ रथयात्रा काढली. सदर रथयात्रा हुतात्मा पुतळ्या पासून सुरवात झाली. सदर रथयात्रा दुपारी ४ वाजता राजेंद्र चौक, गिरीश टेलर जवळ आल्यानंतर हरी ओम विणकर बाग बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने जगन्नाथ रथयात्रेतील श्रीकृष्णाची पूजा व आरती करण्यात आली. त्यानंतर भक्तांना फुलहोरा (प्रसाद) वाटप करण्यात आली. रथयात्रेतील श्रीकृष्णची दर्शन घेण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. यावेळी लक्ष्मीकांत दंडी, सिद्धम, प्रकाश पुल्ली, हिरालाल धुळम, संजीव नादरगी, गिरीश शंकू उपस्थित होते.




### भक्तीतून काव्य जन्माला येते : पत्रकार अरविंद जोशी

**बार्शी, दि. २९ जुलै-**

योगा पेक्षा सुद्धा भक्ती श्रेष्ठ आहे. याचा निवाळा प्रत्यक्ष श्री भगवंतांनी श्रीमद्भगवद्गीतेत दिला आहे. जीवनावरील आणि माणुसकी वरील भक्तीतून काव्य जन्माला येते, असे प्रतिपादन व्याख्याते आणि पत्रकार अरविंद जोशी यांनी कवी कालिदास महोत्सवात बोलताना केले. कवी कालिदास मंडळाच्यावतीने आयोजित मेघदूत पुरस्कार वितरणप्रसंगी प्रमुख पाहुणे या नात्याने ते बोलत होते. प्रारंभी कवी कुलगुरु कालिदासाच्या प्रतिमेचे पूजन करुन दीप प्रज्वलन करण्यात आले. गिरिजा पोळ यांनी घन घन मला नभी दाटल्या हे स्वागत गीत सादर केले. प्रास्ताविक मंडळाचे अध्यक्ष आबासाहेब घावटे यांनी केले. सुमन चंद्रशेखर यांनी पुरस्कार विजेत्या काव्यसंग्रहांचा परिचय करुन दिला आणि परीक्षकांची भूमिका स्पष्ट केली. त्यांनी आणि प्रा.रविराज फुरडे यांनी या पुरस्कारासाठी परीक्षणाचे काम केले. त्यानंतर तळ्यातील आकाश या काव्यसंग्रहासाठी दीपाली दातार आणि माणुसकीची अंत्ययात्रा या काव्यसंग्रहासाठी प्रदीप बडदे या दोन कवींना मेघदूत पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. हे पुरस्कार अनुक्रमे स्व. जिजाबाई गव्हाणे आणि स्व.पं.ना. कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ त्यांच्या पाल्यांनी प्रायोजित केले होते. माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांनी मंडळाच्या कार्याचा गौरव करुन शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी मायबोली सांस्कृतिक मंडळ, महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा बार्शी, श्री भगवंत योग परिवार या संस्थांचा आणि श्रीमद्भगवद्गीता मुखोद्गत असणाऱ्या सान्वी आणि स्वप्निल पाठक या दोन छोट्या मुलांचा सन्मान करण्यात आला. आभार कवी दत्ता गोसावी यांनी मानले. सूत्रसंचालन अर्चना पोळ यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रकाश गव्हाणे, प्रा. रविराज फुरडे, मुकुंदराज कुलकर्णी, रामचंद्र इकारे, शिवानंद चंद्रशेखर, शारदा पानगावकर यांनी परिश्रम घेतले.

---

## सांगोला रत्न अलंकार पुरस्काराने बाळासाहेब पाटील सन्मानित



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २९ जुलै-**

सांगोला विद्यामंदिर प्रशालेच्या १९७० च्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचे दुसरे स्नेहमिलन संमेलन पार पडले.

याप्रसंगी मित्र मंडळींच्या वतीने कोकण विभागाचे सेवानिवृत्त मुख्य अभियंता बाळासाहेब पाटील यांना सांगोला रत्न अलंकार हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. अध्यक्षस्थानी मंगल कुरकुटे-ढगे होत्या. संमेलनाची सुरुवात गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व अभिवादन करून झाली. यावेळी वाढदिवसाचे औचित्य साधून जयप्रकाश मस्के तसेच प्रा.राजेंद्र ठोंबरे, शिक्षक मनोज जांगळे, मुजावर यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी म.ज.घोंगडे यांनी रामायणाचे महाभारत ही विनोदी कथा तसेच मंगल कुरकुटे, हेमंत कुलकर्णी, प्रा.राजेंद्र ठोंबरे यांनी गाणी सादर केली.



## 'कर्मयोगी इन्स्टिट्यूट'च्या विद्यार्थ्यांनी हजारो वारकऱ्यांना पुरविली आरोग्यसेवा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २९ जुलै-**

आषाढी वारीनिमित्त वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याचा उपक्रम श्री पांडुरंग प्रतिष्ठान संचलित कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग, पंढरपूर येथील बी.एस्सी. नर्सिंग व जी.एन.एम. नर्सिंगच्या विद्यार्थ्यांनी राबविला.

हजारो वारकऱ्यांना विविध आरोग्यसेवा देत विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. यामध्ये वारकऱ्यांचे रक्तदाब व रक्तातील साखरेची तपासणी, थकलेल्या वारकऱ्यांच्या हात-पायांना मसाज, तसेच आरोग्यविषयक मार्गदर्शन आदी सेवा विद्यार्थ्यांनी दिल्या. उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्रा. गुरुराज कुलकर्णी व प्रा.सोमेश निकम, प्रा. ओंकार बागल, प्रा. उत्कर्ष पाटील, प्रा. गणेश दराडे, प्रा.रोहित जगताप, प्रा. रोहित देवकाते, प्रा.नागेश खुपकर यांचे मार्गदर्शन लाभले.

कार्याचे श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक, कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे प्राचार्य डॉ. एस. पी. पाटील, कर्मयोगी पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. ए. बी. कणसे, रजिस्ट्रार गणेश वाळके तसेच सर्व प्राध्यापकांनीकौतुक केले.

## पूर्वीच्या भांडणातून चाकूने हल्ला; महिला जखमी

**सोलापूर, दि. २९ जुलै-**

पूर्वीच्या भांडणावरून च१ाकू आणि हातातील कड्याने केलेल्या मारहाणीत ४० वर्षीय महिला गंभीर जखमी झाली. ही घटना नवीन घरकुल कुंभारी (ता. दक्षिण सोलापूर) येथे सोमवारी रात्रीच्या सुमारास घडली.


शोभा विजय गाडगे (वय ४० रा. चिक्केहळ्ळी (ता. अक्कलकोट सध्या रा. घरकुल कुंभारी) असे जखमी महिलेचे नाव आहे. सोमवारी रात्री आठ वाजेच्या सुमारास घरकुल येथील घराजवळ गिडप्पा जाधव, डोन जाधव या दोघांनी मिळून मारहाण केली. तिला उपचारासाठी विकी गाडगे (मुलगा) यांनी बेशुद्ध अवस्थेत सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

## मनोरमा साहित्य मंडळीच्या वतीने २ ऑगस्टला गझलदीप कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ जुलै-**

**शिल्पा देशपांडे, केतन गोडबोले यांचे मराठी-हिंदी गझलांचा सादरीकरण**

मनोरमा साहित्य मंडळी, सोलापूर आणि महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे शाखा (मनोरमा) पश्चिम सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. २ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ४.३० वाजता डॉ.निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे गझलदीप या विशेष गझल कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती मनोरमा को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष श्रीकांत मोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. या कार्यक्रमात मराठी व हिंदी गझलांचा सुरेल प्रवास उलगडणार असून, संवादक शिल्पा देशपांडे आणि गझलगायक केतन गोडबोले यांचे सादरीकरण रसिकांना अनुभवता येणार आहे. गझल अभ्यासक प्रदीप निफाडकर हे मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत, असेही त्यांनी सांगितले. या पत्रपरिषदेला मनोरमा मल्टीस्टेट चेअरमन शोभा मोरे, संचालिका डॉ.ऋचा पाटील, गजेंद्र साळुंखे, सुहास भोसले, चंद्रकांत खरटमल, मुख्य कार्यकारी अधिकारी शिल्पा कुलकर्णी उपस्थित होते.



## कारगिल विजय दिनानिमित्त माजी सैनिक व वीरपत्नींचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै-**

सोलापूर जिल्ह्यात कारगिल विजय दिवस साजरा करण्यात आला. त्यावेळी माजी सैनिक व वीर पत्नीचा सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य अरुण तळीखेडे यांच्या वतीने देण्यात आले.

त्यावेळी भारतीय माजी सैनिक संघटना जिल्हा सोलापूर जिल्हा आदेक्ष व महाराष्ट्र राज्य सिनियर उपादक्ष तसेच IESL दिल्ली येथील deliget अरुण कुमार तळीखेडे, मेजर तुंगार सासेब जिल्हा सैनिक अधिकारी व कर्मचारी, बरेच माजी सैनिक, सैनिक कल्याण कार्यालयाचे वसतिगृहातील मुल, मुली, ॲड. पाटील, यश सिद्धी माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष घटकांबळे व माजी सैनिक संघटना जिल्हा आदेक्ष अरुण कुमार तळीखेडे यांच्या शशिकला अरूण तळीखेडे यांचा वाढदिवस असल्याने याही विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप कार्यासाठी उपस्थित होत्या. सुभेदार मेजर (ॲड, कॅप्टन) संजीव पवार यांनी आभार मानले. सूत्रसंचालन केले.



## शेतमाल प्रक्रिया उद्योग उभारणीसाठी बैठक

### शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी आ. राऊत यांचा पुढाकार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २९ जुलै-**

बार्शी परिसरातील शेतकऱ्यांना शेतीमालाला योग्य व चांगला दर मिळावा, तसेच मूल्यवर्धनाच्या माध्यमातून त्यांच्या उत्पन्नात वाढ व्हावी, या उद्देशाने बार्शी कृषी उत्पन्न बाजार समिती येथे महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. आमदार राजेंद्र राऊत यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीत विविध शेतमाल प्रक्रिया उद्योगांच्या स्थापनेसंदर्भात चर्चा करण्यात आली.

बैठकीत कांदा, डाळी, धान्य तसेच इतर शेतीमालावर प्रक्रिया करुन त्याचे पॅकिंग, ब्रँडिंग आणि बाजारपेठेत विक्री करण्याच्या संकल्पनेवर सकारात्मक विचारमंथन झाले. प्रक्रिया उद्योग उभारल्यास शेतमालाची नासाडी टळेल, शेतकऱ्यांना थेट बाजारपेठ उपलब्ध होईल आणि स्थानिक युवकांसाठी मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

यावेळी आमदार राजेंद्र राऊत म्हणाले, 'बार्शी तालुका हा शेतीप्रधान असून केवळ कच्चा शेतमाल विकून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढणार नाही. प्रक्रिया उद्योगांमुळे शेतमालाला अधिक मूल्य मिळेल आणि शेतकऱ्यांना दुप्पट दर मिळण्यास मदत होईल.

हंगामात होणारी नासाडी थांबेल. बार्शीत असे उद्योग सुरु झाल्यास सुमारे ५०० ते ७०० स्थानिक तरुणांना थेट रोजगार उपलब्ध होईल. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी मी सर्वतोपरी सहकार्य करेन. बार्शीचा कृषी व औद्योगिक विकास निश्चितपणे घडवून आणू.'

या बैठकीस बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विजय गरड, आडत व्यापारी दिलीप गांधी, संचालक रामेश्वर पाटील, प्रभाकर डमरे, उपसभापती बाबा गायकवाड, कौरव माने, प्रशांत कथले, राजेंद्र सुरवसे, तालुका कृषी अधिकारी संतोष कोयले, महेश बाफणा, भारतीय जनता पार्टी डॉक्टर सेलचे तालुकाध्यक्ष डॉ. देवेंद्र डोके, द्राक्ष बागायतदार राहुल सुरवसे, अनिल सुरवसे, सचिव तुकाराम जगदाळे, संचालक सुरेश गुंड, प्रवीण गायकवाड, भरतेश गांधी, देवा खटोड, महेश काळे, गजेंद्र मुकटे, बाबासाहेब कापसे उपस्थित होते.



## शंकरलिंग प्रशालेचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि.२९ जुलै-**

वळसंग (ता.द.सोलापूर) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील एप्रिल २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च प्राथमिक (इयत्ता सातवी )शिष्यवृत्ती परीक्षेत श्री शंकरलिंग प्रशालेतील विद्यार्थ्यांनी उत्तम यश संपादन केले आहेत. या शिष्यवृत्ती परीक्षेत कुमार आनंद किणगी, कुमारी देविका ढब्बे, यश पवार, सिद्धार्थ चनशेट्टी व अनुजा अंटद असे पाच विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरल्या आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांना सिध्दाराम भैरामडगी, बसवराज दुधगी, मल्लिनाथ गौडगाव, गंगाधर बिराजदार, बाह्य परीक्षा विभाग प्रमुख बाळकृष्ण गुंड यांच्यासह वर्गशिक्षक निलकंठ कवटगी, वरिष्ठ लिपिका राजश्री दुधगी, कनिष्ठ लिपिक गौरीशंकर चनशैट्टी यांचे मार्गदर्शन लाभले आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थाध्यक्ष श्रीशैल दुधगी, चेअरमन शिवशरण थळंगे, उपाध्यक्ष विश्वनाथ थळंगे, संचालक शिवशरण प्याटी, प्रकाश दुधगी, रमेश दुधगी मल्लिनाथ थळंगे, प्राचार्य वीरेश थळंगे, पर्यवेक्षक शिवानंद घोडके यांनी अभिनंदन केले.

## ट्रॅक्टरला धडकल्याने रिक्षा चालक जखमी

**सोलापूर, दि. २९ जुलै-**

रिक्षा घेऊन जात असताना रस्त्याच्या बाजूला थांबलेल्या ट्रॅक्टरला धडकल्याने रिक्षा चालक जखमी झाला. हा अपघात आज सोमवारी पहाटे दोन वाजेच्या सुमारास रेल्वे लाईन परिसरातील महापौर बंगल्याजवळ घडला. जमीर खाजाभाई शेख (वय ४० रा. नवीन घरकुल कुंभारी, ता.दक्षिण सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. ते पहाटे दोन वाजेच्या सुमारास रीक्षा घेऊन अशोक चौक ते रेल्वे स्टेशन कडे निघाले होते. महापौर बंगल्याजवळ रस्त्यावर थांबलेल्या ट्रॅक्टरच्या ट्रॉलीला धडकल्याने हा अपघात झाला. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

आपला
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडून जीव रक्षकांचे कौतुक

### दीड लाखांचे दिले रोख बक्षिस

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२९ जुलै-**

वारी काळात भाविकांच्या जीव रक्षकांचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कौतुक केले. तसेच दीड लाख रुपयांचे रोख बक्षीस दिले. नदीत स्नानावेळी पाण्यात बुडणाऱ्या ३५ हून जास्त वारकऱ्यांचे प्राण वाचवले आहे.

यंदाच्या वारीत ३२ लाखांहून अधिक वारकरी सोहळ्यासाठी दाखल झाले होते. प्रत्येक वारकरी हा चंद्रभागा नदीच्या स्नानासाठी आवर्जून हजेरी लावतो. चंद्रभागा नदीच्या स्नानासाठी गेलेल्या वयोवृद्ध भाविकांना पाण्याचा अंदाज न आल्याने ३५ हून अधिक भाविक पाण्यात बुडाले होते. शिंदे यांनी या जीव रक्षकांच्या कामाचे तोंड भरुन कौतुक करीत दीड लाख रुपये बक्षीस म्हणून देऊ केले. शिंदे यांच्या कौतुकाच्या थापेने जीव रक्षक तरुण अधिकच भारावून गेले. भेटी दरम्यान जीव रक्षक साहिल माने यांनी मंदिर समितीमार्फत जीव रक्षकांना कायम नियुक्ती करावी अशी मागणी केली. यावर शिंदे यांनी सकारात्मक विचार करु असे आश्वासन दिले.



# स्वामींच्या जयघोषात अक्कलकोट भक्तीमय

## गुरुपौर्णिमा उत्सव साजरा

### श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३९ वा वर्धापन दिन



### फुलांची आकर्षक सजावट; राज्यासह देशभरातूनही भाविकांची गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि, २९ जुलै-**

अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त, सद्गुरु श्री स्वामी समर्थ महाराज की जय..! श्री अन्नपूर्णा देवी, श्री लक्ष्मी नारायण नामाच्या जयघोषात, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ या धर्मादाय न्यासाचा ३९ वा वर्धापन दिन व श्री गुरुपौर्णिमा उत्सव विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरा झाला.

न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली, प्रमुख उपस्थितीत व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी मोठ्या उत्साहात हा सोहळा झाला. अन्नछत्र मंडळात लाखो स्वामी भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतले. राज्यासह, परराज्य, परदेशातून स्वामी भक्तांनी प्रचंड गर्दी केली होती. अन्नछत्र परिसरात विविध ठिकाणी आकर्षक फुलांची सजावट केली होती.

श्री स्वामी समर्थ महाराजांच्या असीमकृपेने, न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली, कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अन्नछत्र मंडळ हे नेत्रदीपक वाटचाल करीत आहे. गुरूपौर्णिमेनिमित्त सकाळी ७ ते ९ श्री स्वामी समर्थ चरित्र सारामृत ग्रंथाचे पारायण, सकाळी ९ ते १० नामस्मरण, जप व श्री गुरूपूजा झाली. रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार शेखर निकम, आमदार शिवाजी पाटील, माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, अखिल मंडई मंडळ पुणेचे अध्यक्ष जनार्दन थोरात, भरत मित्र मंडळ पुणे अध्यक्ष-बाळासाहेब दाभेकर, सचिन सांबरेकर पालखी परिक्रमा संयोजक बेळगावी, ललिता वीर आगासखिंड नाशिक देणगीदार आदी मान्यवरांच्या हस्ते हे कार्यक्रम पार पडले. याप्रसंगी मान्यवरांचा सत्कार न्यासाच्या वतीने करण्यात आला.

विविध कार्यक्रमास न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त भाऊ कापसे, हर्षवर्धनराजे अमोलराजे भोसले, समर्थ फुगे, राजेंद्र लिंबीतोटे, ताराबाई हांडे, आरती लिंगायत, रविना राठोड, लक्ष्मण पाटील, संतोष भोसले, लाला राठोड, डॉ.प्रसाद प्रधान, संदीप फुगे, अमर पाटील, रमेश बारसकर, रामचंद्रराव घाटगे, आनंद तानवडे, गणेश मोरे, मनीष काळजे, रमेश केत, योगेश गोविल, धनंजय गाढवे, नागनाथ कुंभार, सिद्धाराम टाके, ओंकारेश्वर उटगे, मनोज निकम, अरविंद शिंदे, किशोर सिद्धे, अभियंता किरण पाटील, नागेश कलशेट्टी, रमेश केत, श्रीशैल कुंभार,यश विभुते,नितीन मोरे, रोहित मोरे, प्रवीण देशमुख, नन्नु कोरबू, सिध्देश्वर माळी, शिवराज स्वामी, मैनुद्दीन कोरबू, सर्फराज शेख, प्रशांत साठे, अप्पा हंचाटे, अश्पाक काझी, शुभम नागरे, अभिषेक लोकापुरे, रोहित खोबरे, पुणे येथील चंदन बकरे, मयूर कडू, बाळासाहेब जाधव, दिलीप ठोंबरे, मनोज पाटील, अनिल येणकुरे, वैभव मोरे, सौरभ मोरे, संजय गोंडाळ, निखिल पाटील, प्रवीण घाटगे, रामचंद्रराव घाटगे, गणेश भोसले, रमेश हलसंगी, संतोष माने, गोटू माने, सिद्धाराम माळी, रामचंद्र समाने, धनंजय गडदे, अभिजित लोकापुरे, सिद्धेश्वर मोरे, रोहन शिर्के, अतिश पवार, योगेश पवार, अप्पा हंचाटे, शुभम चव्हाण, केदार तोडकर, गोविंद शिंदे, योगेश कटारे, कुणाल भालेकर, पद्माकर डीग्गे, प्रशांत विभूते, शिवशरण इचगे, प्रा. प्रकाश सुरवसे, सुनिल कटारे, योगेश वाघमारे, नुर खासबागदार, राजू म्हेत्रे, पै. महेश कुलकर्णी, मौला शेख, ऋषी लोणारी, भारत पाटील, महेश दणके, आकाश सूर्यवंशी, फहीम पिरजादे, धनंजय गडदे, नारायण गडदे, रणजीत होतकर, बालाजी पाटील, सुमित कल्याणी, सागर याळवर, संजय गोंडाळ, अतिश शिंदे, सागर शिंदे, अण्णा सावंत, रमेश केत आदींसह अमोलराजे लेझीम संघ व मित्र परिवार व समस्त विश्वस्त, क्रियाशील सभासद, सेवेकरी व कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

गुरुपौर्णिमेनिमित्त श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात असलेले यात्रीनिवास, यात्रीभुवन गेल्या दोन दिवसापासून हाऊसफुल्ल झाले होते. मंडळाने पार्किंगची व्यवस्था चोख केलेली होती. राज्यासह परराज्यातील लाखो भाविकांनी महाप्रसादाकरिता गर्दी केली होती. गेल्या १० दिवसापासून श्री गुरु पौर्णिमा व वर्धापन दिनानिमित्त धर्मसंकीर्तन व सांस्कृतिक कार्यक्रम, भजन, किर्तन या कार्यक्रमासह गुरुपौर्णिमेच्या दिवशी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांनी महाप्रसाद वाटपाचे नियोजन केले होते. पूजा न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पु पुजारी, विश्वंभर पुजारी व संजय कुलकर्णी, सोमकांत कुलकर्णी यांनी केले. आभार सचिव शामराव मोरे यांनी मानले.

### नूतन महाप्रसादगृहाचे काम प्रगतीपथावर

महाप्रसादगृहाच्या बांधकामास २०२४ ला प्रारंभ केला होता. सध्या तिसऱ्या मजल्याचे काम प्रगतीपथावर आहे. नियोजित महाप्रसाद गृहाची इमारत, भव्य आणि मंदिर सदृश्य असणार आहे. ही इमारत पूर्णपणे वातानुकुलित आहे. इमारतीचे बांधकाम क्षेत्र १,१९,३९८ चौरस फुट असणार आहे. इमारतीच्या टेरेसवर श्री स्वामी समर्थांची ५१ फुटांची सुंदर, रेखीव आणि भव्य लक्षवेधी मुर्ती आहे. नियोजित महप्रसादगृहात २५०० भाविकांची महाप्रसादाची व्यवस्था आहे. ५ हजार भाविकांसाठी सोयी सुविधांनी युक्त अशा प्रतिक्षा कक्ष असणार आहे. इमारतीच्या तळघरामधे धान्य-भाजीपाला कोठार, चटणी व पिठाची गिरणी तसेच एका तासात ८०० चपाती तयार करता येणाऱ्या ७ मशिल आणि डिश वॉशरचीही सोय आहे. संपूर्ण इमारतीत अग्निशामन यंत्रणा बसविण्यात येणार आहे. अत्याधुनिक सोयी सुविधांनी सुसज्ज व प्रशस्त इमारत, स्वामी भक्तांच्या देणगीतून साकारणार आहे. बांधकामाचा सर्वसाधारण अंदाजे खर्च रुपये ६० कोटी, इतका अपेक्षित आहे. नुकतेच प्रशासकीय ५ मजली इमारतीचे भूमिपूजन झाले आहे.



### अन्नदानाशिवाय अन्यही सामाजिक उपक्रम

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली समर्थ महाप्रसाद सेवा कुस्तीगिरांसाठी खुराक या सह विविध योजना उल्लेखनीय रित्या राबविले जात आहेत. यंदाच्या पंढरपूर वारीत बंदोबस्तात असलेल्या पोलिसांसाठी अन्नधान्य, उपवासाचे जिन्नस आणि पाण्याचे ५०० जार दिले आहेत.

### चोख बंदोबस्त, नेटके नियोजन

श्री गुरु पौर्णिमा व ३९ व्या वर्धापन दिनानिमित्त पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली व उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्र टाकणे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस निरीक्षक एकनाथ पवार यांनी चोख पोलीस बंदोबस्त मंदिर व न्यासाच्या परिसरात लावला होता. बाहेर गावामधून आलेल्या वाहनांची मैंदर्गी, बसलेगाव व शहरातील मुख्य रस्त्यावर वाहनांची दुतर्फा गर्दी होत होती. हे लक्षात घेऊन न्यासाच्या मैंदर्गी रस्त्यावरील गेटने भाविकांना बाहेर जाण्यासाठी रस्ता मोकळा केला. परिणामी वाहनांची गर्दी कमी झाली. न्यासाने पार्किंगची व्यवस्था चोख केलेली होती. नेहमीच भक्तांना सुविधा देण्यामध्ये न्यास हे अव्वल आहे.

### लाखो भक्तांना महाप्रसाद; किर्ती सातासमुद्रापार

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात दैनंदिन दोन्ही वेळेस मोफत महाप्रसादाची सोय, भक्तांच्या यथाशक्तीच्या देणगीवर सुरू आहे. दररोज २५ हजार हून अधिक तर सण, वार, उत्सव, दर गुरूवारी, संकष्टी चतुर्थी, एकादशी व गुरुपोर्णिमेच्या दिवशी १ लाखाहून अधिक भाविक महाप्रसादाचा लाभ घेतात. महाराष्ट्रसह कर्नाटक, आंध्र, तेलंगणा, गोवा, मध्यप्रदेश, केरळ, तमिळनाडू, गुजरात, दीव-दमण, उत्तराखंड, काश्मीर व दिल्ली याबरोबरच राजस्थान, उत्तर प्रदेश व बिहार या राज्यासह विदेशातून लाखो भाविकांनी न्यासाचा वर्धापनदिन व गुरुपोर्णिमे निमित्त श्री स्वामी समर्थांच्या दर्शन व महाप्रसाद घेतला.

### वर्षभरात ५ हजार भक्तांचे रक्तदान



गेल्या ३६० दिवसात सोलापूर येथील विविध रक्तपेढ्यांनी अन्नछत्र मंडळात आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात वर्षभरात ५ हजार स्वामी भक्तांनी रक्तदान केले आहे.



## माळशिरस शहर परिसरात बेंदूर सण साजरा

**माळशिरस, दि.२९ जुलै -**

माळशिरस शहर व परिसरात आषाढ शुद्ध पौर्णिमेला शेतकऱ्यांचा बैल पोळा (बेंदूर) सण साजरा झाला. ग्रामदैवत मारुती मंदिरात पाटील कुटुंबांच्या बैलांची पूजा करून गावातील प्रमुख मार्गावरून मिरवणूक काढण्यात आली. यावेळी शितल पाटील, संदीप पाटील, सुर्यकांत पाटील, संग्राम पाटील, विश्वजित पाटील, अभिजित पाटील, अमित पाटील, स्वप्नील पाटील यांच्यासह पाटील कुटुंबाने मंदिरात बैलांची पूजा केली. यंदा शहरात सकाळ पासून दिसणाऱ्या मिरवणुका दिसून आल्या नाहीत. घरोघरी शेतकऱ्यांनी आपल्या बैलाबरोबर गाई,म्हशी यासह जनावरांना सजवून त्यांची पूजा केली. सणासाठी जनावरांच्या सजावटीची अनेक दुकाने व्यापाऱ्यांनी थाटली होती. गेले दोन दिवस या दुकानात शेतकऱ्यांनी सजावटीचे साहित्य खरेदीसाठी गर्दी केली होती.

## मोडनिंब जि. प. शाळा मोबाईलमुक्त करण्याचा ठराव

**मोडनिंब, दि. २९ जुलै -**

मोडनिंब (ता. माढा) येथील जिल्हा परिषद मुलींच्या शाळेतील शालेय व्यवस्थापन समितीने मोबाइलमुक्त, तंबाखूमुक्त शाळा करण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. सोमवारी (२७ जुलै) शालेय व्यवस्थापन समितीच्या बैठकीत हा ठराव घेण्यात आला. यावेळी सदस्य किरण खडके व बालाजी वाघमारे यांनी मनोगत व्यक्त केले. शाळेत अथवा शाळेच्या आवारात तंबाखूजन्य पदार्थ शिक्षक, विद्यार्थी अथवा त्यांच्या पालकांनी सेवन करु नये. वर्गामध्ये आल्यानंतर शिक्षकांनी मोबाइलचा वापर करू नये. असेही या ठरावामध्ये म्हटले असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सर्व सदस्य, मुख्याध्यापिका व सर्व शिक्षक उपस्थित होते.

## बार्शी टेक्स्टाईल मिलचा निर्णय आता पंतप्रधानांकडे



### शिवसेनेच्या 13 खासदारांचे शिष्टमंडळ भेटणार असल्याची आ. सोपल यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि.२९ जुलै -**

बंद बार्शी टेक्स्टाईल मिलमधील कामगारांचे प्रलंबित वेतन, देयके आणि मिल सुरु करण्याच्या प्रश्नावर थेट पंतप्रधान मोदींशी चर्चा करणार असल्याचे आमदार दिलीप सोपल यांनी सांगितले.

शिवसेनेच्या १३ खासदारांचे शिष्टमंडळ खा. श्रीकांत शिंदेंच्या नेतृत्वाखाली यासाठी पंतप्रधानांची भेट घेणार असल्याचे आश्वासन राष्ट्रीय गिरणी कामगार संघाचे प्रमुख सचिन अहिर यांनी दिल्याचेही आ. सोपल म्हणाले. मुंबई येथे सचिन अहिर यांची भेट घेऊन आमदार दिलीप सोपल यांनी बार्शी टेक्स्टाईल मिलच्या प्रश्नावर चर्चा केली. केंद्र सरकारच्या निर्णयामुळे मार्च २०२० पासून बंद असलेल्या या मिलमधील कामगारांची बिकट परिस्थिती, थकीत वेतन, इतर देयके आणि मिल पूर्ववत सुरु करण्याची गरज याबाबत मांडणी केली. सचिन अहिर यांनी केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्र्यांची पुढील आठवड्यात भेट निश्चित करण्यासाठी वेळ मागवल्याचे सांगितले.

केंद्र सरकारच्या नॅशनल टेक्स्टाईल कॉर्पोरेशन अंतर्गत कार्यरत बार्शी टेक्स्टाईल मिल कोविड-१९ लॉकडाऊनमुळे २२ मार्च २०२० रोजी बंद झाली. त्यानंतर खेळते भांडवल उपलब्ध न होणे आणि आर्थिक अडचणींमुळे मिल पुन्हा सुरु होऊ शकली नाही. परिणामी सुमारे ३५० हून अधिक कामगार बेरोजगार झाले आहेत. कामगार संघटनांकडून अनेक वर्षांपासून थकीत वेतन अदा करुन मिल पूर्ण क्षमतेने सुरु करण्यासाठी केंद्र सरकार, 'एनटीसी'कडे पाठपुरावा सुरु आहे. आता हा प्रश्न आ. सोपल पंतप्रधानांकडे मांडणार असल्याने कामगारांमध्ये आशेचे वातावरण आहे.


## सद्गुरु आण्णा महाराजांनी नामस्मरणाची शक्ती दिली तर सुशीलामातांनी परमार्थाची शिकवण : प्रशांत माने

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै-**

सोलापूर, मुंबई, पुणे, साताऱ्यासह महाराष्ट्रातील शेकडो भक्तांचे आराध्य सद्गुरु आण्णा महाराज यांनी नामस्रणाची शक्ती दिली तर अन्नपूर्णा सुशीलामाता यांनी परमार्थाची शिकवण दिल्याचे प्रतिपादन दैनिक तरूण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने यांनी आज येथे केले.

बाळे येथील श्रीकृष्णाश्रम येथील आण्णा मारुती मंदिर येथे सद्गुरु आण्णामहाराज सेवा मंडळाच्या वतीने आयोजित अन्नपूर्णा सुशीलामाता यांच्या जीवनावर कै. मोहन आजगावकर लिखित वात्सल्यसिंधू पुस्तकाचे प्रकाशन प्रशांत माने यांच्या हस्ते झाले, त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुंबई येथील गुरुबंधू प्रथितयश बँकर शामभाई देशमुख होते. याप्रसंगी सेवा मंडळाचे सचिव नागेश पवार, सौ. भाग्यश्री पवार, श्रीमती हेमलता आसगावकर व्यासपीठावर उपस्थित होते. प्रशांत माने पुढे म्हणाले, लहानपणी मला ज्या मातेची माया मिळाली त्या सद्गुरु सुशीलामातांच्या जीवनावर लिखित पुस्तकाचे प्रकाशन करण्याचे भाग्य मला लाभल्याचा मनस्वी आनंद आहे. आणामहाराज, सुशीलामाता आणि पवार कुटुंबाचा मला अनेक वर्षे सहवास लाभला. माझ्यावर अनेक चांगले संस्कार झाले. आज आपण जीवनात जे काही यश मिळवले त्याचे श्रेय पवार कुटुंबालाच जाते. सद्गुरु आण्णा महाराजांनी दिलेली नामस्मरणाची शक्ती आणि सुशीलामातेने दिलेली परमार्थाची शिकवण या शिदोरीवरच माझ्या जीवनाची जडण-घडण झाली. वास्तल्यसिंधू पुस्तकाचे प्रकाशन माझ्या हस्ते झाले हे माझ्यासाठी मोठ्या भाग्याचे आहे.

### अन्नपूर्णा सुशीलामाता यांच्यावर लिखित वात्सल्यसिंधू पुस्तकाचे प्रकाशन



अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना श्यामभाऊ देशमुख म्हणाले, सद्गुरु आण्णा महाराज आणि सुशीलामाता यांची शिकवण सर्व गुरुबंधू, भक्तांना जीवनभर पुरेशी आहे. आज आई-आण्णा आपल्यात नसले तरी त्यांचे आशिर्वाद सदैव आपल्या पाठिशी आहेत, त्यांचा सहवास आपणास सदैव लाभणार असून आपण पोरके झालेलो नाही.

श्री. नागेश पवार यांनी प्रकाशकीय मनोगत व्यक्त करताना पुस्तकासाठी सहकार्य लाभलेल्या सर्वांचे आभार मानले. याप्रसंगी नागेश पवार व भाग्यश्री पवार यांच्या हस्ते पाहुण्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. श्री. अनिल जाधव यांनी प्रास्ताविक आणि आभार प्रदर्शन केले. कु. वैष्णवी पराडकर यांनी गायलेल्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. गुरुपौर्णिमेनिमित्त उपस्थित सर्व भक्त, गुरुबंधू-भगिनी यांनी श्री. सद्गुरु अण्णामाऊलींच्या समाधीचे व गुरुमाऊली सद्गुरु श्री. सुशीलामाता यांचे दर्शन घेत महाप्रसादाचा लाभ घेतला.